# शब्द रुची

४९

जुलै २०२४ | मूल्य १० रु. | पृष्ठे ४४



ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

शब्द रुची ४१

जुलै २०२४, वर्ष बारावे
अंक तिसरा, मूल्य १० रु.

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**

---

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे, अनिरुद्ध गद्रे**
**shabdruchee24@gmail.com**
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल, सौमित्र शिंदे**
**वेबसाइट डिझाइन व डिजिटल एडिटिंग**
**समीर कदम**

---

संपर्क
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माहीम (प.), मुंबई ४०००१६
फोन : २४२१६०५० **(वेळ : दुपारी १ ते ६.३०)**

---

**अंकासाठी लेख व प्रतिक्रिया खालील मेलवर पाठवावी.**
**shabdruchee24@gmail.com**

---

**ऑफिस वेळ : दुपारी १ ते सायं. ७**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**

---

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

## अनुक्रम

**उल्हास मुकुंद परांजपे / ५**
पाऊस पकडा.. पाणी साठवा!

**डॉ. अंजली पटवर्धन-कुलकर्णी / ९**
विद्यार्थी - हजर की गैरहजर?

**संजीवनी खेर / १२**
जीवनदर्शन घडवणारी साहित्यिक धीरूबेन पटेल

**राजीव श्रीखंडे / १५**
द वॉर ऑफ द एन्ड ऑफ द वर्ल्ड
मारिओ व्हर्गास योसा

**किरण येले / २०**
मोठी झेप घेण्याची ताकद बाळगणारी कविता - कवी संजय साठे

**डॉ. निर्मोही फडके / २४**
चंद्रबळ

**शरद काळे / २८**
मसाल्यांचा घोळ!

**प्राची बापट / ३१**
एका अनुवादिकेची कौतुकपन्नाशी...

ग्रंथपरिचय / प्रकाशने / वृत्तांत / ग्रंथपाने **३४ ते ४२**
**डॉ. निर्मोही फडके, चांगदेव काळे**

**'शब्द रुची'साठी shabdruchee24@gmail.com याच नवीन ईमेलवर संपर्क साधावा.**
'शब्द रुची' अंकाबाबत डिसेंबरमध्ये नव्याने विचार होणार आहे. अंकासाठी वर्गणी भरल्यास डिसेंबर २०२४पर्यंतचे अंक पोस्ट केले जातील. ज्यांची वर्गणी डिसेंबर २०२४च्या पुढची भरली असेल, त्यांना ती संपण्याच्या महिन्यांइतके वर्गणी जमा होण्याच्या तारखेपूर्वीचे अंक मिळतील. आता वर्गणी फक्त डिसेंबर २०२४ पर्यंतचीच स्वीकारली जाईल.

**– सुदेश हिंगलासपूरकर**
विश्वस्त, संपादक

# संपादकीय...

उन्हाची तलखी खूपच झाली. आता पावसाला सुरुवात झाली आहे. यंदा पाऊस चांगला असल्याचे अंदाज आहेत. असेच काही वर्षे वाचत असतो. मात्र पाऊस किती पडतो, त्याचे किती पाणी वाहून जाते याचा हिशोब मांडला जातो का, हा प्रश्न आहे. दुष्काळ काही संपत नाही. शेतकऱ्यांच्या जमिनी कोरड्या राहतात आणि पाण्यासाठीची वणवण चालूच राहते. पावसाळ्यापूर्वी रस्त्यांवरच्या खड्ड्यांत पाणी साचवण्याची कामे हातात घेण्यापेक्षा ते कायमस्वरूपी योग्य ठिकाणी साठवता येईल असा विचार करता येईल का, हा प्रश्न आहे. शेततळी, जलशिवार योजना झाल्या, नाही असे नाही. तरी टँकरने पाणी पोचवण्याची वेळ येतेच आहे. यावर उपाय शोधणे हे शासनाचे काम असले, तरी आपणही पाण्याच्या साठवणुकीसाठी सजग राहायला हवे. पडणारा पाऊस कसा पकडता येईल, ते पाणी कसे साठवता येईल, हे पाहायला हवे. गाव असो वा शहर, जलसाक्षरता वाढायला हवी. उल्हास परांजपे गेली अनेक वर्षे यासाठी कार्य करत आहेत. वेगवेगळ्या पद्धतीने पाण्याच्या टाक्या बांधण्यासाठी साहाय्य करत आहेत. त्यांचा या अंकातला लेख त्याची माहिती देतो.

असे समाजाला वाहून घेतलेले पाहिले की आपण काहीच करत नाही, याची जाणीव होते. परवा अशोक देशमाने यांची भेट झाली. निमित्त होते समरेंद्र निंबाळकर यांच्या 'अवघा रंग एक झाला' या कवितासंग्रहाच्या तिसऱ्या आवृत्तीच्या प्रकाशनाचे. अशोक देशमाने प्रमुख पाहुणे होते. परभणीतील खेड्यात शेतकऱ्याच्या घरात जन्म झाला. घरची परिस्थिती बेताची. आईवडिलांना शिक्षणाचे महत्त्व माहीत होते. त्यांनी मुलांच्या शिक्षणाकडे काटेकोर लक्ष दिले. त्यामुळे ते आयटी इंजिनीयर झाले. पुण्यात आले. एका मोठ्या कंपनीत उत्तम पगारावर काम करत होते. मात्र आपल्या गावाची ओढ, तिथल्या गरिबीच्या आठवणी स्वस्थ बसू देईनात. त्यात आत्महत्या केलेल्या व्यक्तीच्या मुलांची होणारी परवड मन हेलावून टाकणारी होती. त्यांनी निर्णय केला, नोकरी सोडून अशा मुलांसाठी काही करायचे. त्यांचा बाप व्हायचे. त्यांना शिक्षण आणि जगण्याचे मार्ग खुले करून द्यायचे. अर्थातच घरचे चिंतेत पडले. विरोधही झाला. मात्र तिशीतल्या या तरुणाचा विचार दृढ होता. 'स्नेहवन' नावाने संस्था उभारून काम सुरू केले. लग्नही झाले नव्हते. ते करावे असा तगादा सुरू झाला. नोकरीत दहा लाखांचे पॅकेज होते तेव्हा मुली मिळणे अवघड नव्हते, मात्र आता हातात उत्पन्नाचे साधन नाही, त्यात आयुष्य होरपळलेल्या मुलांची जबाबदारी! तशी साथ देणारी पत्नी लाभली. स्नेहवनातील मुले वाढत गेली. आता शंभर मुलांचा सांभाळ करताना त्यांच्यासाठी औपचारिक शिक्षणासह पुढे उपयोगी पडेल असे संगणक, विविध खेळ, विविध कौशल्ये आदी उपक्रमही केले जात आहेत.

अशी माणसे कधी जाहिरात करताना दिसत नाहीत. त्यांचे काम बोलते आणि समाज त्यांच्याकडे जातो. त्यातूनच काही व्यक्तींनी, गटांनी त्यांना साहाय्य केले आहे. 'साथी हाथ बढाना' असा ग्रूप तयार झाला आहे. समरेंद्र निंबाळकर यांनी त्यांच्या कवितासंग्रहाच्या तिसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन अशोक देशमाने यांच्या हस्ते करण्याचे ठरवले, त्यामागे त्यांच्या कामाबद्दल कृतज्ञताभाव होता. त्यांच्या 'स्नेहवन'मधील लहानग्यांच्या हस्ते उपस्थित वक्त्यांचे स्वागत केले.

संवेदनशील मने एकत्र येतात तेव्हा सकारात्मक घडते. आज त्याची अधिक गरज आहे.

अमेरिकेत बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनात ग्रंथाली पुस्तकांचा स्टॉल घेऊन सहभागी होते. तसे याही वेळी ग्रंथालीतर्फे सुदेश हिंगलासपूरकर, धनश्री धारप आणि मी उपस्थित राहिलो. आमच्यासह डॉ. लतिका भानुशाली, डॉ. निर्मोही फडके, डॉ. स्मिता दातार आणि प्रकाश अंबुरे असे लेखकही आले. अधिवेशनानिमित्त तयार केलेला, ज्ञानेश्वर मुळे यांच्या अतिथी संपादनात 'विश्व मराठी'चे हा 'शब्द रुची'चा विशेषांक तिथे प्रकाशित झाला. मराठी साहित्य आणि ग्रंथालीचे डिजिटल उपक्रम याची माहिती मांडली. पंडित कुमारगंधर्व यांच्या मुलाखतमैफलीचा आस्वाद शब्दांसह सुरांनी घेता येणारे 'गंधर्वांचे देणे' हे पुस्तक साहजिकच आकर्षण ठरले.

अशोक देशमाने यांचा सहवास तिथेही लाभावा हा योग होता. त्यांच्या कार्याचा तपशीलवार लेख पुढील अंकात समरेंद्र निंबाळकर लिहीत आहेत.

**– अरुण जोशी**



# पाऊस पकडा..
# पाणी साठवा!

उल्हास मुकुंद परांजपे

या वर्षी उन्हाळ्याने कहर केला. एप्रिल आणि मे महिन्यांत मुंबईसारख्या समुद्रसान्निध्यातल्या भागातही तापमान ४० ते ४२ अंश सेल्सिअसपर्यंत गेले. दिल्ली परिसरात तर पारा पंचेचाळीस ते पन्नासच्या दरम्यान उसळला. 'ग्लोबल वॉर्मिंग' म्हणा किंवा 'क्लायमेट चेंज', नाव काहीही दिले तरी परिणाम एकच जाणवला तो भीषण उन्हाळ्याचा.

यामुळे अर्थातच पाण्याचे दुर्भिक्ष जाणवायला लागले. ही परिस्थिती आजची नाही. वर्षानुवर्षे यावर जगभर चर्चासत्र होताहेत, पण निश्चिततत तोडगा आणि मुख्य म्हणजे त्याची अंमलबजावणी होताना दिसत नाही. 'सरकारनं असं करावं, तसं करावं' अशी मते आपण सामान्य माणसेही सातत्याने मांडत असतो. 'आपण काय करणार' असे निराशेचे सूरही निघतात. परंतु अनेकदा, मर्यादित प्रमाणात का होईना प्रश्नांची उत्तरे आपल्याकडेच असतात. ती शोधण्याचा आणि त्या अनुषंगाने कृती करण्याचा सुज्ञ निर्णय घेता आला पाहिजे.

'कृत्रिम पाऊस' पाडणे काही आपल्या हाती नाही. शिवाय ज्या आखाती देशात तो पाडला जातो त्यांच्याकडे यंदा निसर्गाची लहर फिरल्याने, वाळवंटात महापूर आल्याच्या बातम्याही आपण टीव्हीवर पाहातो. म्हणजे आकाशातून पाणी कमी प्रमाणात पडते असे नाही. पण, ते आपल्याला हवे तेव्हा आणि हवे तसेच पडेल याची शाश्वती हवामानतज्ज्ञसुद्धा देऊ शकत नाहीत. या सर्व गोष्टी लक्षात घेऊन काही सोपे उपाय करणे आपल्या हाती असते. 'तहान लागल्यावर विहीर खणून उपयोग नसतो,' हे खरेच पण आभाळाची कृपा शतधारांनी बरसते तेव्हा ते पाणी कल्पकतेने किमान साठवून ठेवण्याचा म्हणजेच 'पाऊस आपल्यापुरता पकडण्याचा' प्रयोग केला तरी पावसाळ्यानंतरच्या काळातली पाणीटंचाई सुसह्य होईल. मैलोगणती पायपीट करून, २०० फूट खोल विहिरीच्या तळाशी गेलेल्या पाण्यातून, हंडाभर पाणी आणण्याचे कष्ट वाचतील.

यंदा 'एल निनो' नावाचा हवामानाचा परिणाम आपल्याकडे भरपूर पाऊस देणार आहे असे म्हणतात. भारत हा 'पावसाळ्यांचा स्वतंत्र मोसम असलेला देश आहे. या उपखंडात वर्षातले चार महिने सलग पाऊस पडतो. अर्थात तो देशभर सर्वत्र सारखाच पडत नाही. महाराष्ट्राच्या कोकण भागात सुमारे ४६ टक्के तर उर्वरित महाराष्ट्रात हे प्रमाण ५४ टक्के असे ढोबळमानाने सांगितले जाते. त्यामुळे कुठे ओला तर कुठे कोरडा दुष्काळ अशी विपरीत स्थिती अवघ्या चार-पाचशे किलोमीटर अंतरावर अनुभवाला येते.

यासाठीच जलसाक्षरतेची, जलसंचय करण्याच्या जलजागृतीची नितांत गरज आहे. सरकारच्या अनेक योजना असतात. मोठमोठी धरणे दिसतात, पण प्रसंगी तीही कोरडीठाक पडतात हे याच वर्षीच्या जायकवाडीच्या स्थितीवरून लक्षात येईल.

पाणी हे 'जीवन' आहे वगैरे सुभाषिते, ते मुबलक मिळते तोपर्यंत लक्षात येत नाही. परंतु ते उपलब्ध असतानाच साठवले तर पुढचा बिनपावसाचा काळ निदान तहान












भागवण्याइतके तरी पाणी देऊ शकतो. संचयाची क्षमता वाढवली तर सिंचनासाठीही ते उपलब्ध होऊ शकते. अनेक ठिकाणी फेरो सिमेंटच्या टाक्या उभारून आम्ही या पाणीटंचाईवर एक उपाय गेली २५ वर्षे यशस्वीपणे करून दाखवत आहोत.

महाराष्ट्राच्या राजधानीचा विचार केला तर आज दीड कोटीपेक्षा जास्त असलेल्या या महानगराला वर्षभर पुरेसे पाणी मिळण्याचे कारण म्हणजे आजच्या ठाणे जिल्ह्यातील, मुंबई महापालिकेचे सात मोठे तलाव. याचा आरंभ एकोणिसाव्या शतकात, १८६०पासून झाला. आपली मुंबई ज्या कोकणपट्टीत येते तिथे इतरत्र काय परिस्थिती आहे? असे मोठे प्रकल्प नसल्याने धो धो पाऊस पडणाऱ्या या प्रदेशातही मार्च महिन्यापासूनच जलटंचाई का भासते? कारण, सर्वच पातळ्यांवर नियोजनाचा अभाव.

या भागातच आम्ही 'जलवार्धिनी'तर्फे अनेक टाक्या बांधून अनेक कुटुंबांची तहान भागवण्याला साहाय्य केले आहे. पाणी अनेक प्रकारे साठवता येते. जमिनीत खड्डा खणून त्यात प्लास्टिक अंथरून आज शेततळे निर्माण करतात. त्यात कुठे छिद्रे पडली तर पाणी जमिनीत जिरून जाते. त्यासाठी तुलनेने लहान किंवा गरजेनुसार मोठ्याही आकाराच्या विविध प्रकारच्या टाक्या बांधणे श्रेयस्कर ठरते. कोकण जलकुंड, बंकर जलकुंड, नारळाचा काथ्या वापरून बनवलेले, केळीचे किंवा अंबाडीचे अथवा ज्यूटचे धागे वापरून बांधलेले जलकुंड, तसेच फेरोसिमेंटची, चिकनमेश, बेल्डमेश अशा जाळ्यांचा वापर करून जमिनीत बांधलेली जलकुंडे, असे अनेक प्रकार आहेत. जमिनीवरही फेरोसिमेंटच्या तंत्रज्ञानाने काही हजार लिटर पाणी साठवणारी टाकी बांधता येते. जिओमेम्ब्रेनचा वापर करूनही जलकुंभ आकाराला येतो.

याची तांत्रिक माहिती ज्यांना हवी असेल त्यांच्यासाठी शेवटी, संपर्क पत्ता दिलेला आहे. जमिनीखालच्या टाक्यांच्या बांधणीचा खर्च २ ते ३ रुपये, जमिनीवरच्या उघड्या टाक्या ५ ते ७ रुपये आणि बंद टाकीसाठी ८ ते १० रुपये खर्च प्रतिलिटर येतो. हा खर्च त्यावेळच्या कच्च्या मालाच्या भावानुसार थोडा कमीजास्त होऊ शकतो. हे तंत्रज्ञान स्थानिकांना आम्ही विनाशुल्क शिकवतो, त्याचबरोबर आत्यंतिक गरजूंना पन्नास टक्क्यांपर्यंत (कमीअधिक) अनुदानही देतो. महाराष्ट्र बाराही महिने सुजलाम् असावा हीच 'जलवर्धिनी'ची यामागची कळकळ आहे. म्हणूनच 'अवघे पाऊणशे वयमान' असे मानून मी माझ्या सहकाऱ्यांसमवेत कार्यरत राहण्याचा प्रयत्न करत आहे.

आपल्या महाराष्ट्रात पावसाचे प्रमाण वार्षिक ३० ते ५०० सेंटिमीटर किंवा सुमारे २५ ते २०० इंच एवढे आहे.

याचा अर्थ पावसाचे पाणी कमी पडतेय असे नाही. परंतु वाढत्या उन्हाळ्याने होणारे बाष्पीभवन, पाणी साठवण्याची सोयच नसल्याने, अचानक धो धो पडणारे पाणी वाहून फुकट जाण्याने, शहरी भागात अतिकाँक्रीटीकरणाने जमिनीत पाणी न मुरणे अशा अनेक बाबींकडे वेळीच लक्ष द्यायला हवे.

जिथे केवळ वर्षाकाठी फक्त २५ सें.मी. पाऊस पडतो त्या ठिकाणी एका एकरावर म्हणजे सुमारे ४० हजार चौरस फूट भागात १००० घनमीटर किंवा १० लाख लिटर पाणी पडते. या हिशेबाने आपल्या भागातील पावसाची गेल्या दहा वर्षांतील सरासरी काढून किती कमी किंवा अधिक पाणी मिळते याचा हिशेब सहज करता येईल. तो खेड्याच्या पातळीवर केला गेला आणि शेतजमिनींच्या 'सातबारा'च्या उताऱ्यावर त्याची नोंद केली गेली तर कुठल्या शेतात किती पाणी नैसर्गिकरीत्या उपलब्ध आहे ही गोष्ट एका दृष्टिक्षेपात समजेल आणि त्यानुसार व्यक्तिगत अथवा सामूहिक पातळीवर जलकुंड, जलकुंभ बांधून पाण्याचे नियोजन करता येईल. आपल्याकडे मराठवाड्यात कायम दुष्काळ असतो. मात्र आम्ही बीडसारख्या ठिकाणीही जलकुंभ (पाण्याची टाकी) बांधली आहे. याच भागातील जालना येथील वाघलखेड गावातील एका शेतात पाणी जाण्याचा नाला दिसला तेव्हा विचारणा करता तेथील गृहस्थ म्हणाले, 'अचानक प्रचंड पाऊस झाला तर पाणी वाहून जावं यासाठी हा नाला.' याचा अर्थ असा की वर्षाकाठी केव्हातरी का होईना बरेच पाणी निसर्ग देतो. ते 'वाहून' जाण्याची 'सोय' करण्यापेक्षा साठवण्याचा सुज्ञपणा दाखवला तर वर्षभराचा पाण्याचा प्रश्न सुटेल ही बाब त्यांनाही पटली.

आमचे काम मुख्यत्वे कोकणात असले तरी गरजेनुसार इतरत्रही सेवा देता येऊ शकते. आधी उल्लेख केलेल्या जालना भागातील त्या शेतावर सात दिवसात अचानक १३ लाख लिटर पाणी पडले होते. त्यातही दोन दिवसांत धो धो पाऊस पडला होता. ते पाणी योग्य वेळी साठवता आले असते.

नांदेड जिल्ह्यातील गोगरेवाडी येथे अशाच दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी ३० हजार लिटर क्षमतेची 'जिओमेम्ब्रेन' पद्धतीची टाकी आम्ही जमिनीखाली बांधून दिली. (जिओमेम्ब्रेन म्हणजे प्लास्टिकचे कापड) असे चिवट प्लास्टिकचे कापड 'जलवर्धिनी'ने दहीगव्हाण भागातील टाकीसाठी पाठवून दिले. या गावात २० हजार लिटर पाणी साठवणारा ५ x ४ x १ मीटरचा खड्डा खणून त्यात वर्षभरासाठी पाणी साठवले गेले.

फेरोसिमेंट, नारळाचा काथ्या वगैरे गोष्टींचा उल्लेख आधी झाला आहे. गरजेनुसार अशा टाक्या बांधण्याचे तंत्रज्ञान आणि तज्ज्ञ मंडळींची देखरेख याची काळजी 'जलवर्धिनी प्रतिष्ठान' घेते. त्यामुळे अनेक खेड्यांना


ज्यूटचे धागे


कुमिया धागे


केळीचे धागे


मुरूड शेंग धागे


अंबाडीचे धागे


नारळाचा काथ्या

पाण्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्यास मदत झाली तर पाण्याचे, ठिबक सिंचनासारखे प्रमाणित नियोजन करून पीकसंपन्नताही प्राप्त होईल. दुष्काळात किमान कुटुंबापुरते पाणी आणि धान्य तरी, कुणावरही अवलंबून न राहाता मिळेल.

आता प्रश्न शहरी भागांचा. गेल्या पन्नास वर्षांत आपली लोकसंख्या अफाट वाढली. शहरीकरणच्या नादात उत्तुंग इमारती उभ्या राहिल्या. विहिरी, तळी बुजवण्यात आली आणि जवळच उपलब्ध असलेला जलसाठा आपणच नष्ट केला. आता पावसाचे पाणी साठवून 'रेन वॉटर हार्वेस्टिंग'चा उपाय करतात. तो चांगलाच आहे. बांधकाम होत असतानाच मोठ्या इमारतींच्या तळाशी अशा महाकाय टाक्या बांधल्या जातात. मात्र जुन्या चाळी किंवा पन्नास वर्षांपूर्वीच्या दोन-चार मजली इमारतींना, नळाचे पाणी करंगळीएवढ्या धारेने मिळते. तेही सार्वजानिक पाणवठ्यावर असेल तर बादल्या, हंडे घेऊन झुंबड उडते. यावर उपाय म्हणजे अशा इमारतींच्या आवारातही थोड्या जागेत (आकारमानानुसार) फेरोसिमेंटच्या टाक्या बांधणे शक्य आहे. जिथे इमारतींजवळ 'बोअरवेल' होऊ शकते तिथे तसा प्रयोग करता येईल. अशा टाक्या रंगरंगोटी करून सुमारे २५ वर्षे टिकतात.

'बोअररवेल' किंवा नलिका-कूप एकदा केले की झाले असे नाही. त्याची देखभाल (मेन्टेनन्स) करावीच लागते. अनेक ठिकाणी जमिनीखालची 'वॉटर लेव्हल रिचार्ज' करण्याचीही गरज असते. पृथ्वीवर लाखो वर्षांपासून भूगर्भात साठवलेला अब्जावधी लिटर पाण्याचा वापर सात अब्ज माणसांनी अनियोजित पद्धतीने केलेला आढळेल. आता खरोखरच तहान लागल्यावर विहीर खणायची वेळ आली आहे. कालांतराने होणारी युद्धे 'पाण्यावरून' होतील असेही म्हटले जाते, ते यामुळेच.

हे सर्व टाळायचे असेल तर जमेल त्या मार्गाने पाणी साठवणे हाच उपाय आहे. पृथ्वीवरचा सागरी जलसाठा कायम आहे तेवढाच राहणार. पाऊसही तेवढाच पडणार. परंतु तो आपल्या सोयीने पडेलच असे नाही. त्यामुळे पडत्या पाण्याला पकडणे आणि ते दूषित होणार नाही अशाप्रकारे साठवणे हा उपाय केला तर ही गोष्ट शक्य आहे. पाण्याची उपलब्धता जिथे भरपूर आहे तिथे आणि नाही तिथेही नियोजनाने जीवन पाणीदार करता येते असा आमचा अनुभव माहे.

मर्यादित पडणाऱ्या पावसाचे पाणी काही प्रमाणात साठवले तरी वरकस जमिनीत पीक येऊ शकेल आणि शहरी भागातील गजबजलेला भागातही छोट्या टाक्या उभारल्या तर पावसाचे पाणी साठवता येईल. 'योजकस्तत्र दुर्लभः' म्हणजे योजना देणारे कमी असतात असे म्हटले जाते. योजना आणि जलनियोजन शिकवण्यासाठी 'जलवर्धिनी प्रतिष्ठान' कटिबद्ध आहे. जलवापर करणाऱ्यांची प्रबळ इच्छाशक्ती मात्र हवी. संपर्क साधल्यास अनेक यशस्वी प्रकल्पांची माहिती देता येईल. गावाकडच्या टाक्यांचा उल्लेख झालाच आहे. मुंबईत एका इमारतीच्या १०० चौरस मीटर गच्चीवर, पावसाळ्यात पडणाऱ्या दीड लाख लिटर पाण्यापैकी ५ हजार लिटर पाणी साठवणारी टाकी आम्ही बांधून दिली आहे. कारण ही टाकी पावसाळ्यात वारंवार भरली जात असल्याने पाण्याचा सतत पुरवठा होतो.

'जलवर्धिनी'तर्फे ४०० पेक्षा अधिक टाक्या आम्ही बांधून दिल्या आणि आमच्याकडून तंत्रज्ञान जाणून घेतल्यावर बांधलेल्या एकूण पाण्याच्या टाक्यांची संख्या एक हजारापेक्षा जास्त आहे. यापैकी कोकण भागात आमच्या संपर्कामुळे बऱ्याच टाक्या बांधल्या असल्या तरी मराठवाड्यातील दुष्काळी भागातही, अंबेजोगाईच्या विज्ञान केंद्राच्या पुढाकाराने २५ टाक्या बांधण्यात यश आले. हे काम अनेक ठिकाणी, स्थानिकांनीच केले आहे याचा अधिक आनंद आहे. याचप्रमाणे 'ज्ञानप्रबोधिनी'च्या पुढाकारानेही अशाच अनेक टाक्या दुष्काळी भागात बांधण्यात आल्या आहेत.

प्रश्न शहरी किंवा ग्रामीण कुठलाही असो. जिथे समस्या असते तिथे प्रयत्नांती समर्पक उत्तर शोधणे हे संशोधकाचे काम ठरते. त्यातून जलसंचय करणे हा काही मोठा 'शोध' नव्हे. तो असेलच तर पावसाचे पाणी जरूर साठवा आणि ते स्वच्छ ठेवा असा 'बोध' देण्याचा प्रयत्न आहे. कौटिल्यानेही 'स्थल' शोधताना आधी 'जल' असण्याची खात्री करून घ्यावी कसं म्हटलंय. जगातल्या सर्व संस्कृती नदीकाठीच विकासित झाल्या आहेत. मात्र पाणी देणारा स्रोत समुद्र असतो.

हे नैसर्गिक जलचक्र लक्ष लक्षात घेऊन थोडा वैज्ञानिक विचार करून वेळीच नियोजन केले तर तहानेने व्याकूळ व्हावे लागणार नाही. ना भूमीला ना त्यावरच्या सजीवांना. मग आपण तर विचारी माणसे आहोत. अन्न, वस्त्र, निवाऱ्यापैकी अन्नाची 'फुड कोर्ट' निघतात. निवाऱ्यासाठी टोलजंग इमारती उभ्या राहातात पण पाण्यासाठी?... आम्ही 'कोणावर तरी' अवलंबून असतो. अन्न-वस्त्राची गरज स्वतः भागावतो तर 'वॉटर कन्झर्वेशन'चा विचारसुद्धा करायलाच हवा. आपल्या आणि पुढच्याही पिढ्यांच्या भवितव्यासाठी!

**– उल्हास मुकुंद परांजपे**
ट्रस्टी 'जलवार्धिनी प्रतिष्ठान'
भ्रमणध्वनी : ९८२०७८८०६१
www-jalvardhini.org
jalvardhini@gmail.com



# विद्यार्थी - हजर की गैरहजर?

डॉ. अंजली पटवर्धन-कुलकर्णी

जुलै महिना म्हटले की शाळा सुरू होऊन काही दिवस झालेले असतात उन्हाळ्याच्या सुट्टीचा, भाग घेतलेल्या शिबिरांचा अंमल थोडा कमी होऊन नवीन इयत्तेचा नवीन वर्ग, नवीन मित्रमैत्रिणी, नवीन विषय, नवीन शिक्षक आणि नवीन पुस्तके याचे नावीन्य आजून सरलेले नसते. काहींचे तर शाळा किंवा कॉलेजच नवीन असते. या सगळ्या नवीन गोष्टींशी जुळवून घेत, शाळा कॉलेजातील उपक्रमांमध्ये सामील होण्याचा प्रयत्न करताना विद्यार्थ्यांची खरी कसोटी लागत असते. अभ्यासक्रम आणि इतर उपक्रमांमध्ये त्यांना आवड निर्माण झाली, कुतूहल वाटायला लागले, जे शिकतोय त्याची उपयुक्तता जाणवली तर ते अधिक आनंदाने आणि लक्षपूर्वक सहभागी होतील. अन्यथा काही दिवसांनी वर्गातले काहीच कळत नाही, आवडत नाही असे होऊन त्यांचा शिकण्यातला रस कमी होतो. मग सुरू होते भोलानाथाची आळवणी, 'पाऊस पडू दे, शाळेभोवती तळे साचून सुट्टी मिळू दे, पोटात कळ येऊन ढोपर दुखू दे, आणि कहर म्हणजे आठवड्यात तीन तीन रविवार येऊ देत!' सुरू होते रजेच्या कारणांची मालिका आणि विद्यार्थी गैरहजर राहण्याचे प्रमाण वाढत जात सरतेशेवटी काही जण तर शिक्षण सोडून देण्यापर्यंत त्यांची मजल जाते. ड्रॉप आउट किंवा शाळाबाह्य असा शिक्का बसलेले हे विद्यार्थी शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात क्वचितच परत येतात. ते घरातल्या सदस्यांना मदत करण्यासाठी शेतावर, मजुरीवर जातात, छोट्या नोकऱ्या शोधून कसाबसा कुटुंबाचा चरितार्थ चालवण्यासाठी आयुष्यभर कष्ट करत राहतात. त्यांच्या जीवनाचा स्तर हा आर्थिकदृष्ट्या अत्यंत निम्न असल्याने पुढे जाऊन बालकामगार, आजारपण, व्यसनाधीनता, गुन्हेगारी अशा दुष्टचक्रात अडकत जातात. भारतातील परिस्थिती आपल्या परिचयाची आहे. परंतु अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्राच्या शैक्षणिक आकडेवारीचा अभ्यास केला तर असे लक्षात येते की विद्यार्थ्यांचे गैरहजर राहण्याचे प्रमाण तिथेही किती चिंताजनक आहे. अमेरिकेच्या शिक्षण विभागाच्या अहवालानुसार-

- १८ टक्के हायस्कूल विद्यार्थी म्हणजे अंदाजे तीन दशलक्ष विद्यार्थी नियमित गैरहजर असतात ज्यामध्ये सामान्य २० टक्के इंग्रजी हायस्कूल, २२ टक्के कृष्णवर्णीय आणि २० टक्के लॅटिनो विद्यार्थी आहेत. प्राथमिक शाळेतले साडेतीन दशलक्ष विद्यार्थी किंवा एकंदर विद्यार्थ्यांच्यातले ११ टक्के विद्यार्थी हे सातत्याने गैरहजर असतात. हे प्रमाण कृष्णवर्णीय विद्यार्थ्यांमध्ये जास्त असल्याची नोंद केलेली आहे.
- अमेरिकेच्या कामगार विभागाच्या पाहणीनुसार हायस्कूलमध्येच शाळा सोडलेल्या विद्यार्थ्याला हायस्कूल पूर्ण केलेल्या विद्यार्थ्याच्या तुलनेत आयुष्यभरात ३८५००० डॉलर कमी उत्पन्न मिळते, आणि पदवी पूर्ण केलेल्या विद्यार्थ्याच्या तुलनेत हायस्कूलपर्यंतच शिकलेल्या विद्यार्थ्याला १.३४ दशलक्ष डॉलर्सची कमी प्राप्ती होते.
- भारतात असा अभ्यास झाल्याचे वाचनात नाही; परंतु 'एज्युकेशन फॉर ऑल इन इंडिया' या संस्थेने केलेल्या अभ्यासानुसार २०२१-२२ (कोरोनाकाळानंतर) एकूण आकडेवारीमध्ये प्राथमिक शाळांमधून ड्रोप आउटचे प्रमाण १.५ टक्के, तर माध्यमिक स्तरावर विशेषतः नववी, दहावीमध्ये १२.६ टक्के इतके होते. एका शैक्षणिक वर्षाच्या कामकाजाचा १८० दिवसांचा काळ मोजला जातो. साधारणतः किरकोळ आजारपण, घरातील वा इतर अडचणी, समारंभ अशा कारणांनी विद्यार्थ्यांची १० टक्के अनुपस्थिती ग्राह्य धरली जाते. शाळा तसेच महाविद्यालयीन वर्गामध्ये ७५ टक्के उपस्थिती अनिवार्य आहे. आता या किमान उपस्थितीच्या प्रश्नामध्ये मुंबई उच्च न्यायालयानेही लक्ष घातले आहे.

विद्यार्थ्यांच्या गैरहजर राहण्यामुळे त्यांच्या आयुष्याची तसेच एकूणच समाजाची अपरिमित हानी होत असते. शाळा ही केवळ एक इमारत अथवा अशी जागा नाही की जिथे पुस्तकातील धडेच फक्त शिकवले जातात. शाळांकडे समाजाची छोटी आवृत्ती म्हणून बघितले तर शाळेमध्ये येणारी विविध स्तरांतील मुले सामाजिक कौशल्ये शिकतात आणि जोपासतात. आपल्या सवंगड्यांसोबत अर्थपूर्ण मैत्री निर्माण करतात.

पुढील आयुष्यात उपयोगी पडणारी जबादारीची जाणीव आणि आपुलकीची भावना शिकतात. नियमितपणे शाळेत येणारी मुले ही शिस्तीने वागणारी व अभ्यासामध्ये पूर्ण रस घेणारी, शाळेच्या विविध उपक्रमांमध्ये सहभागी होऊन अंगभूत गुणांचा विकास करून घेणारी असतात. महाविद्यालयामध्ये अधिक उन्नत अनुभव प्राप्त करून विद्यार्थी प्रगती करत असतात. विद्यार्थ्यांमधून देशाच्या नागरिकांची पुढची पिढी घडत असते म्हणूनच त्यांच्यावर शिक्षणाचे संस्कार होणे गरजेचे आहे. म्हणून तर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०मध्ये जी.आर.ई – शिक्षण नोंदणी प्रमाण हे २०३५ सालापर्यंत आता असलेल्या २६.३ टक्क्यांपासून ५० टक्क्यांपर्यंत वाढवण्याचे ध्येय निश्चित केले आहे. तसेच, उच्च शिक्षणामध्ये मल्टिपल एक्झिट आणि एंट्रीचा पर्यायही उपलब्ध करून दिला आहे.

हे ५० टक्के जी.आर.ई.चे ध्येय गाठायचे असेल तर विद्यार्थी सातत्याने गैरहजर राहण्याची कारणे नीट समजून घेतली पाहिजेत व त्यावर परिणामकारक उपायही केले पाहिजेत. विद्यार्थी गैरहजर राहण्याची काही प्रमुख कारणे अशी असू शकतात–

१) आर्थिकदृष्ट्या कमकुवत : मुलांना शाळेत न पाठवायचे एक कारण म्हणजे पैशांची चणचण. विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप, मध्यान्ह भोजन या सुविधा काहीअंशी उपलब्ध होत असल्या तरी लागणाऱ्या बाकीच्या खर्चासाठी पालक सोय करू शकत नाहीत. अनेक वेळा घरखर्च भागवण्यासाठी या मुलांना मजुरी करावी लागते, किंवा पालक कामावर गेले की मोठ्या मुलींवर घरातले आवरण्याची, धाकट्या भावंडाना सांभाळण्याची जबाबदारी येऊन पडते. यातून गैरहजेरीचे प्रमाण वाढून नंतर शाळाच सोडून दिली जाते. अशा कारणांसाठी मुलींना शाळा सोडावी लागण्याचे प्रमाण खूप मोठे आहे. कोरोनाकाळानंतर तर मुलींच्या बालविवाहाचे प्रमाणही वाढीस लागल्याचे लक्षात येते. पालकांना शिक्षणाचे आणि नियमित हजेरीचे महत्त्व लक्षात यायला हवे.

२) साधनांची कमतरता : शुद्ध हवा आणि पाणी, सकस अन्न आणि विद्यार्थ्यांच्या आरोग्याची नीट काळजी घेण्यासाठी लागणारी यंत्रणा सक्षम नसल्याने कुपोषण, अशुद्ध पाण्याने निर्माण होणारी रोगराई, दुष्काळातील अनंत समस्या यामुळे या मुलांचे शाळेत जाणे हे इतर गरजांच्या तुलनेत कमी महत्त्वाचे आणि म्हणून दुर्लक्षित राहण्याची शक्यता असते. तसेच, शाळेत किंवा महाविद्यालयात ये–जा करण्यासाठी लागणारी साधने उपलब्ध नसल्यानेही शाळेत गैरहजर राहण्याचे प्रमाण वाढते.

३) वैयक्तिक कारणे : अभ्यास करताना एकाग्रता न होणे, अभ्यासात रस न वाटणे, लक्ष न लागणे, शिक्षणाचा भावी आयुष्यात कसा उपयोग होईल याची खातरी नसणे, चुकीची संगत, योग्य मार्गदर्शन न मिळणे, इत्यादी.

या संदर्भात माझा एक विद्यार्थी, रमेश याचा अनुभव मला खूप काही शिकवून गेला. हा विद्यार्थी सकाळी साडेसातच्या तासाला नेहमीच दहा–पंधरा मिनिटे तरी उशिरा येत असे. असेल झाला उशीर असे समजून मी त्याला पाच–सहा दिवस वर्गात उशिरा येऊ दिले. विद्यार्थी शांत आणि वर्गात लक्ष देऊन ऐकणारा, नोट्स घेणारा असल्याने तो मुद्दाम उशिरा येतोय असे काही मला वाटले नाही. परंतु दररोज त्याला उशिरा आल्यावर वर्गात घ्यायचे तर मग इतरांनाही तशीच सूट देणे अपेक्षित होते. त्याचे रोज उशिरा येणे नियमात बसत नव्हतेच पण माझे आणि इतरांचेही लक्ष विचलित करू शकत होते. खोलीचा दरवाजा मागच्या बाजूला असता तरी फार त्रास झाला नसता, पण तो नेमका पुढच्या बाजूला फळ्याच्या जवळच होता. म्हणजे कोणीही आले किंवा गेले तरी लक्ष वेधले जाणे अपरिहार्यच. शेवटी वर्गात जाहीरच करून टाकले की उशिरा येणाऱ्यांना वर्गात प्रवेश दिला जाणार नाही. हे सांगितल्यावरही रमेश दहा मिनिटे उशिराच आला आणि परवानगी मागू लागला. त्याला मी यायला मनाई केली आणि वर्गाचे दार लोटून घेतले. तास संपल्याची बेल झाल्यावर मी दार उघडून बाहेर आले तर रमेश उंबऱ्यावर बसून लिहीत होता. लोटलेल्या दाराच्या फटीमधून जेवढे कानावर पडले ते त्याने उतरवून घेतले असावे. पटकन उठला व मान खाली घालून बाजूला झाला. मला त्याच्या उशिरा येण्याचे कारण जाणून घ्यायचे होते, म्हणून त्याला शिक्षककक्षात बोलावून घेतले. न रागावता मी त्याला विचारले, ताकीद देऊनही तो रोज उशीर का करत होता. आधी खूप घाबलेला, गोंधळलेला रमेश काहीच बोलेना. खूप खोदून विचारल्यावर तो म्हणाला, ''सॉरी मॅडम, मी मुद्दाम उशीर करत नाही, पण मला वडील नाहीत. माझ्या लहानपणीच वारले. मला एक धाकटा भाऊ आहे. माझी आई धुणीभांड्याची कामे करून घर चालवते. मी एका टेलरिंगच्या कारखान्यात कटाईचे काम करतो. हे काम जास्त जोखमीचे, एकाग्रतेचे आणि कौशल्याचे असते, त्याला शांतता लागते, म्हणून ही कामे पहाटे करावी लागतात. मी पहाटे तीन ते सकाळी सात कारखान्यात काम करतो आणि तिथूनच सव्वासातची बस पकडून पावणेआठपर्यंत कॉलेजला येतो. त्या आधी बसच नाही. सकाळी ही एवढी एकच बस असते. मला तास चुकवायचे नाहीत, जेवढा वेळ मिळेल तेवढे तरी लेक्चर ऐकता येईल म्हणून मी उशीर झाला तरी येतो. मी मुद्दाम उशीर नाही करत.''

त्याचे बोलणे ऐकून मला माझीच लाज वाटली. ज्या मुलांना आपण शिकवतोय त्यांच्या परिस्थितीची थोडी तरी जाण शिक्षकाला असलीच पाहिजे, हा आयुष्यभर पुरणारा धडा रमेशने मला दिला होता. या अनुभवातून, प्राचार्यांशी बोलून, इतर सहकाऱ्यांशी सल्लामसलत करून, थोडा अभ्यास करून, सगळीकडून येणाऱ्या सार्वजनिक वाहनांचे वेळापत्रक बघून आम्ही आमच्या महाविद्यालयाचे वेळापत्रक बदलले. रमेशसारख्या अनेक विद्यार्थ्यांनी, ज्यांना परिस्थितीमुळे गैरहजर राहावे लागते अशा मुलांनी अभ्यास सुरू ठेवावा यासाठी एवढे तर करायलाच हवे.

असेच एकदा वर्गात मॅस्लोची Hierarchy of Needsची थिअरी शिकवताना लक्षात आले की ही थिअरी आपण

परस्परसंवादाच्या यशस्वितेसाठीसुद्धा वापरू शकतो. म्हणजे माझे विद्यार्थी वर्गात नीट लक्ष देत नाहीत याची कारणे वैयक्तिक, सामाजिक, समूहाची असू शकतील, पण यामध्ये अब्राहम मॅस्लोने जी मानवी गरजांची वर्गवारी केली आहे त्यामध्ये शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या गरजांची पातळी भिन्न असेल तर शिक्षणप्रक्रिया यशस्वी होणारच नाही. म्हणजे मॅस्लोच्या मानवी गरजांचा पदानुक्रम-पिरॅमिड दर्शवते की व्यक्ती गरजा भागवण्यासाठी जगत असते. त्या पाच गरजांचा क्रम हा तळापासून वरच्या दिशेने वाढता असतो. सर्वप्रथम अगदी तळाला असते ती शारीरिक गरज-अन्न, वस्त्र, निवारा इत्यादी. पुढचा स्तर आहे सुरक्षिततेची गरज, तिसऱ्या क्रमांकावर येते ती प्रेम आणि आपलेपणाची गरज, चौथी असते ती सन्मानाची गरज आणि पाचवी आत्म-वास्तविकता, self-actualisationची पायरी. माझा तरुण, वाढीच्या वयाचा विद्यार्थी शासकीय होस्टेलमध्ये न्याहारी आणि जेवण एकदमच करून सकाळी सातलाच कॉलेजमध्ये येत असेल, तर दुपारी चारला त्याच्या पोटात भुकेचा वडवानल पेटलेला असताना भौतिकशास्त्राचे कोणते नियम, गणिताची कोणती प्रमेयं, भाषेतला कोणता गोडवा आत्मसात करायला उत्सुक असेल? म्हणजे गरजेच्या प्रथमिक, अगदी पहिल्या पातळीवर असलेल्या मुलाला त्याच्या चौथ्या अथवा पाचव्या पायरीच्या गरजेसाठी शिक्षक तयार करत असेल तर त्यांच्यात संवाद होणे शक्यच नाही. विद्यार्थी आणि शिक्षक दोघेही गरजेच्या सामान पातळीवर असल्याशिवाय त्यांच्यात शैक्षणिक आदानप्रदानाची प्रक्रिया होऊ शकत नाही. म्हणजे प्रत्येक शिक्षकाला त्याचा विद्यार्थी पूर्णपणे माहीत असणे गरजेचे आहे. बँकांना नो युअर कस्टमर - के.वाय.सी. करण्याची जशी गरज तशी शाळांनाही के.वाय.एस.- म्हणजे 'नो युवर स्टुडंट' करण्याची गरज आहे. आयएसओसारख्या ऑडिटनुसार विद्यार्थी हा शाळेचा ग्राहक आणि उत्पादन-प्रोडक्ट दोन्हीही आहे म्हणून खरं तर के.वाय.एस. आवश्यकच ठरते.

अनेकदा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची अभ्यासक्रमाची निवड चुकते आणि त्यातून त्यांना पराकोटीचे नैराश्य येते. या नैराश्यापोटी ही मुले कोणतेही टोक गाठू शकतात. केदारने वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या वर्षी नापास झाल्यामुळे आमच्या महाविद्यालयात कलाशाखेत प्रवेश घेतला. त्याच्या घरी तीन पिढ्या जुना वैद्यकीय व्यवसाय जोशात सुरू होता, केदारही डॉक्टरच होणार हे त्याच्या जन्मापासून त्याच्या मनावर बिंबवले गेले. त्याने घरच्यांना खूप सांगून पाहिले, वाद घातले, भांडणे केली पण त्याचा काही उपयोग झाला नाही. त्याने प्रथम वर्ष एम.बी.बी.एस. कसेतरी पास केले आणि यात आपला जीव रमत नाही म्हटल्यावर दुसऱ्या वर्षी नापासच होण्याचा चंग बांधला. अखेर घरच्यांनी 'कर काहीही', म्हणून त्याला आमच्या महाविद्यालयात कलाशाखेत प्रवेश दिला. हा बड्या बापाचा मुलगा, वर्गातल्या सर्वांच्यामध्ये दोन वर्षांनी मोठा, तेव्हा दादागिरी आलीच. इतर मुले, मुली त्याला वचकून असायची. वर्गात सर्वात शेवटच्या बाकावर बसून कोणाच्या खोड्या काढ, आवाज काढून वर्गात गोंधळ घाल, सांगितलेले काम टाळून कारणे सांग, असे उद्योग करत होता. मात्र परीक्षेत प्रश्नांची उत्तरे खूप चांगल्या पद्धतीने लिहीत असे. सर्वांनाच डोकेदुखी होऊन बसला होता. शेवटी आमच्या विभागाची बैठक होऊन या मुलाला समज द्यावी, ऐकले आणि वागणूक सुधारली तर ठीक नाहीतर त्याला कॉलेजमधून काढून टाकावे इथपर्यंत पाळी आली. आम्ही त्या दरम्यान एक प्रयोग करायचे ठरवले. त्याने चांगले, वाईट काहीही केले तरी त्याच्याकडे दुर्लक्ष करण्याचे ठरवले. म्हणजे जणू तो अस्तित्वातच नाही असे वागायचे. वर्गात प्रश्न विचारला, त्याने हात वर केला तरी त्याला उत्तर द्यायला सांगायचेच नाही, त्याने काहीही विचारले तरी त्याला रिस्पॉन्स द्यायचा नाही. त्याच दरम्यान चाचणी परीक्षा झाली आणि त्याने सगळ्यात जास्त मार्क पटकावले. त्याच्या उत्तरपत्रिकेवर मी 'व्हेरी गुड' असा शेरा मारला, पण वर्गात उल्लेख केला नाही. तो वैतागून माझ्याकडे आला, रडवेला झाला होता. ''तुम्ही माझ्याकडे असे दुर्लक्ष का करता? अॅज इफ आय डोन्ट एक्झिस्ट? मीही तुमचा विद्यार्थी आहे ना?'' मी त्याच्या याच बोलण्याची तर वाट बघत होते. त्याला म्हटले, ''मग तू विद्यार्थ्यासारखे वाग म्हणजे मी शिक्षकासारखे वागेन.'' हळूहळू त्याच्यात सकारात्मक बदल होत गेला, तिसऱ्या वर्षाच्या परीक्षेत त्याने विद्यापीठामध्ये प्रथम येण्याचा मान पटकावला. पुढे बंगळुरूच्या NIMHANS या संस्थेत शिकून मानसोपचारतज्ज्ञ झाला. आज केदार अनेकांचे मनोविकार बरे करण्यास साहाय्य करून समाजस्वास्थ्य वृद्धिंगत करण्यास मदत करतो आहे.

बोर्नव्हिटाने २०२२ मध्ये बालदिनानिमित्त एक Forced Packs अशी जाहिरात काही ठरावीक शहरांमध्ये प्रदर्शित केली होती. त्याची टॅग लाईन होती 'The Real You-Faith not Force'. त्यांनी बोर्नव्हिटाचे पॅकिंग बदलून, टॉयलेट क्लीनरच्या पॅक, अंड्यांच्या कार्टनमध्ये बोर्नव्हिटा भरले आणि ते विक्रीला आणले. ग्राहकांना संभ्रम पडणे साहजिक होते. त्यावर कंपनीचे स्पष्टीकरण असे की या पॅकवर ते जे असायला हवे त्यापेक्षा वेगळेच काहीतरी होण्याची बळजबरी करण्यात आली आहे, जशी (त्यांच्या पाहणी अनुसार) भारतात ८२ टक्के पालक आपल्या मुलांवर करतात, त्यांना जे व्हायचे आहे ते न होता दुसरेच काहीतरी बनण्याची बळजबरी! ही जाहिरात बोर्नव्हिटाच्या वेबसाईटवर बघता येईल.

आता विद्यार्थ्यांची शारीरिक हजेरी नोंदवण्याची अनेक साधने उपलब्ध आहेत, बायोमेट्री, अटेंडन्स मॅनेजमेंट सिस्टिम्स, सॉफ्टवेअर इत्यादी. गायकाला रियाजाचे, खेळाडूला सरावाचे जे महत्त्व तेच विद्यार्थ्याला नियमित उपस्थितीचे. परंतु विद्यार्थी शरीराने हजर असणे जितके आवश्यक तितकेच तो मनानेही वर्गात हवा!

**- डॉ. अंजली पटवर्धन-कुलकर्णी**
anjali.ptwrdhn@gmail.com



# जीवनदर्शन घडवणारी साहित्यिक धीरूबेन पटेल

संजीवनी खेर

स्वयंपाकघरात सारे विश्व सामावलेले असते असे म्हटले तर लोक कुत्सितपणे हसतील, म्हणतील, ''बरोबर आहे, किती शिकल्यासवरल्या तरी बायकांची झेप स्वयंपाकघराशी येऊन थांबते.''

छे छे, मी काही हे सहजपणे मान्य करणार नाही. कारण जगातील सर्व घटनांचे प्रतिध्वनी सर्वांना ह्या स्वयंपाकघरात ऐकू येतील, नव्हे येतातच. कसे? अहो, जगात महायुद्ध सुरू झाले तर लगेच वस्तूंची कमतरता जाणवते ती इथेच. पर्यावरणाचे संतुलन बिघडले तर जाणवते ते निकृष्ट दर्जाच्या भाज्यांत, जलवायू बिघडला तर बरोबर इथे कळते नि परिणाम जाणवतात. इथल्या स्त्रीला सगळ्याचे तारतम्य सांभाळावे लागते. कारण तिला जगाची नव्हे तर घरातील लहानथोरांच्या तब्येतीची काळजी वाहायची असते. त्यामुळे हसण्यापूर्वी जरा विचार करा. तुम्हाला संभाळणारे जिवाभावाचे कुणी आहे म्हणूनच निर्धास्तपणे बाहेरच्या जगात वावरू शकता. तिथली ऊब, तिथला गंध, रंग स्वाद सारेच आपल्या परिचयाचे असते. त्यावर कुणी इंग्रजीतून शंभर कविता लिहील आणि त्या रसिकांना प्रिय होतील असे वाटले नसेल. पण पीटर डी ओनिल ह्या जगप्रसिद्ध पत्रकार, अनेक टीव्ही चॅनेलचे संपादक-संस्थापक असलेल्या व्यक्तीला 'किचन पोएम्स' अभूतपूर्व वाटाव्यात ह्यातच त्या लेखनाचे महत्त्व अधोरेखित होते.

ह्या शंभर कविता गुजराती भाषेतील सुप्रसिद्ध लेखिका धीरूबेन पटेल हिने मुळात इंग्रजीतच लिहिल्या आहेत. त्याचे काही विशेष कारण ती देत नाही, त्याच भाषेत सुचल्या असे ती म्हणाली होती. त्याचा अनुवाद मराठीतील सुप्रसिद्ध कवयित्री उषा मेहतांनी केलेला आहे. गुजराती भाषेतील ती सिद्धहस्त लेखिका होती. हिंदीतूनही तिने लेखन केलेले आहे. मुलांसाठीही कथा, नाटके लिहिली आहेत. 'भवनी भवाई' आणि 'ममी तू आवी केवी' या तिच्या दोन कथांवर चित्रपट निघाले आहेत. वडील गोरधनभाई आणि आई गंगाबेन, दोन भाऊ असे सारेच



धीरूबेन पटेल

कुटुंब सत्त्वशील, मातापिता अगदी सच्चे गांधीवादी. आई स्वातंत्र्यसेनानी. सहा वेळा तुरुंगवास भोगलेली. त्याकाळात वडील स्वयंपाकापासून सर्व घरकामात मदत करत. आई काँग्रेस समितीत काम करत असे. स्त्रियांसाठी एक मासिकही चालवत असे. 'लेखिनी' ग्रुपमध्ये स्त्रियांना लेखनाला उत्तेजन मिळत असे. अशा मोकळ्या वातावरणात धीरेंद्रबाला वाढली होती. मात्र सारे जण तिला धीरूबेन म्हणत असत. मुलींना काय करायचे हे ठरवायची पूर्ण मुभा होती. त्यामुळे कुणीही तिच्यावर लग्नाची सक्ती केली नाही. आयुष्यभर तिने साधे आणि खादीधारी राहायचे व्रत घेतले होते.

तिच्या कथा, छोट्या कादंबऱ्यांत ती खूप मोठा आशय मांडत असते. तिच्या गाजलेल्या पुस्तकांत 'अधुरा कॉल', 'अतीत राग', 'एक लहर', 'एक भला मानस', 'वांसानो अंकुर', 'आंधली गली' ह्या साहित्यकृती अजरामर आहेत.

त्यांचे सारे घर रमणमहर्षींचे अनुयायी होते. एका अपघातात तिचा भाऊ वारला आणि दुर्दैवाने आईने ती सारी घटना पाहिली. त्याचा तिच्या मनावर खोल परिणाम झाला होता. त्यातून बाहेर येण्यासाठी त्यांनी तिला रमणमहर्षींच्या आश्रमात नेले तेव्हाचा अनुभव तिने मांडला आहे.


अगोदर तिच्या अफलातून कविता– 'किचन पोएम्स' या संग्रहाबद्दल सांगते.

'किचन पोएम्स'मध्ये ती म्हणते, 'एकदम उचंबळून आलं हृदय, छे छे इंद्रधनुष्य नव्हतं पडलेलं नजरेला, नजरेला पडली मंडईतली पहिली हिरवी कैरी गोड आणि आंबट, तिखट म्हणजे अगदी झणझणीत अगदी, चरचरीत फोडणीच्या, कधी नुसत्या तर कधी बोकरंबिकरं घातलेल्या, तेलात नाहीतर मिठात तर काही साखरेत बुडालेल्या कैरींच्या पदार्थांचं वर्णन, कैरीच्या चटपटीत स्वादाचं तोंडाला पाणी सुटेल असे अख्खं विश्व ती उभं करते! बरण्या भरल्या जातात, कपाटं-फडताळं भरून जातात पावसाच्या बेगमीनं.

अशीच एक चेहऱ्यावर स्मित फुलवणारी कविता – आणि तो भेटला, स्वप्नातला राजकुमार, उंच, देखणा, हनुवटीवर खळी, ठार बुडून गेले होते त्याच्या प्रेमात, हृदय दान करून टाकलं त्याला, तेवढ्यात त्यानं हसत हसत विचारलं, स्वयंपाक येतो ना ग तुला? झालं! स्वयंपाकघराच्या भिंती गरागरा फिरू लागल्या भोवती. तो उकाडा, तो घाम, ते न संपणारं काम काम काम... हा प्रश्न विचारायची गरज होती त्याला?

तिचा जन्म २९ मे १९३६चा वडोदऱ्याचा आणि मृत्यू १० मार्च २०२३चा अहमदाबादचा. शालेय शिक्षण सांताक्रूजच्या पोद्दार विद्यालयातून आणि एल्फिन्स्टन कॉलेजमधून इंग्रजी घेऊन बीए आणि एमए केलं. अत्यंत तीव्र बुद्धिमत्तेची ही विद्यार्थीनी होती. शिक्षण संपवून तिनं नोकरी केली ती भवन्स कॉलेज, नंतर दहिसर कॉलेज आणि भारतीय विद्याभवनमध्ये प्राध्यापक म्हणून. अत्यंत विद्यार्थीप्रिय प्राध्यापिका होती. 'आनंद', 'कलकी', 'सुधा' अशा प्रकाशनांमधून संपादक म्हणूनही काम केले. त्यात तिने नवोदितांना बरेच स्थान दिले. नवनवीन प्रतिभांचा शोध तिने घेतला आणि त्यांना प्रोत्साहन दिले. लहान मुलांसाठी तिने अनेक कथा, नाटके, कादंबऱ्या लिहिल्या. 'हकलबरी फीन', 'टॉम सॉयर' ह्या कादंबऱ्यांचे मुलांसाठी अनुवाद केले. तिच्या कथेवरील 'भवनी भवाई' चित्रपट अतिशय गाजला.

साहित्यक्षेत्राने तिला अनेक पारितोषिके देऊन गौरवले होते. साहित्य अकादमी, गुजराती साहित्य परिषद रंजीमतराम सुवर्ण चंद्रक ॲवॉर्ड, मुन्शी सुवर्ण मेडल, साहित्य गौरव, नंदकिशोर सुवर्ण मेडल, दर्शक ॲवॉर्ड अशा अनेक परितोषिकांनी तिला गौरवांकित केले होते. या खेरीज तिने लिहिलेल्या आणि त्यावर केतन मेहताने बनवलेल्या 'भवनी भवाई' ह्या चित्रपटातील




कथेसाठी तिला पारितोषिक मिळाले होते.

तिची लेखणी मानवी मनातील अत्यंत सूक्ष्म भावनांचा वेध घेत असते. अशीच एक छोटीशी कादंबरी आहे. 'आगंतुक'. मराठीतही उपलब्ध आहे. सुषमा करोगलने अनुवादित केली आहे. काही वर्षांपूर्वी घरादाराचा त्याग करून संन्यासी झालेल्या एका भावाचे अचानक परतणे, एवढीच घटना नि कथासूत्र आहे. त्यातून धीरूबेनने भावनांचा नि जवळच्या नातेवाईकांच्या वागण्याच्या वादळाचा कल्लोळ टिपला आहे, की वाचकाला ती कादंबरी झपाटून टाकते आणि एका फटक्यात वाचून संपवण्याला काही पर्याय राहत नाही. १९९५मध्ये प्रकाशित झालेली साहित्य अकादमीचे पारितोषिकप्राप्त ही कादंबरी आहे. अर्थात केवळ त्यामुळे ती श्रेष्ठ आहे, असे नाही तर त्यामुळे इतर भाषांतील वाचकांना ठाऊक झाली. तिचे थोडेफार साहित्य इतर भाषांतून अनुवादित झाले आहे. त्यामुळेच आपण त्याचा आस्वाद घेऊ शकतो.

आपापल्या चिमूटभर सुखात स्वार्थलिप्त वागण्याने मिळणारे सुख म्हणजेच यशाची परमावधी वाटणाऱ्या मुंबईत राहणाऱ्या भावाच्या घरी कुणीतरी येते. अनेक वर्षे हिमालयात प्रतापगिरीच्या आश्रमात राहणारा ईशान अचानक धाकटा भाऊकडे अर्णवकडे येतो. त्याला पाहून त्याच्या घरी जणू भूकंप होतो. आता हा साधू झालेला भाऊ परत का आलाय? संपत्तीतला वाटा हवाय? किती दिवस राहणार? त्याची उस्तपास्त कोण नि कशी करणार? त्याच्यामुळे आपले सगळेच रोजचे जीवन बिघडणार ह्याची चिंता घरातल्या स्त्रीवर्गाला पडते. आपणच का ह्याचा पत्कर, पाहुणचार करायचा? दुसरा भाऊही आहेच की शहरात त्यानेही जबाबदारी उचलावी! हा काही उद्योगधंदा करतोय की बसून खाणार? मुले आपली खोली शेयर करायला नाराज नसतात, पण आईलाच ते नको असते. काकाच्या प्रभावाने कुठे मुलगा साधूबिधू झाला तर? मिहीका, करण या मुलांना उत्सुकता असते त्याला भेटायची–बोलायची, पण आई-वहिनी खोडा घालते नि त्याला दूरच

ठेवते. कशी बशी नोकराच्या खोलीत त्याचे सामान म्हणजे एक पिशवी, पुस्तक ठेवायची व्यवस्था करते. ईशानमुळे आपले सोशल लाईफ डिस्टर्ब होईल ह्याची भीती तिला वाटू लागते. ती नवऱ्याला ह्या भावाची व्यवस्था दुसरीकडे वा मोठ्या भावाच्या मोठ्या फ्लॅटमध्ये करायची घाई करत असते. तो इथं राहणार असेल तर कामधंदा करायला सांगा असे सुचवत असते. अर्णवला ईशानबद्दल माया असते; पण बायकोलाही दुखावून चालणार नसते. ईशानची कुठेही राहण्यास हरकत नसते. त्याचे एकवेळचे जेवण, चहा न घेणे घरच्यांच्या पथ्यावरच पडते. घरातला नोकर मात्र ह्या दुराव्याने आणि ईशानच्या सज्जनपणामुळे चक्रावलेला असतो. ईशानला सारे कळत असते, पण तो तिकडे लक्ष देत नाही.

अखेर त्याची रवानगी आशुतोषच्या पॉश घरात होते तेथेही त्याची व्यवस्था गेस्टरूममध्ये न करता फ्रान्सिस ह्या नोकराच्या खोलीत होते. ईशानला त्याचे काही सुखदु:ख नसते. फ्रान्सिस तर त्याला आपला धर्मगुरूच मानू लागतो. ईशान त्याला बायबलमधील विचार समजावून सांगू लागतो. अर्णवकडे तर त्याची पत्नी, ईशान आपला आश्रम सोडून, साधूची वस्त्रे त्यागून का परतला? त्यामागे काहीतरी भानगड असली पाहिजे म्हणून तिकडली माहिती काढायला माणूस पाठवते. तो चुकीची माहिती देतो. इकडे त्याच्याकडील नोकर आणि फ्रान्सिस दोघांनाही भावांचे वागणे पसंत नसते ते ईशानला सांगतात पण तो दुर्लक्ष करायला सांगतो. इथे आशुतोषच्या घरी त्याचा दिनक्रम, ध्यान, प्राणायाम सुरू असते तेव्हाच एके दिवशी त्याच इमारतीत राहणाऱ्या एक अत्यंत धनाढ्य व्यक्तीची देखणी कन्या, ईप्सिता त्याला लिफ्टमध्ये भेटते. ती त्याला वाकून नमस्कार करते. पूर्वी ती आणि तिचा भाऊ रजत ईशानला आश्रमात भेटलेले असतात. दोघेही ब्रह्म जिज्ञासेने तिथे आलेले असतात.

एक दिवस ईप्सिताचे वडील ईशान आणि त्याच्या भाऊ नि वहिनीला चहाला बोलावतात. हा नकार देतो, पण भावाच्या मते 'ही पार्टी मालदार आहे त्यांचे बोलावणे टाळणे योग्य नाही. तुमचे सारे जीवन बदलून जाईल.' तो जातो, पण मानसन्मान स्वीकारत नाही. आपण आता कशाय वस्त्रे त्यागलेली आहेत तेव्हा या मानाचे अधिकारी नाही असे सांगतो. भाऊ-वहिनीला त्याचे बोलणे खटकते. तो रजतला भेटायला जातो. त्यासाठीच शेटजींनी तिथे बोलवलेले असते. रजत मृतवत पडलेला असतो. डॉक्टरांच्या मते आता उपाय शिल्लक राहिलेला नसतो. ईशानचे त्याच्याजवळचे अस्तित्व, त्याचा हात हाती घेऊन बोलत राहणे आणि रजतने हळूहळू शुद्धीत येणे सारेच चमत्काराहून कमी नसते. त्यांची कीर्ती सर्वत्र पसरू लागते. परंतु तो टाळत असतो.


इकडे भावांना अचानक प्रेमाचा पुळका येतो. आपल्या भावावर आपला हक्क आहे. शेटजीच मोनोपोलाईज करू शकत नाहीत. आपण त्याच्यासाठी एक मोठा आश्रम काढू, भरपूर जाहिरात करू, ईशान प्राणायाम, योग शिकवेल. त्यांचा उत्साह उतू जात असतो. भाचरे प्रेमाने काकांचे कौतुक ऐकत असतात. ते ईशानला हवा असलेला आईचा फोटो शोधून आणून देतात. एका क्षणी तो ठरवतो की आपण आता वृंदावनात जायचे. नाहीतर इथेच संसारी, हिशेबी जीवनात आपण अडकून पडू. या व्यवहारी जगात आपल्याला जायचे, राहायचे नाहीये. जेथे फक्त स्वार्थ, अहंता, काही ना काही मिळवायची आस आहे, माणुसकी नाही, नातीगोती महत्त्वाची नाहीत तिथे राहायचे नाही. असे ठरवून, मोहमाया सोडून तो निघून जातो. अर्थात ईप्सिता, रजत यांचे प्रश्न मार्गी लावूनच तो कृष्णाच्या नगरीला निघून जातो. त्याचा आध्यात्मिक जगातील प्रवास तो सुरू ठेवतो.

वास्तविक शंभरएक पानांची ही कादंबरी, परंतु मानवी स्वभावातील बारकावे, महानगरातील लोकांची स्वार्थी वागणी, त्यांचे डावपेच, आश्रम संस्थेतील राजकारण नेमकेपणाने लेखिका दाखवते. मार्मिक वाक्यांनी वाचकांना चकित करते. संसार आणि संन्यास यातील भेद फक्त शब्दांचा नाही तर वृत्तीचा आहे. प्रत्येक कृतीतून स्वार्थ, आपमतलबीपणा, हावरेपणा घरदार सोडून गेलेल्याला दिसत असतो. त्याने वेगळीच वाट निवडलेली असते. इथे तो रमणे शक्य नव्हते. ईप्सिता, रजत, करण, फ्रान्सिस यांच्याशी पुन्हा जुळू पाहत असलेली नाती तो हळुवारपणे दूर करतो. त्यांच्या आयुष्यात त्याला गुंतायचे नसते. महानगरी जीवनातील कोलाहल त्याला विद्ध करतो म्हणूनच तो आपल्या आध्यत्मिक शांतीच्या शोधात वृंदावनला निघून जातो.

मध्यमवर्गीय लोक पाहता पाहता स्वकेंद्रित होऊ लागलेले तिने जाणले होते. म्हणूनच त्याकाळी ठाऊक नसलेला विषयांचा संघर्ष तिने एका लघुकथेत पकडला, तेव्हा एकत्र कुटुंब हेच सार्वत्रिक वास्तव होते. तेव्हा वयस्कांनी स्वतंत्र राहण्याची कल्पनाच त्या काळात कुणी करू शकत नव्हते. तेव्हा ती त्याबाबत लिहीत होती. शहर वाढू लागले, घरांची कमतरता जाणवू लागली आणि जुने बंगले पाडून मोठ्या इमारती उभ्या राहू लागल्या. तरुण पिढीमुळे वयस्क लोकांना पैशांसाठी तिथून बाहेर पडायला भाग पाडले जाऊ लागले. पैसा हा मोठा भाग होताच. साहित्याने इतक्या संवेदशीलतेने सामाजिक बदल टिपणे महत्त्वाचे होते.

धीरूबेनचे कथाविश्व किती सार्थ नि समाजजीवन दाखवणारे होते नि आहे ह्याचे तिचे लेखन हे द्योतक आहेत. स्वत: अत्यंत संवेदनशील असल्याने तिचे लेखन आजही रसिक वाचकाला प्रभावित करते.

**– संजीवनी खेर**
sanjeevanikher@gmail.com



# द वॉर ऑफ द एन्ड ऑफ द वर्ल्ड

**मारिओ व्हर्गस योसा**

**The War of the End of the World**

by Mario Vargas Llosa

राजीव श्रीखंडे

मारिओ व्हर्गस योसा हा दक्षिण अमेरिकेतील पेरू देशातला. कथा, कादंबऱ्या, नाटके, निबंध लिहिणारा, नोबेल पुरस्कारप्राप्त एक श्रेष्ठ लेखक. याव्यतिरिक्त पत्रकार, प्राध्यापक आणि एक राजकारणी म्हणूनही तो प्रसिद्ध आहे.

सध्या स्पेनमध्ये स्थायिक झालेल्या योसा याचा जन्म १९३६ मध्ये पेरूतील दुसरे मोठे शहर Arequipa इथे झाला. तेव्हा त्याचे आजोबा- आईचे वडील - पेरूचे राजदूत म्हणून बोलिव्हियात Cochabamba या गावी कार्यरत होते. योसाच्या आईवडिलांमधील अतिशय दुरावलेल्या संबंधांमुळे तो जन्म ापासून वयाची ९ वर्षे होईपर्यंत तिथे राहिला आणि शिकला. त्यानंतर एक वर्ष तो आई-आजोबांसह उत्तर पेरूतील पिऊरा (Piura) या एका लहानशा गावात राहिला. योसा १० वर्षांचा होईपर्यंत त्याला त्याचे वडील हयात नाहीत असेच सांगितले जात होते. नंतर १९४६ साली त्याचे वडील आले, त्यांनी आपल्या पत्नीबरोबर संवाद साधला आणि तिला आपल्या मुलासमवेत घेऊन ते लिमा इथे राहायला गेले.

योसाला लहानपणापासूनच वाचनाचे प्रचंड वेड. दयुमाचे The Three Musketeers आणि तशा तऱ्हेची अनेक पुस्तके त्याने वाचली होती. त्यामुळे त्याला लिहिण्याचीही हौस निर्माण झाली. लहानपणी आईच्या लाडात वाढत असताना त्याला आपला छंद भरपूर जोपासता येत होता. परंतु वडिलांबरोबर राहायला आल्यानंतर आणि शालेय शिक्षण चालू झाल्यानंतर वडिलांची कडक शिस्त आणि असंवेदनशील वागणूक याचा त्याला जाच होऊ लागला. अखेरीस त्याच्या छंदापासून बळजबरीने परावृत्त करण्यासाठी वडिलांनी त्याला Leoncio Produ या सैनिकी विद्यालयात १९५० साली म्हणजे त्याच्या वयाच्या चौदाव्या वर्षी पाठवले. तेथील दोन वर्षांच्या वास्तव्यात त्याला बरेच कटू अनुभव आले. नंतर त्याने सॅन मार्कोस येथील विद्यालयात प्रवेश घेतला. तिथे कायदा आणि साहित्य या विषयांचे अध्ययन केले आणि पदवी मिळवली.


योसाने त्याच्या या शैक्षणिक प्रवासात आपला वाचन-लेखनाचा व्यासंग अविरत चालूच ठेवला. वयाच्या १६व्या वर्षीच त्याने The Escape of the Incas नावाचे एक तीन अंकी नाटक लिहिले. हे त्याचे आयुष्यातले पहिलेच प्रकाशन होय! पुढे १९५१ साली वयाच्या १९व्या वर्षी वडिलांच्या जबरदस्तीच्या वागणुकीमुळे आलेल्या उद्वेगातून त्याने आपल्यापेक्षा ११ वर्षांनी मोठ्या असलेल्या आपल्या मामीच्या बहिणीशी लग्न केले.

सन १९५९ मध्ये त्याने लिहिलेल्या लघुकथांचा मोबदला म्हणून त्याला पॅरिसला जाण्याची संधी मिळाली. तो तिथे सात वर्षे राहिला. त्या काळात त्याने शिष्यवृत्ती मिळवून माद्रिद विद्यापीठातून डॉक्टरेट मिळवली. पॅरिसमध्ये असताना त्याने पत्रकार आणि नभोवाणीवर निवेदक म्हणून काम केले. त्यानंतर तीन वर्षे लंडनमध्ये आणि पुढची चार वर्षे बार्सिलोनात काढली. त्याने १९६४मध्ये आपल्या पत्नीशी घटस्फोट घेतला आणि १९६५ साली आपल्याच कुटुंबातील एका मुलीशी लग्न केले. योसा १९७४ साली लिमा इथे परतला.

लहानपणीच त्याने मार्क्सवादाचा सखोल अभ्यास केला होता आणि त्या विचारसरणीचा त्याच्यावर पगडा बसला होता. त्यामुळे १९५३मध्ये फिडेल कॅस्ट्रोने लष्करी हुकूमशाहीविरुद्ध सशस्त्र क्रांती करून क्युबामध्ये आपली सत्ता प्रस्थापित केली तेव्हा योसाचा त्याला पाठिंबा होता. परंतु पुढे योसाचा मूळ डाव्या विचारसरणीवरचा विश्वास उडाला. खुद्द पेरूमध्येही १९४८ सालापासून ८ वर्षे सत्तेत असलेल्या जनरल ऑड्रिओचा निरंकुश कारभारही त्याला माहीत होता. नुसत्याच वैचारिक पातळीवर न राहता त्याने १९५८मध्ये ॲमेझॉनच्या जंगलात जाऊन तेथल्या मागासलेल्या लोकांशी धर्मप्रसारक आणि राजकारणी मंडळी कशा तऱ्हेने वागतात आणि तेथे कायदा-सुव्यवस्था याचा मागमूसही कसा नव्हता हे प्रत्यक्ष अनुभवले होते. पेरूमध्ये वारंवार होणाऱ्या सत्ताबदलाचाही त्याला अनुभव

येत होताच.

एकूण अभ्यासातून, विचारमंथनातून आणि प्रत्यक्ष अनुभवातून त्याची एक धारणा पक्की झाली की राजवट ही कोणतीही असो, तिथे लोकशाही, उदारमतवाद आणि विचारस्वातंत्र्य नसेल तर ते त्याला कदापीही मान्य होणार नाही. योसाने १९८७मध्ये एक नवीन, काहीसा उजवीकडे झुकलेला स्वतंत्र राजकीय पक्ष स्थापन केला आणि अमेरिकेचा पाठिंबा असलेल्या Free Demo या नावाने तयार झालेल्या आघाडीमार्फत त्याने १९९०मध्ये राष्ट्राध्यक्षपदासाठी निवडणूक लढवली. पहिल्या फेरीत तर तो यशस्वीही झाला, पण अखेरीस हरला. त्याने पुन्हा मग कधीही निवडणूक लढवली नाही. १९९०मध्ये त्याने स्पेनचेसुद्धा नागरिकत्व घेतले. तेव्हापासून तो बराचसा काळ माद्रिदमध्ये राहतो आणि काही काळ पेरूमध्ये राहतो.


मारिओ व्हर्गस योसा

त्याने लिहिलेल्या पुस्तकांचे विषय अगदी वेगवेगळे आहेत. स्वानुभवावरची पुस्तके तर आहेतच, त्याव्यतिरिक्त आत्मचरित्रपर पुस्तके, ऐतिहासिक, सामाजिक आणि अनेकविध विषयांवरील कादंबऱ्या, रोमांचकारी कथा, ललित लेख, निबंध असे चतुरस्र लेखन करून योसाने कसदार साहित्यसंपदा निर्माण केली आहे. आजही माद्रिदमधील वृत्तपत्रांसाठी लेख लिहिण्याचे काम योसा सतत करत आहे.

योसावर फ्रेंच लेखक Gustove Flaubert, Jean Paul Sartre, अमेरिकन लेखक William Faulkner यांचा प्रभाव आहे. त्याचे आवडते लेखक म्हणजे कोलंबियाचा प्रसिद्ध लेखक Gabriel Garcia Marquez, अर्जेन्टिनाचा जगविख्यात लेखक Jorge Luis Borges, फ्रेंच लेखक अल्बर्ट कामू आणि जीन पॉल सार्त्र आणि अमेरिकन लेखक Ernest Hemingway. विसाव्या शतकात ज्या लेखकांनी लॅटिन अमेरिकन देशांच्या साहित्याला जगभर मानाचे स्थान मिळवून दिले आहे त्यात योसा अग्रेसर आहे.

योसाला अनेक पुरस्कार मिळालेले आहेत. १९९५मध्ये स्पॅनिश भाषेतला सर्वोच्च मानला गेलेला Cervantes पुरस्कार त्याला देण्यात आला आणि २०१०मध्ये त्याला साहित्याचे नोबेल पारितोषिक मिळाले. नोबेल पारितोषिकाच्या प्रशस्तिपत्रकात असे लिहिले आहे, की 'कोणत्याही सत्तास्थानाचा अगदी बारीकबारीक तपशिलासकट जणू नकाशाच सादर करणारा आणि या सत्तेला एखादी व्यक्ती कसा प्रतिकार करते, त्याच्याविरुद्ध कशी बंड पुकारते आणि पराभूत होते याचे अत्यंत प्रभावशाली आणि परिणामकारक चित्र हुबेहूब दाखवणाऱ्या या लेखकाला हे पारितोषिक देण्यात येत आहे.'

जगभरच्या अनेक भाषांत त्याच्या साहित्याचे भाषांतर झालेले आहे. त्याच्या बऱ्याच कादंबऱ्यांवर चित्रपट निघालेले आहेत. चाकोरीबाहेरचे विषय समर्थपणे हाताळणारा योसा हा जागतिक वाङ्मयातला एक फार मोठा आणि यशस्वी लेखक आहे, पण त्याच्या निर्भीड लिखाणामुळे तो तेवढाच वादाच्या भोवऱ्यात राहिलेला आहे.

आता मी The war of the end of the world या कादंबरीकडे वळतो. ही कादंबरी प्रसिद्ध झाली १९८१ साली. या कादंबरीचे वैशिष्ट्य म्हणजे ब्राझीलमध्ये एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी प्रत्यक्ष घडलेल्या घटनांवर आधारलेली ही योसाची पहिलीच ऐतिहासिक कादंबरी आहे. त्यामागचा थोडासा इतिहास असा.

ब्राझीलमध्ये लष्कराने नोव्हेंबर १८८९मध्ये उठाव करून, सत्ता काबीज करून प्रजासत्ताक राज्याची स्थापना केली. या प्रक्रियेत राजाविषयी आदर असणाऱ्या बऱ्याच जनतेत काहीशी नाराजी निर्माण झाली. या आधीच एका वर्षांपूर्वी गुलामगिरीही बंद झाल्याने अनेक गुलाम विस्थापित झाले होते. त्याचप्रमाणे राजसत्तेत हितसंबंध गुंतलेल्या लोकांच्यातही अस्वस्थता निर्माण झाली होती. अशी हळूहळू वाढत चाललेली अस्थिरता नियंत्रणात ठेवण्यासाठी लष्कराला लक्ष केंद्रित करणे भाग पडत होते.

याचवेळी ब्राझीलच्या ईशान्य भागातील देशांपासून काहीशा दूर पडलेल्या बाहिया या प्रदेशातील स्थिती तर फारच हलाखीची आणि दयनीय होती. तुटपुंज्या शेतीवर आणि गुराढोरांच्या देखरेखीवर येथील  गरीब मंडळी कशीबशी गुजराण करत होती. हा प्रदेश शेतीप्रधान पण दुष्काळी आणि म्हणूनच वैराण तसेच पायाभूत सवलतींचा पूर्ण अभाव असलेला. त्यामुळे शासनाविरुद्धचा राग लोकांच्या मनात खदखदत होता.

अशा परिस्थितीत Counsellor म्हणून ओळखला जाणारा एक धर्मगुरू नावारूपाला आला. तो या भागात बरीच वर्षे फिरत होता. हा धर्मगुरू प्रत्येक खेड्यापाड्यात जायचा तिथे असलेल्या जीर्ण अवस्थेतील चर्चची आणि कब्रस्थानाची डागडुजी करायचा आणि निरनिराळ्या लोकांशी संवाद साधायचा. आकर्षक व्यक्तिमत्त्व व परिणामकारक वक्तृत्व आणि अतिशय साधी राहणी, नम्र वागणे, निरिच्छ वृत्ती, सर्वांना मदत करण्याची सतत धडपड यामुळे तो लोकांना फार जवळचा वाटू लागला. त्याच्या भाषणात हा काऊन्सेलर धार्मिक बाबी सामान्य जनतेला अगदी साध्यासोप्या भाषेत समजावून सांगायचा. तो असेही सांगत असे की या जगाच्या अंताला सामोरे जायचे असेल तर लोकांनी त्यांचे जीवन परमेश्वराला समर्पित केले पाहिजे. हा काऊन्सेलर स्वतःला देवाचा प्रेषित म्हणवून घ्यायचा. त्याने बाहिया अगदी पिंजून काढला आणि शेवटी तो कोनुडोसमध्ये आला. तेथेच त्याने कायम वास्तव्य करण्याचा निर्णय घेतला. ती जागा तिथल्या एका जमीनदाराच्या होती. हे साल होते १८९३. तोपर्यंत त्याची कीर्ती बाहिया प्रांतात सर्वदूर पसरली होती. त्यामुळे त्याला भेटण्यासाठी, नव्हे त्याच्या बरोबर राहण्यासाठी अनेक लोकांनी कोनुडोसचा रस्ता धरला. बघता बघता ही संख्या हजारोंच्या घरात गेली आणि कोनुडोसला एका वसाहतीचे स्वरूप आले. तिथे मग काऊन्सेलरने सर्वांच्या मदतीने मोठे चर्चही बांधले. आपल्याला हे लक्षात ठेवले पाहिजे तिथले सगळेच रहिवासी हे समाजाच्या तळागाळातले लोक होते. त्यात विविध वंश आणि वर्णाचे लोक होते. त्यात गरीब शेतकरी होते, गुलामगिरी संपुष्टात आल्यामुळे देशोधडीला लागलेले गुलाम होते, भुरटे चोर होते, निर्वासित होते, काही धर्मगुरू होते, अपंग होते, शारीरिक व्याधींनी जर्जर झालेली माणसे होती, शारीरिक व्यंगांमुळे समाजाचा तिरस्कार प्राप्त झालेले लोक होते, पळालेले गुन्हेगार होते, दरोडेखोर होते, वेश्या होत्या. या वसाहतीची रचना काऊन्सेलरने जेरुसलेमच्या धर्तीवर केली होती आणि या वसाहतीत फक्त त्याचे कायदेकानू चालत. इथे ब्राझीलमधील कुठलेही कायदे लागू नव्हते. या वसाहतीद्वारे काऊन्सेलरने जणू एका स्वतंत्र प्रतिप्रजासत्ताकाची निर्मितीच केली. म्हणजे एक खराखुरा वर्गविरहित समाजच निर्माण झाला. इथे प्रत्येकाला समान हक्क होते, पूर्ण स्वातंत्र्य होते अर्थात काही मूळ नियम ंच्या चौकटीतच. इथे कोणी मोठा नव्हता, कोणी छोटा नव्हता. प्रत्येक जण सामान पातळीवर होता. त्यावेळी बाहियामधले ते दुसऱ्या क्रमांकाचे गजबजलेले ठिकाण झाले.

पुढे नोव्हेंबर १८९६मध्ये एक छोटा प्रसंग घडला. इतिहासात आपण बऱ्याचदा असे बघितले आहे की काही छोट्या प्रसंगामुळे पुढे फार मोठी स्थित्यंतरे घडून येतात. इथेही तसेच घडले. झाले असे, की एका गावात नवीन आलेल्या स्थानिक न्यायाधिशाने कोनुडोसचे लोक आपल्या गावावर हल्ला करणार आहेत अशा तऱ्हेची अफवा पसरवण्याची व्यवस्था केली. या भीतीपोटी त्याने स्थानिक प्रशासनाकडे संरक्षणाची मागणी केली. म्हणून त्या प्रांताच्या राज्यपालाने सैनिकांची एक तुकडी गावाच्या रक्षणार्थ पाठवली.

खरे म्हणजे हल्ला झाला तर रक्षण करायचे एवढीच जबाबदारी या सैनिकांची होती. परंतु त्या स्थानिक न्यायाधीशाच्या भरीला पडून त्यांनी कोनुडोसवर चाल केली. त्या प्रदेशाची त्याला काहीच कल्पना नव्हती. कोनुडोसच्या लोकांनी त्याच्यावर प्रतिहल्ला चढवला. त्यांचा पूर्ण नायनाट केला. सगळ्यात आश्चर्याची बाब म्हणजे कोनुडोसच्या या रहिवाशांकडे अगदी साधी शस्त्रे होती - म्हणजे कुऱ्हाडी, विळे-कोयते, लोखंडी दांड्या, जुन्या बंदुका, कुदळ, फावडी, शेतकामाची बाकीची काही अवजारे इत्यादी. या पराभवाचा बदला म्हणून दुसरी मोठी फौज पाठवली गेली, पण तिचाही नि:पात झाला.

ब्राझीलमधील वृत्तपत्रांनी बाहियामधील संघर्षाच्या बातम्या देण्यास सुरुवात केली. मग आणखी मोठ्या फौजेला एका वरिष्ठ, निष्णात अधिकाऱ्याच्या अधिपत्याखाली पाठवण्यात आले. तिच्याबरोबर मोठा तोफखानाही होता. हजारांच्या घरात सैनिक होते. तेव्हाही तुंबळ लढाई झाली. दोन्ही बाजूंचे अनेक लोक मारले गेले, पण रहिवाशांच्या अत्यंत समर्थ आणि आक्रमक प्रतिकारामुळे या सैन्यावरही पराभवाची नामुष्की आली आणि त्यांचा सेनापतीही यात मृत्यू पावला. लष्कराच्या या सलग पराभवांची बातमी ब्राझीलभर पसरली. याचा गवगवा सगळ्या ब्राझीलमध्ये झाला. तिथल्या लष्कराला, शासनकर्त्यांना, विचारवंत/बुद्धिजीवी लोकांना आश्चर्याचा धक्काच बसला. ही सगळी गरीब, पीडित, शोषित माणसे प्रजासत्ताकाच्या विरुद्ध असे बंड कसे काय करू शकतात याचे त्यांना मोठे कोडे पडले. ब्राझीलमध्ये असा विचार दृढ झाला की हे सगळे पूर्वीच्या राजसत्तेला अनुकूल असणाऱ्या लोकांचे काम आहे, हे सगळे त्या गरीब आणि वंचित लोकांना भडकावत आहेत, म्हणजे तिथले जमीनदार, तिथला एक राजकीय पक्ष, पूर्वीच्या सरकारात हितसंबंध गुंतलेली माणसे, त्या सरकारात काम करणारे जुने अधिकारी. त्यांनी अशीही हाकाटी सुरू केली की इंग्लंड कोनुडोसच्या बंडखोरांना शस्त्रेही पुरवत आहे. या सर्व बाबींचा ब्राझीलमधल्या वृत्तपत्रांनीही जोरदार प्रचार केला. अर्थात यात एक टक्कादेखील सत्य नव्हते. हे बंड लवकरात लवकर चिरडून टाकण्याचा त्यांनी शासनाकडे आग्रह धरला. शेवटी जून १८९७मध्ये फार मोठ्या सुसज्ज फौजेने या वसाहतीवर हल्ला केला. काही महिने तुंबळ युद्ध चालले. दोन्ही बाजूंची बरीच प्राणहानी झाली. शेवटी ऑक्टोबर १८९७मध्ये लष्कराला या वसाहतीत प्रवेश करण्यास यश आले.

जवळजवळ ९० डायनामाइट बाँब लावून हे गाव उद्ध्वस्त करण्यात आले, सगळी घरे जाळून भस्मसात करण्यात आली. तिथल्या उरल्यासुरल्या रहिवाशांची अगदी शरणार्थींचीही सरसकट कत्तल करण्यात आली. त्यात पुरुष आणि स्त्रिया होतेच, पण लहान मुलेही होती. अशा तऱ्हेने या वसाहतीचा पूर्ण नाश झाला. केवळ १५० माणसे बंदी बनवली गेली. सप्टेंबर महिन्यात The Counsellor हा आधीच डिसेंट्रीमुळे मरण पावलेला होता. या सर्व घटनांना War of Conudos म्हटलं जातं. एका अंदाजाप्रमाणे कोनुडोसचे साधारणतः २५००० लोक यात ठार मारले गेले आणि लष्कराचे साधारणतः ५००० सैनिक. ब्राझीलचे एक यादवी युद्ध अशी याची इतिहासात नोंद आहे पण बऱ्याच अभ्यासकांना हे अमान्य आहे. एका छोट्या वसाहतीचा पूर्ण नायनाट करण्याला यादवी युद्ध म्हणणे हे कितपत बरोबर आहे असा रास्त प्रश्न ते विचारतात.

या सगळ्या जगावेगळ्या घटनांचे अत्यंत भेदक चित्रण योसाने या कादंबरीत तपशीलवार केले आहे. यासाठी त्याने त्याला लेखक म्हणून असलेल्या कलास्वातंत्र्याचा अप्रतिम उपयोग केला आहे. मूळ घटनांच्या चौकटीला धक्का न लावता योसाने यात अनेक प्रसंग गोवले आहेत. खऱ्या आणि काल्पनिक घटना, खऱ्या आणि काल्पनिक व्यक्तिरेखा हे अत्यंत खुबीने मूळ कथानकाच्या चौकटीत गुंफून या अतर्क्य, जीवघेण्या संघर्षाचे सगळे चित्रच योसाने विशाल कथापटलावर अत्यंत दाहक स्वरूपात मांडले आहे.

या कादंबरीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे कोनुडोसच्या वसाहतीचे वर्णन. तिथली ती माती, चिखल आणि गवताची घरे म्हणजेच झोपड्या, काऊन्सेलरने बांधलेले ते भव्य चर्च आणि त्यावरचा घंटा असणारा मनोरा, त्याच्या शेजारी दिमाखाने उभे असलेले दोन उंच दगडी मनोरे, दाटीवाटीच्या झोपड्यांमधील वेगवेगळ्या संतांची नावे असलेले अरुंद, खडबडीत रस्ते, तिथे सकाळी असणारा समूहप्रार्थनेचा धीरगंभीर आवाज, दर संध्याकाळी काऊन्सेलरचे प्रवचन ऐकण्यासाठी होणारी रहिवाशांची गर्दी काऊन्सेलरचे अत्यंत प्रभावी पण मृदू, साध्यासोप्या भाषेत असलेलं मूळ गोष्टी सांगणारे प्रवचन हे जणू आपण प्रत्यक्ष अनुभवत आहोत अशी जाणीव होते. याचबरोबर या वसाहतीमधील समूहजीवन, त्यांचे कायदेकानू, त्यातल्या वेगवेगळ्या माणसांची दिनचर्या, त्यांचे एकमेकांशी संबंध आणि या सगळ्यांची काऊन्सेलरवर असणारी पराकोटीची श्रद्धा आणि छोट्या छोट्या प्रसंगातून होणारे त्याचं प्रकटीकरण. या वसाहतीचे हे आगळेवेगळे जग योसाने आपल्यासमोर मूर्तिमंत उभे केलेले आहे.

असंख्य व्यक्तिरेखांनी भरलेली ही कादंबरी आहे. कोनुडोसचे जे रहिवासी आहेत त्या प्रत्येकाचे पूर्वीचे आयुष्य आहे, प्रत्येकाची वेगवेगळी कथा आहे, या व्यक्तिरेखा उभ्या करताना योसाने या प्रत्येकाचे आयुष्यचित्रच रेखाटले आहे आणि तेही प्रत्ययकारी शब्दांत. त्यामुळे ही सगळी माणसे जिवंत झालेली आहेत. अनेक चित्रविचित्र व्यक्तिरेखांची या कादंबरीत रेलचेल आहे. त्याचबरोबर काऊन्सेलरची ती गूढ व्यक्तिरेखा. जणू तो एक संतच आहे. अतिशय साधा, दयाळू, क्षमाशील, व्यक्तिगत गरजा जवळजवळ नसणारा, आपल्या विचारांवर आणि निष्ठांवर ठाम असणारा, परमेश्वराचे खरे राज्य स्थापन करण्यासाठी कटिबद्ध असणारा, त्यासाठी पूर्ण बलिदानाला तयार असणारा आणि आपल्या अनुयायांना या कल्पनेने भारून टाकणारा असा हा जगावेगळा काऊन्सेलर. लष्करी अधिकारी, स्थानिक पत्रकार, वेगवेगळ्या राजकीय पक्षांचे त्या प्रांतातले नेते, त्यांचे अनुयायी, स्थानिक प्रशासनामधली माणसे अशा सगळ्या व्यक्तिरेखा योसाने अत्यंत ताकदीने रंगवल्या आहेत. या प्रत्येक व्यक्तिरेखेला त्याने पूर्ण न्याय दिलेला आहे आणि हे इतक्या सहजगत्या केले आहे की त्याला तोड नाही.

समाजातील सगळ्यात खालच्या स्तरावरील लोकांनी एका माणसाच्या आदेशानुसार एकत्र येणे, त्याच्याबरोबर वसाहत निर्माण करणे, परमेश्वराचे राज्य स्थापन करण्यासाठी स्वतःला आमूलाग्र बदलून टाकून या भव्य कार्यात हिरिरीने सहभागी होणे, काऊन्सेलरच्या सांगण्यानुसार आपली जीवनपद्धती ठरवून ती आचरणात आणणे, त्याच्याबद्दल असलेल्या अपार श्रद्धेमुळे बलाढ्य शत्रूबरोबर शरणागतीचा विचारही न करता शेवटपर्यंत लढणे आणि स्वतःच्या सर्वनाशाला कुठलाही मनात किंतू न येऊन देता धैर्याने सामोरे जाणे; सहजगत्या स्वतःच बलिदान करणे आणि त्यात धन्यता मानणे हे सगळे अघटित आहे, अतर्क्य आहे. हे लोक असे का वागतात हे योसा स्पष्ट करत नसला तरीही कादंबरी वाचताना आपल्याला याची काही कारणे उमगतात. या सर्व लोकांना काऊन्सेलर आपल्या छत्राखाली घेऊन त्याच्या दयनीय आयुष्याना अर्थ देतो, त्याच्या दिशाहीन जगण्याला एक ध्येय देतो आणि परमेश्वराने त्यांना त्याच्या राज्याचे रक्षण करण्यासाठी निवडले आहे याची खात्री करून देतो. एवढा मोठा आत्मसन्मान त्यांना मिळतो तो जणू हे परमेश्वराचे शिपाई असल्यामुळेच! त्या लोकांची पापे पश्चात्तापाच्या माध्यमाद्वारे माफ करून काऊन्सेलर एक प्रकारे त्यांना पावनच करतो.

या मन कुंठित करणाऱ्या संघर्षाला योसाने आपल्या लेखणीच्या ताकदीने जणू वैश्विक पातळीवर आणले आहे, त्याची व्याप्ती प्रचंड वाढवली आहे. परमेश्वराच्या शिकवणीबरहुकूम तयार झालेले राज्य आणि सैतानाचे राज्य यातला हा जणू विश्वाला नाशाकडे नेणारा झगडा आहे. या सगळ्या घटनांमधले नाट्य, त्यातल्या अपार शोकांतिकेची नस योसाने अचूक पकडली आहे. या सगळ्या घटनाक्रमाला

जणू एखाद्या ग्रीक शोकांतिकेची अटळता आहे आणि योसा आपल्या लेखणीद्वारे या शोकांतिकेला अधिक गडद करत जातो, आपल्याला सुन्न करतो. हे कथानक वेगवेगळ्या दृष्टिकोनांतून मांडले असल्यामुळे या कादंबरीला निःसंशय एक वेगळेच परिमाण मिळालेले आहे. तसेच हे सगळे कथानक सांगताना योसाने आपली भाषा अगदी साधी, सरळ, सुबोध आणि स्पष्ट ठेवलेली आहे. घडणाऱ्या घटनांचे शब्दांकन त्याने अतिशय परिणामकारक केले आहे. त्यामुळे घडणाऱ्या घटनांची भीषणता अधिक तीव्र होते, आपल्या काळजाला हात घालते. या भाषेत कमालीची सहजता आहे. योसाने संवादही सरळ, सुटसुटीत ठेवले आहेत. कथानकाच्या अस्वस्थ वातावरणाला ते अगदी पोषक आहेत, त्याला साजेसे असेच आहेत.

आपल्या प्रभावी कथनशैलीद्वारे योसाने हा सगळा हृदय पिळवटून टाकणारा घटनापट कुठलाही अभिनिवेश न आणता आपल्यासमोर उलगडला आहे, अगदी शेवटच्या अमानुष नरसंहारासकट. शेवटच्या संहाराचे वर्णन तर अंगावर काटा आणणारे आहे. कोनुडोसच्या रहिवाशांची ही वेडी झुंज आपल्याला चटका लावून जाते आणि ती किती निष्फळ आहे याची योसा आपल्याला वारंवार जाणीव करून देतो. या भयंकर संघर्षात आपल्या जिवाची पर्वा न करता सच्च्या श्रद्धेने झगडणाऱ्या या सगळ्या रंजल्यागांजल्या लोकांविषयी आपल्या मनात अपार करुणा दाटून येते, त्यांच्याशी आपली एक भावनिक बांधिलकी तयार होते, अगदी आपल्याला त्यांचा पूर्वेतिहास माहीत असला तरी.

एका अर्थी मानवाने निखळ स्वातंत्र्यासाठी केलेल्या अपयशी आणि हृदयद्रावक लढ्याची आपल्याला अंतर्मुख करणारी ही कथा आहे. परंतु या निखळ स्वातंत्र्याची कल्पना समाजाने स्वीकारलेल्या स्वातंत्र्याच्या कल्पनेपेक्षा वेगळी असेल, जरा चाकोरीबाहेरची असेल, तर मग समाज त्याचा कदापीही स्वीकार करत नाही आणि अशी चळवळ सुरू झाली तर शासनव्यवस्था ती निष्ठूरपणे चिरडून टाकते, तिचा असा नाश अटळ असतो हे बोचरे सत्य अतिशय परिणामकारक अधोरेखित करताना त्या धगधगत्या काळातल्या जगण्याचा जणू अर्थच योसाने आपल्याला सांगितलेला आहे.

भिन्न विचारसरणींच्या संघर्षांतून निर्माण होणाऱ्या राजकारणामुळे आणि एकमेकांशी संवाद साधण्यात आलेल्या अपयशामुळे मानवी क्रौर्य कुठल्या थराला जाते, किती भयंकर रूप घेते आणि या सगळ्याची परिणती किती भीषण असू शकते या भयाण वास्तवाचे अतिशय भयावह आणि विदारक चित्रेच योसाने आपल्यासमोर मांडले आहे. अशी ही महान कादंबरी वाचणे हा एक विलक्षण अनुभव आहे.

साधारणतः पावणेसहाशे पानांची, मोठा अवकाश आणि आवाका असलेली, आपल्याला खिळवून ठेवण्याचे सामर्थ्य असलेली ही जागतिक वाङ्मयातील एक श्रेष्ठ कलाकृती आहे.


ही कादंबरी लिहिताना योसाची लेखणी जणू भारलेली होती असेच वाटते. नाहीतर इतक्या ताकदीची आणि इतकी जबरदस्त कलाकृती निर्माण होणे तसे अशक्यच, नाही का?

**– राजीव श्रीखंडे**
rshrikhande@yahoo.com

॥ग्रंथाली॥

## लावण्य नक्षत्र


किरण भरत रोणे




**मूल्य ३०० रुपये**
**सवलतीत १८० रुपये**

## नदी वाहते आहे


मधुरा इंदापवार




**मूल्य ३०० रुपये**
**सवलतीत १८० रुपये**

## मराठी भाषा : लेखन-मार्गदर्शन

सलील वाघमारे




**मूल्य ३५० रुपये**
**सवलतीत २१० रुपये**



# मोठी झेप घेण्याची ताकद बाळगणारी कविता - कवी संजय साठे

किरण येले

'सैराट' चित्रपटाच्या नावाची अक्षरे आपण पाहिली आहेत. 'सैराट' शब्दाचा अर्थ त्या अक्षरांच्या प्रत्येक वळणातून आणि ठेवणीतून स्पष्ट होत जातो. मनाची सैराट अवस्था दर्शित करणारी ती अक्षरे तूच लिहू शकशील हा विश्वास चित्रपटाचे दिग्दर्शक नागराज मंजुळे यांनी त्यांच्या ज्या मित्रावर दाखवला. तो मित्र कुणी व्यावसायिक सुलेखनकार चित्रकार नव्हता तर कवितेने दिलेला जिवलग होता. ज्याने कधीतरी पोट भरण्यासाठी राज्य परिवहन मंडळाच्या एसटी गाड्यांच्या नंबर प्लेट रंगवल्या होत्या. लग्नाच्या पत्रिका रंगवल्या होत्या. लग्नघरी दारावर भालदार-चोपदार रंगवले होते. सैराट सिनेमाची संपूर्ण कथा या तीन अक्षरात तू सामावू शकतोस हा दिग्दर्शक नागराज मंजुळे यांनी टाकलेला विश्वास ज्यांनी सार्थ ठरवला ती व्यक्ती म्हणजे कवी संजय साठे. हा विश्वास नागराज मंजुळे यांच्यात कुठून आला असा विचार केला तर लक्षात येतं, की संजय साठे यांच्या कवितेत, वागण्यात, बोलण्यात आणि जगण्यात एक सैराटपण आहे. त्यांचं पूर्वायुष्य एकरेषीय नाही, एकस्तरीय नाही. पंचवीस जणांच्या एकत्र कुटुंबात अर्धपोटी राहून जगण्याचं प्राक्तन घेऊन जन्माला आलेलं हे पोर शिकण्याच्या वयात फक्त शाळा नाही तर जगणं शिकू लागलं. खिशात पैसा नसताना कविता, चित्र आणि मित्र यांच्या संगतीत बेबंद जगू लागलं आणि जगण्यातला आनंद शोधू लागलं. चित्रांची काही पार्श्वभूमी नसताना निरीक्षणातून सुंदर अक्षरं आणि चित्रं काढू लागलं. एकदा शाळेत चित्रकलेतील एलिमेंटरीची परीक्षा सुरू होती आणि रंग-ब्रश घ्यायला पैसे नसलेले संजय साठे मैदानात मित्रासोबत खेळत होते. परीक्षा अर्धी सरली आणि चित्रकलेचे शिक्षक कांबळे यांच्या ते लक्षात आलं. त्यांनी मैदानात जाऊन संजय यांचं बखोट धरत त्यांना वर्गात आणलं आणि परीक्षेला बसवलं. कुणा मुलाकडून रंग घेऊन दिला, कुणाकडून ब्रश घेऊन दिला. वेळ संपण्याआधी संजयने चित्र काढलं आणि त्या परीक्षेत पहिला आला. चित्रकलेचा



डॉ. संजय साठे

काय उपयोग असं त्यांना वाटलं, पण त्याची रंगभाषा पाहून कुणी त्यांना लग्नघरी कुंड्या रंगवायला बोलावू लागलं. कुणी दाराशेजारच्या भिंतीवर भालदार-चोपदार रंगवायला बोलावू लागलं. कुणी नवरानवरीची नावे रंगवायला बोलावू लागलं. त्यातून संजय यांना पैसे मिळू लागले आणि त्यांना कळलं की ही रंगकला आपल्या पोटातली भूक भागवू शकते. मग शिकता शिकता ते काम सुरू झालं. त्यात वाचनाची गोडी लागली. कवी संजय साठे सांगतात, त्याही काळात आमच्या भूम गावाचं (जिल्हा उस्मानाबाद) वाचनालय खूप समृद्ध आणि आधुनिक होतं त्यामुळेही वाचनाची आवड लागली. दरम्यान कुणीतरी एसटी गाड्यांच्या नंबरच्या पाट्या रंगवशील का विचारलं तर हो म्हणालो. आणि त्या पाट्या रंगवता रंगवता अनेक

पुस्तकं वाचली. नंबराच्या पाट्या रंगवताना आधी तो चौकोन सफेद रंगानं रंगवावा लागायचा. मग त्यावर काळ्या रंगानं अक्षरं आणि क्रमांक लिहावी लागायची. परंतु आधी लावलेला सफेद रंग सुकायला वेळ लागायचा. मग तितका वेळ काय करायचं म्हणून मी पुस्तक वाचायचो, विशेषत: कथासंग्रह. त्या काळात कुणाची नावं माहीत नव्हती. त्यामुळे जे समोर येईल ते वाचत गेलो चांगल्याचा प्रभाव पडत गेला आणि समृद्ध होत गेलो. त्या काळात दाढी करायलाही पैसे नसायचे पण सुरेश चौधरी नावाच्या माझ्या मित्रानं कधीच पैसे मागितले नाहीत. आज तो मित्र पोलिसखात्यात आहे. घरात पहिलं अब्स्ट्रॅक्ट चित्र काढलं तर वडील म्हणाले हे काय फोड आल्यासारखं काढलंय कळतंच नाय. संजय साठेना कळलं होतं ते फोड आलेलं जगणं. कधी ते चित्रातून उतरत राहिलं मग कवितेतून. ते म्हणतात याच काळात कुर्डूवाडीला भरलेल्या एका संमेलनात माझा परिचय माझ्यासारख्याच एका नवोदित कवीशी झाला आणि ती मैत्री टिकली. तो कवी म्हणजे आजचा नामवंत दिग्दर्शक कवी नागराज मंजुळे.

पुढे संजय साठे यांनी 'मराठी कवितेतील स्त्री प्रतिमा (१९८० ते २०१०)' या विषयावर पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर येथे प्रबंध सादर करून डॉक्टरेट मिळवली. कवी संजय साठे यांचा हा प्रबंध ग्रंथरुपात आल्यास मराठी समीक्षा आणि कवितांत संदर्भ ग्रंथ म्हणून मोलाची भर पडेल. टेंभुर्णी येथील विठ्ठलराव शिंदे कला महाविद्यालयात मराठी विषयाचा प्राध्यापक म्हणून २००२ साली रुजू झालेले साठे कविता लिहू लागले, चित्रं करू लागले, परंतु त्यांच्या लेखनास अजून पुस्तकरूप मिळाले नाही. तरीही संजय साठे हे आजच्या पिढीतील आणि या काळातील महत्त्वाचे कवी आहेत हे त्यांच्या कविता वाचताना लक्षात येतं.

संजय साठे यांच्या कवितांचं वेगळेपण म्हणजे त्या चिंतनशील आहेत, तरीही त्या कविता अवघड आणि दुर्बोधतेकडे झुकणारी शब्दरचना टाळतात. अनेक समकालीन कवितेत जाणवणारा एक दोष म्हणजे यादीवजा शब्दरचना. माणसाचं झालेलं अवमूल्यन दाखवताना आसपासच्या नगण्य गोष्टींची यादी कवी देत जातात आणि त्यातून एक वाक्य शेवटी येतं. संजय साठे यांच्या कवितेत घटना येतात, त्यातून विचार आणि चिंतन येत राहतं. या कविता दृश्यात्म आहेत. त्या वाचताना वाचकाला दृश्यं दिसतात आणि ती सतत बदलत राहतात. त्यातून कविता पुढे पुढे जात राहते आणि कविता संपता संपता वाचकाला प्रकाशमान करून जाते.

अनेक समकालीन कवितांचा विषय ग्लोबलायझेशन आणि माणसांचे होत असेलेलं बाजारीकरण असा असताना कवी संजय साठे यांचा कवितिक स्वर देशी जाणिवांचा असल्याचं जाणवतं. त्यांच्या कवितेत अस्सल देशीपण आहे. कवितेतील प्रतिमा, प्रतीकं आणि शब्दयोजन देशी आहे. हे शब्दयोजन कृतक नाही. ठरवून आणलेलं नाही. गावाचं गावपण दाखवणारे काव्यात्म शब्द नेणिवेतून आलेले आहेत. नदीच्या वाहत्या आठवणी या कवितेतील काळीजपात्र, निव्वळसंग, गाजरगवत, पसाखोंगा, गढूळझार पाणी हे शब्द कविता वाचताना अडखळ वाटत नाहीत. ते कवितेचा जीव वाटतात, कवितेचा तीळ वाटतात आणि लक्ष वेधतात. नदीच्या वाहत्या आठवणी या कवितेत नदीत आणि नदीच्या आसपास जे जगलो ते सांगताना कवी आनेक आठवणी कवितिक भाषेत चित्रित करतो आणि शेवटी म्हणतो, नदीच्या पाण्यात सोडलेल्या कागदी नावा वाहून गेल्या कधीच; पण नदीच्या वाहत्या आठवणी ओल्याच आहेत अजून काळीजपात्रात. या ओळीत नदीच्या वाहत्या आठवणी असं चिन्हयोजन करताना आठवणी नदीच्या पाण्यासारख्या वाहत्या आहेत आणि तरीही त्या अजून साचून आहेत हे दर्शवतो. साचलेलं पाणी गढूळ होतं; त्यावर शेवाळ जमतं, पण वाहत्या पाण्यावर शेवाळ जमत नाही, ते गढूळ होत नाही, कायम स्वच्छ राहतं म्हणून वाहत्या आठवणी. याच कवितेचा अंतिम शब्द आहे काळीजपात्रात. काळीज हे माणसाच्या आतली तळगोष्ट तर पात्र हे नदीच्या आतली तळगोष्ट. मानव आणि नदी या दोघांच्या आतली समान बाब दर्शवणारं शब्दसृजन म्हणजे काळीजपात्र. नदीजवळ जगता जगता नदीचं काळीज कवीला कळतं किंवा तेच त्याला मिळतं म्हणून मग जगणं सुकू दे, नदीचं पात्र सुकू दे किंवा नदीपासून दूर जाऊ दे, कवी म्हणतो, पण नदीच्या वाहत्या आठवणी अजून ओल्याच आहेत माझ्या काळीजपात्रात.

जंगलतोड या कवितेत एका प्रचलित शब्दाची तुलना इतर शब्दांशी करतात आणि अचानकच त्या शब्दांचं आपल्याला न जाणवलेले भयावह रूप समोर आणतात. त्यातून आपल्या संवेदनशीलतेला कवितेतून आव्हान देतात आणि आवाहन करतात. एक गोड चिमुरडी वर्तमानपत्रातील ओळ दाखवत कवीला म्हणते सामूहिक गीत, सामूहिक नृत्य आम्हाला बाईनी शाळेत शिकवलं आहे, पण हे सामूहिक बलात्कार म्हणजे काय? आणि कवी जितका हादरतो तितकाच या ओळी वाचताना प्रवासात झोपेत असताना अचानक ब्रेक लागून आपण उठावं तसं जागेपणी जागे होतो. कवी संजय साठे यांच्या कविता, समाज आणि समाजाच्या झोपलेल्या जाणिवा जाग्या करण्याची ताकद बाळगतात.

कवी संजय साठे त्यांच्या नावापुढे डॉक्टर लावण्याचे नाकारतात आणि त्याचे कारण सांगतात की डॉक्टरेट ही पदवी आहे आणि पदवी नेहमी नावामागे लावली जाते आधी लावले जाते ते पद. साठे यांचा हा विचार त्यांचं चिंतन दर्शवतो. त्यांची तटस्थ वृत्ती दर्शवते.

यामुळेच मोठी झेप घेण्याची क्षमता असलेल्या कवी

संजय साठे यांच्या कवितांचा संग्रह लवकर प्रकाशित होवो ही शुभेच्छा.

**नदीच्या वाहत्या आठवणी**

उंबऱ्याबाहेरचं खेळतंबागडतं बालपण जिनं
आपल्या अंगाखांद्यावर जोजवलं होतं
त्या नदीच्या वाहत्या आठवणी
अजून ओल्या आहेत माझ्या काळीजपात्रात.

आईची मनधरणी करून दोस्तांसोबत मनसोक्त पोहायचो
कधी तिचा डोळा चुकवून पोहायला गेलोच तर
तिनं मळ्याकाठच्या पिंपळाखालून मारलेली मोठ्ठी हाक
गाजरगवताला शिवून यायची
आणि
''काय करत व्हतास?''
या प्रश्नाच्या उत्तराची जुळवाजुळव करायच्या आधीच
पोहून पोहून तांबारलेले डोळे पुरावा द्यायचे.

पाण्यात गळ टाकून दिवसभर मासे धरायचे
सगळे डोह पायपाठ असायचे.
मासे धरून झाल्यावर नदीतल्याच खडकावर धुवायचे
आणि नदीतल्याच लव्हाळ्यात ओवून घरी आणायचे.

भरउन्हाळ्यातही
नदीनं वाळूच्या रांजणात
झाकून आणि राखून ठेवलेलं असायचं थंडगार पाणी
तहानेनं व्याकूळ झाल्यावर
त्या वाळूचं झाकण बाजूला करून झरा उघडायचा
आणि
गुडघे आणि हाताचे तळवे टेकवून भरपेट प्यायचं पाणी

नदीला पूर आला की गढूळझार पाणी
महादेवाच्या देवळात शिरायचं
वेशीला शिवून यायचं
ताहीरच्या मळ्याची दगडं फितवून न्यायचं
पांदीच्या तोंडावर उभं राहून पूर पाहताना
मनातल्या आनंदालाही पूर यायचा.

कधी
पाण्यातल्या मऊ वाळूत पाय खुपसून
मनभरून नुस्तंच बघत राहायचं
गार वाऱ्यावर झुलणारं हिरवंगार पाणगवत
सभ्यपणाचा आव आणून
पाण्यात उभे असलेले पांढरेघोट बगळे
सकाळ-संध्याकाळ
सूर्यानं पाण्यात कालवलेला रंगीबेरंगी गुलाल
खडकांना वळसा घालून वाहणारं
नदीचं अल्लड निव्वळसंग पाणी
कधी कान देऊन नुस्तीच ऐकायची
नदीची खळखळती अवीट गाणी
रानातून गोळा करून आणलेल्या
लालपिवळ्या लिंबोळ्या असोत
कुणाची शेताशिवारात राबराब राबणारी
जिवाभावाची गुरंढोरं असोत
कुणाचं पसाखोंगा ज्वारीचं मात्रं असो
धुण्याचं ओझं डोक्यावर घेऊन आलेल्या
कुण्या सासुरवाशिणीचं जडावलेलं मन असो
सगळं सगळं याच नदीतच
खळखळून धुतलं जायचं

नदीच्या कडेवर बसूनच
लहानाचा मोठा झालोय मी
लहानपणी तिच्या पाण्यात सोडलेल्या
कागदी नावा बुडून गेल्या कधीच
पण नदीच्या वाहत्या आठवणी
अजून ओल्याच आहेत माझ्या काळीजपात्रात.

**माझ्या हतबलतेचा अभिप्राय**

एक पाकोळी
धडपडतेय
बेजार होऊन उडतेय
या भिंतीवरून त्या भिंतीवर

मी
माझ्या भाडोत्री खोलीत
एकटाच.
अंधारानं पुन्हा
सहज ढकलून उघडलंय
दिवसानं लोटून घेतलेलं
काळजाच्या वेशीचं खिळखिळं झालेलं दार आणि आत..
तव्याच्या चटक्यांचा भार वाहता वाहता सुरकतलेली आई,

डागडुजी करून
घराची पडझड थोपवता थोपवता
दमलेला बाप,
केविलवाण्या लगबगीनं
अंगणदारात येऊन
घट्ट मनानं हात हालवणारी
ती,
हातात चित्रकलेची वही नाचवत
हिरवं झाड आणि निळं आभाळ
रंगवून द्या म्हणून मागं लागलेली पोरं...

घुसमटलेल्या श्वासांनी
मी वाचत राहतो
त्यांच्या आयुष्याची गाथा
आणि निःश्वासाच्या टाकानं
मी खरडत राहतो
माझ्या हतबलतेचा अभिप्राय

आता भिंतीवर
एक वखवखलेली पाल
दब्या पावलानं रेंगू लागलीय
पाकोळीच्या दिशेनं

पण
झडप घालण्यापूर्वी
अवसान गोळा करून
मी हुसकावून लावतो पालीला
आणि खिडकी उघडून
वाट मोकळी करून देतो
पाकोळीला.

**जंगलतोड**

बगलेत पाटीदप्तर अडकवून
प्रसन्नपणे शाळेत जाणारी
आणि
पुस्तकातल्या छान छान गोष्टी वाचून
मोहरून जाणारी चिमुरडी
परवा
वर्तमानपत्राचं पान हातात घेऊन
बुचकळलेल्या अवस्थेत माझ्याकडे आली
आणि शब्दांवरून इवलंसं बोट फिरवत म्हणाली,
सामूहिक गीत,
सामूहिक नृत्य

आम्हाला बाईंनी शाळेत शिकवलं आहे
पण हे
सामूहिक बलात्कार म्हणजे काय?
मी अनुत्तरीत होऊन
नुस्ता बघत राहिलो
तिच्या निष्पाप चेहऱ्याकडे
आणि
भोवतालच्या जंगलतोडीच्या तावडीतून
या हिरव्या रोपाला
कसं जपावं या काळजीनं
पुरता हादरून गेलो आतल्या आत..

**उन्हाचा उरुस**

भोवताली गर्द। गर्दीचे अरण्य
मनाचे कारुण्य। एकटेच

जरी न दिसतो। चेहरा घायाळ
सलते सायाळ। बेचैनीचे

मौनाने शिवतो। आवळून ओठ
आत काठोकाठ। बोलगाणी

जरी पापण्यात। आनंदाची नक्षी
काळजाचा पक्षी। सैरभर

बाहेर बरसे। फुलांचा पाऊस
उन्हाचा उरुस। अंतरात

**– किरण येले**
kiran.yele@gmail.com

**– संजय साठे**
sanjaysathe592@gmail.com



# चंद्रबळ

डॉ. निर्मोही फडके

हल्ली कवी, कविता आणि कवितासंग्रह ह्यांच्या कुंडलीत चंद्रबळ नसल्याचं ऐकिवात आलं, आणि त्याबद्दल सोशल मीडिया विद्यापीठावरच्या अग्रलेखांमध्येही वाचलं. पूर्वी ऐकीव बातम्या, माहित्या ह्या 'नजरअंदाज' केल्या जात, हल्ली त्या आवर्जून 'नजरे'त आणल्या जातात आणि त्यांवरून 'भक्कम अंदाज'ही बांधले जातात.

मनात प्रश्न निर्माण झाला, की ज्या कवींच्या मनाचा, जगण्याचा, लेखणीचा 'कारक'च असा जो 'चंद्र', तोच जर त्यांना 'बळ' द्यायला असमर्थ ठरत असेल, तर ह्या बापड्या कवींनी पाहावं कुणाकडं? चंद्रयानाच्याही पुढे जाणारी कवितेची कोटीच्या कोटी उड्डाणं... त्यांचं काय? गेला बाजार चंद्र, पाऊस, ढग, वीज, ऊन, नदी, समुद्र, शेतं, झाडं, फुलं, पक्षी, प्राणी, माणसं इत्यादी काही थोडकीच तर ह्या कवी लोकांच्या कवितेची मूळ प्रेरणास्थानं नि बलस्थानंही. हेच तर त्यांचं 'चंद्रबळ'. अगदी महानगरीय कविता लिहिणारा कवी असो, की आधुनिक... अंहं... उत्तर आधुनिक कवी असो, कुंडलीतल्या ह्या ठरलेल्या 'चंद्रसमुद्रन्याय' योगाशिवाय कुठल्याही कवीला कविता सुचली नाही किंवा कुणाचंही भलं झालं नाही. हे सिद्ध करण्यासाठी आपल्याकडे भरपूर पुरावे आहेत.

वानगीदाखल ह्या कविता पाहा ...

*दुःखाचा अंकुश असो सदा मनावर*
*हलाहल पचवल्याबद्दल माथ्यावर चंद्र असो*

– भालचंद्र नेमाडे (कवितासंग्रह : देखणी)

जगण्याबद्दलचं मनन, चिंतन करताना कवीला होणाऱ्या वैश्विक जाणिवेचा हा उद्गार.

आयुष्यात क्षणोक्षणी पचवावं लागणारं हलाहल कवितेतून गवसणाऱ्या चंद्रामुळेच सुसह्य होतं. 'चंद्रबळा'त अंतर्भूत असलेल्या घटकांमध्ये आभाळ, झाड, पक्षी इत्यादी आणखी काही महत्त्वाचे घटक.

*'रस्त्यावर चिटपाखरू नाही'*
*रस्त्यावर चिटपाखरू नाही*
*मध्यावर एक बस पूर्ण जळत आलेली*
*एका बाजूने घोळका येतो*
*आणि काचेच्या रेस्टॉरंटवर दगडफेक करून दुसऱ्या बाजूने निघून जातो*
*...आमच्या रक्षणकर्त्यांचं*
*तुम्ही रक्षण करू शकला नाहीत*
*आता स्वतःचे रक्षण करायला आम्ही पूर्ण मोकळे आहो*
*त्यांचा अनुयायी संतापून म्हणतो*
*...आकाश लालगढूळ असतं. तारवटलेलं*
*कुणालाच काही सुचत नसतं*
*टेलिफोनच्या तारेवर एक पक्षी*
*उदास उदास बसून असतो.*

– गुरुनाथ धुरी (कवितासंग्रह : ग्लोरिया)

धार्मिक वैमनस्य, त्यातून निर्माण झालेली हिंसक भावना आणि तिच्यातून उसळलेली दंगल अशा दाहक अनुभवाला शब्दरूप दिल्यावर कवीची लेखणी शहरातलं गढुळलेलं, तारवटलेलं वातावरण आकाशाच्या कॅनव्हासवर उतरवते, आणि टेलिफोनच्या तारेवरचा एकल, उदास पक्षी ह्या माणसांच्या हिंसेतून शांततेचा, जगण्याचा सूर शोधू पाहताना आपल्याला दिसतो.

आपल्या भोंगळ तत्त्वांसाठी, स्वामित्व दाखवण्यासाठी दुसऱ्याच्या जगण्याचे अधिकार क्रूरपणे हिसकावून घेणाऱ्या मूठभर लोकांची अरेरावी, गर्दीचं हिंसक मानसशास्त्र आणि शांत, सर्जनशील आयुष्य जगणाऱ्या सामान्यांची हतबलता असा आशयघन कॅनव्हास असलेली ही तीनच कडवी. इथलं आकाश गावातल्या आकाशासारखं निरभ्र नाही, ना पक्षी हिरव्या फांदीवर झोके घेणारा. तरीही ह्या नागर कवितेत ते दोघंही आहेतच.

हाच पक्षी 'दुबळी पांगळी पाखरं' होऊन हुंकारताना

दिसतो, ह्या कवितेत...

'कोरडे नक्षत्र'

*...आयुष्याचा सांधा जोडताना अकस्मातपणे*
*गढूळ डोहात चांदण्या मातीमोल होऊन जातात*
*आणि मनाच्या अफाट क्षितिजावर*
*भिजून जातात चंद्रकोरी*
*जेव्हा हुंकारत राहतात दुबळी पांगळी पाखरं*
*नसानसांतून उभ्या रानाची झालेली आबकल पाहात...*

– प्रकाश होळकर (कवितासंग्रह : कोरडे नक्षत्र)

अस्मानी-सुलतानीच्या दाहक वास्तवाशी संघर्ष करताना कुठल्याही भूमिपुत्राच्या तनामनाची होणारी विकल अवस्था ह्या कवितेतून तितक्याच हताशेनं समोर येते. अशा परिस्थितीत त्या भूमिपुत्राच्या मनात नाचणारी आशेची आनंदी पाखरं दुबळीपांगळी झालेली कवीच्या आंतरसंवेदनेनं टिपलेली असतात.

हाच पक्षी कवी सदानंद रेगे ह्यांच्या कवितेत 'पाऊसपक्षी' होऊन येतो.

*पाऊसपक्षी*
*कृष्णसांवळा*
*शाळिग्रामसा*
*श्यामलसुंदर*
*क्षितिजाच्या*
*थरथर तारेवर*
*बसून पालवित*
*पंख ढगांचे*
*गोंजारित अन्*
*पिसे विजेची*
*वादळ चोंचीने डौलानं*
*मृद्गंधाला घेऊन वक्षी*
*...पाऊसपक्षी!*

प्रतिमेचं अतिशय मोहक असं हे शब्दचित्र. पावसाचा पक्षी, त्याचं श्यामलवर्णी सौंदर्य, त्याचे ढगांचे पंख आणि त्यात लकाकणारी विजेची पिसं, चोचीतून घुमणारं वादळ आणि त्याच्या छातीत भरून राहिलेला मातीचा गंध, जो नंतर आपल्याही छातीत भरतो. पावसाचं आणि पक्ष्याचं एक वेगळंच नातं प्रतिमांकित करणारी ही एक अलवार कविता.

असे हजारो वेगवेगळ्या स्वरूपांतले, हजारो आशय घेऊन आलेले पक्षी कवितांमध्ये बागडताना दिसतात.

'झाड' तर आदिम प्रेरणा कवितेची. कवितेत अगणित रूपं घेऊन येणारी. कवितेला सशक्त करणारी. केवळ कवितेलाच नाही तर कवीलाही. आता हेच पाहा ना, ह्या कवितेतली 'ती'च झाड झाली आहे.

'कुठूनतरी'

*कुठूनतरी पक्ष्यांचा थवा यावा*
*तसे शब्द येतात*
*तळहातावर उतरतात*
*खांद्यावर बसतात*
*कविता पूर्ण झाली की*
*बहरून येतो जीव*
*जणू आपण एक हिरवेगार सळसळणारे झाड झालो आहोत*
*आणि आपल्या फांद्यांशी ते पक्षी*
*किलबिलताहेत.*

– रजनी परुळेकर (कवितासंग्रह : स्वीकार)

छोटं-मोठं असं कोणतंही चैतन्यमयी झाड आणि ती ह्यांच्यातलं साम्य कणाकणातलं. एकमेकांची अंतर्बाह्य प्रतिरूपं असलेली ही दोघं. सर्जनाच्या संवेदनांची प्रतीकं. ह्या कवितेतून ती एकात्म होऊन आपल्यापर्यंत पोहोचतात.

कवीचं मन स्पंजसारखं असतं. कायमच ओलावा टिकवून असलेलं. आजूबाजूचे घटक आणि घटना ह्यांना आपल्यात टिपून घेणारं. मात्र बाहेरच्या घटना आणि कवीचं आंतर-संवेदन ह्यांमध्ये सुसंगती किंवा विसंगती ह्यांपैकी काही घडलं, की ह्या स्पंजला पीळ बसतो आणि जन्माला येते कविता. हे संवेदन प्रत्येक कवीचं वेगवेगळं असतं. मात्र ते निसर्गतःच निसर्गाशी आणि पर्यायानं माणसांशी एकात्म झालेलं असतं. मला असं वाटतं, हा चंद्र, हा पक्षी, हे झाड, हा पाऊस इत्यादी हे कवीच्या जन्मापासूनच... नव्हे त्यानं जीव म्हणून धारणा केल्यापासूनच त्याच्या डीएनएमध्ये उतरत असावेत.

पण मग हल्ली अशी कुजबूज का ऐकू येऊ लागली आहे? तीच...'चंद्रबळ' नसल्याची. कवितेतली गेयता तर हरवून गेल्याची.

*'हले काचपात्रातली वेल साधी*
*निनादून घंटा जरा वाकल्या*
*खिळ्यांना कळेना कुठे क्रूस न्यावा*
*प्रभूने अशा पापण्या झाकल्या'*

(कवी ग्रेस)

किंवा

*'ह्या सृष्टीच्या निवांत पोटी*
*परंतु लपली सैरावैरा*
*अजस्र धांदल क्षणात देईल*
*जिवंततेचे अर्घ्य भास्करा'*

(कवी बा. सी. मर्ढेकर)

अशा प्रकारच्या एकतानतेनं म्हणता येतील, अशा कविता ५०:५ ह्या प्रमाणात वाचायला मिळतात. लघु-गुरू मात्रा फक्त ग़ज़ललेखनापुरत्याच उरल्या.

अशी मोजणी, अशी चौकट, अशी सुरावली एक

तर कठीण, कृतक किंवा बाळबोध वाटू लागल्यानं किंवा ठरवल्यानं, काही अंशी 'टीके'स पात्र ठरल्यानं ती कवितेच्या स्वरूपांतून लुप्त होऊ लागल्याच्या चर्चा झाल्या. आमच्या पिढीतल्या सगळ्यांनी शाळेत असताना नव्या इयत्तेच्या पहिल्या दिवशी मराठीच्या कोऱ्या वहीत मधला कागद दुमडून गद्य आणि पद्य असे तिचे दोन भाग केल्याचं चांगलंच लक्षात आहे. परंतु आता आयुष्यच गद्य तर कविता पद्य उतरणार कशी, असा एक करकरीत सवाल कानावर येतो. कवितेच्या प्रांतात अस्तित्वाचा झगडा करणाऱ्या लेखण्यांचा स्वर आधीपासूनच होता, अगदी संतकवितेपासून. संत जनाबाई, संत सोयराबाई इत्यादी संत कवयित्रींच्या ह्या ओवीबद्ध स्वराला विसाव्या शतकात नवकवितेनं, दलित कवींच्या कवितेनं आणि आधुनिक काळात आदिवासी कवींच्या कवितेनं विद्रोही मुक्तच्छंदात मुखरित केलं. ह्या कवितेलाही हे चंद्र, झाड, अरण्य, पाणी इत्यादींचं 'चंद्रबळ' लाभलंच की. वानगीदाखल ही काही उदाहरणं...

*जल, जमीन, जंगल आणि गगनभरारी पहाडांना बोलता*
*लिहिता वाचता आलं असतं तर त्यांनी पुकारलं असतं*
*विध्वंसरूपी माणसाविरुद्ध बंड*
*लिहिली असती क्रांतीची बात पानापानांवर*
*आणि पेटवलं असतं उलगुनान*
– विनोद कुमरे (कवितासंग्रह : आगाजा)

आदिवासी मनाचा अन्यायाविरुद्ध असलेला आक्रोश आधुनिक आणि उत्तर आधुनिक काळात जोरकसपणे पुढे आला. अरण्यातच जन्मणारा, जगणारा आणि अरण्यातच मरणारा आदिवासी हा नागर किंवा तथाकथित विकसित संस्कृतीच्या, विचारांच्या तडाख्यात सापडला. नागर भाषेत कवितेतून व्यक्त होऊ लागला. त्याच्या मुक्त विचारांना कवितेतून मुक्ती देतानाही त्यानं अरण्यच फुलवलं. हे असं...

*मलाही क्रियेट करावी वाटते तयार माझ्या*
*उद्ध्वस्त अरण्य संस्कृतीची वेबसाईट*
*... नि शेअर करावा वाटतो अरण्यातल्या मित्रांशी त्या झाडामाडांची*
*त्यांच्या डोळ्यातल्या राजकीय खेळीशी बळी पडलेल्या आसवांना*
*क्लिक करावे वाटते कॅमेऱ्यात नि घडवून आणावी वाटते चर्चा*
*अनुदानाशिवाय*
किंवा
*अरण्य म्हणजे अस्मिता अरण्य म्हणजे पिढ्यान्‌पिढ्याचा इतिहास*
*अरण्य म्हणजे लिंगोदेव*
*अरण्य म्हणजे जंगोदेवी*
*नि अरण्यात दडलेत कितीक गडांच्या अस्मितेचे पायथ्ये*
किंवा
*ही कविता सुटली की लेखणी थरथरते*
*आठवतात जंगलाशी घेतलेल्या आणाभाका*
*मी जोडतो हिशेब*
*ह्या जंगलाचा नि लेखणीचा कितपत संबंध*
*ते उगवत जातं पानाफांद्यातून*
*अन् ही कागदावर खेळवते लपंडाव*
– विनोद कुमरे (कवितासंग्रह : आगाजा)

हे अस्सल 'चंद्रबळ' – खरं तर 'अरण्यबळ' – घेऊन आलेली कविता. हे अरण्य-संवेदन आपल्याही आत कुठेतरी असल्याची प्रखर जाणीव ही कविता आपल्याला करून देते, गद्य-पद्याच्या पल्याड जाऊन.

चंद्रावर यानं पोहोचली. माणूस उतरला. विज्ञानानं चंद्र इतका खरा ठरवला, की कवितेतला चंद्र खोटा खोटा वाटू लागला. अगदी भाकरीचा चंद्रही. हे 'चंद्रबळ' बदलल्याचं प्रतिबिंब दाखवणारी ही कविता...

अदमासे-
*लेकीला माहेर असणं अन्*
*गावाला वाहती नदी असणं,*
*उलगडते असली संगती*
*भल्या पहाटे नदीत उतरल्यानंतर.*
*मी नेहमी पाहत राहतो :*
*आकाशातल्या आणि नदीतल्या*
*गोलाईदार चंद्राकडे;*
*अगदी लहानपणापास्नं*
*आपण वाहतच राहतो,*
*दोन चंद्रांमधनं किंवा दोन चंद्रांसाठी*
*भावनांमधलं अंतर मात्र*
*पार पार बदललेलं,*
*अदमासे पाण्यातल्या आणि*
*आकाशातल्या चंद्राएवढं...*
– मनोज बोरगावकर
(कवितासंग्रह : कोरा कागद निळी शाई)

प्रत्यक्ष दिसणारा चंद्र आणि प्रतिमारूपानं दिसणारा... खरं तर मनाच्या प्रवाहात उतरलेला चंद्र ह्यांच्यातलं अंतर कवीला जाणवू लागलं आहे. आता आकाशातला चंद्र 'तो' चंद्र राहिला नाही. जाणिवांचा, भावनांचा तळही तसा खोल आणि प्रवाहही तसाच निर्मळ राहिलेला नाही. साहजिकच त्या तळापर्यंत पोहोचणारा आणि प्रवाहातून वाहणारा चंद्रही आता 'तो' राहिला नसल्याची एक आंतरिक वेदना ह्या कवितेतून व्यक्त होते. तेच झाडं, पक्षी, पाऊस, ऋतू इत्यादींच्या बाबतीतही घडलं. थोडक्यात माणूस बदलला म्हणून त्याचा भोवताल बदलला,

## ‘परममित्र’ माधव जोशी



परममित्र म्हणून ओळखले जाणारे माधवराव जोशी यांचे नुकतेच, बुधवार, १२ जून २०२४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. यावेळी त्यांचे वय ८८ वर्षांचे होते. माधवरावांना तत्त्वज्ञानाचा उत्तम वारसा त्यांच्या वडिलांकडून लाभलेला होता. पांडुरंगशास्त्री आठवले यांचा काही काळ सहवासही त्यांना लाभला होता. त्यांनी मुंबई विद्यापीठाची मानसशास्त्राची पदव्युत्तर पदवी प्राप्त केली होती. त्यामुळे त्यांच्यात तत्त्वज्ञान आणि मानसशास्त्र यांचा सुंदर संगम झालेला होता, जो त्यांच्या वागण्यात, बोलण्यात आणि कृतीतून दृग्गोचर होत असे. माधवरावांनी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे पूर्ण वेळ काम केले. गुजरात प्रांत त्यांच्याकडे असल्याने बराच काळ ते गुजरातमध्ये होते. त्यानंतर अरुणाचल प्रदेश येथे त्यांनी विद्यार्थी परिषदेचे कार्य जोमाने आणि नेटाने पुढे नेले. याच काळात त्यांना तिथे एका कंपनीमध्ये सीईओ म्हणून काम करण्याची संधी मिळाली. ही अल्पकाळ केलेली सेवा वगळता ते पुन्हा परिषदेच्या कामाकडे वळले. मुंबईच्या मध्य विभागात त्यांनी विद्यार्थी विस्तारक म्हणून काम पाहिले. त्यानंतर काही काळ फ्री प्रेस, तरुण भारत या वृत्तपत्र समूहात वरिष्ठ पदावर काम पाहिले. ‘ग्रंथाली ज्ञानयज्ञ’ उपक्रमांत यांनी सहभाग घेतला होता. माधवराव यांनी २००१ साली परममित्र या प्रकाशन संस्थेची स्थापना केली. संस्थेमार्फत उत्तम आणि उच्च दर्जाची ग्रंथनिर्मिती यांनी केली. अडीचशेहून अधिक पुस्तकांची त्यांनी निर्मिती केलेली आहे. यात विज्ञानावर त्यांचा अधिक भर होता. त्यासाठी लेखकांचा शोध घेऊन त्यांना लेखनप्रवृत्त करत असत. याचे उत्तम उदाहरण म्हणजे पंकज कालूवाला. त्यांची विविध विषयांवर आधारित अशी जवळजवळ १२ पुस्तके ‘परममित्र’ या प्रकाशानाने प्रकाशित केलेली आहेत. विज्ञानाइतकाच त्यांचा इतिहास हा विषय जिव्हाळ्याचा होता. गजानन मेहंदळे लिखित छत्रपती शिवाजीमहाराजांचे चरित्र जे इंग्रजीमधून लिहिलेले आहे, तो अद्वितीय असा बृहद्खंड परममित्र प्रकाशनाने प्रकाशित केलेला आहे. त्यांचा हा प्रकल्प खूप वाखाणण्यासारखा होता. याच खंडांचे मराठी अनुवादही त्यांनी प्रकाशित केले. विशेष नोंद घ्यावी असे लोकमान्य टिळकांचे तीन खंड शंभर वर्षांपूर्वी लिहिले गेलेले होते. त्यांचे पुनर्संपादन करवून घेऊन ते तीनही खंड उत्तम दर्जाचे निर्माण होतील याची काळजी त्यांनी घेतली. प्रकाशनाच्या बाबतीत अतिशय चोखंदळ असलेले माधवराव माणुसकी, मैत्री याबाबतही तितकेच आर्जवी होते. सतत चेहरा हसमुख आणि बोलणे अतिशय मृदू त्यामुळे सहज मैत्री होत असे. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ आणि मराठी प्रकाशक संघाचे तसेच अन्य संस्थांचे अनेक पुरस्कार त्यांना लाभलेले आहेत. त्यांच्या जाण्याने एक उमदे व्यक्तिमत्त्व आपल्यात नसल्याचे दु:ख मनात राहील.

**– चांगदेव काळे**

---


आणि भोवताल बदलला म्हणून माणूस बदलला. पर्यायानं कविताही बदलली.

मात्र बदललेली कविता गेय नाही म्हणून ती ‘कविता’ नव्हेच, असा सनातनी बाणा ताणूनही उपयोग नाही. कविता अजूनही आहे हे महत्त्वाचं. कालप्रवाहातलं कोरडेपण ती सशक्तपणे मांडत आहे, हे कबूल करायलाच हवं. नीरस, उदास, नकारात्मक, रूक्ष – थोडक्यात ‘होपलेस’ – वाटणाऱ्या आयुष्यातही बरीचशी गद्य आणि कधीतरी ‘पद्य’ अशी कविता लिहिणाऱ्या कवीमंडळींच्या विजिगीषु वृत्तीचं कौतुक आणि अभिमान वाटतो. कुंडलीत चंद्रबळ नाही, तर नसो. भोवताल कसाही असो. कधी वृत्तांतून, तर कधी मुक्त चिंतनातून आपल्या संवेदनांना भावरूप, शब्दरूप देणारी कवी मंडळी आजही कार्यरत – खरं तर कवितारत – आहेत हे आपल्यासारख्या वाचकाच्याही कुंडलीत चंद्रबळ असल्याची ग्वाही देणारं आहे. त्याकरता कुंडली किंवा चंद्रबळ प्रकरण शास्त्राच्या कसोटीवर घासून पाहण्याची आवश्यकता नाही. तेही प्रतिमास्वरूपात स्वीकारलं, तर बिघडलं कुठं?

आपले कवी आणि त्यांची कविता गेली आठ–नऊ दशकं पुरून उरलेतच की, सगळ्या प्रपातांना. पुढेही राहतील... ह्या कवितेत कवीनं मांडलंय तसे...

*या शुभ्र कागदासाठी*<br>
*ही कविता*<br>
*आपल्याच कोरड्या तळ्याचे सुस्कारे*<br>
*ऐकणाऱ्या उद्ध्वस्त आडासाठी आहे*<br>
*ही कविता*<br>
*खोलवर ओल शोधून*<br>
*थकलेल्या हताश झाडासाठी आहे*<br>
*ही कविता*<br>
*आटलेल्या झऱ्यासाठी*<br>
*तुटलेल्या ताऱ्यासाठी*<br>
*एकांतात केलेल्या*<br>
*निरर्थक हातवाऱ्यांसाठी आहे.*<br>
*ही कविता*<br>
*कफनासारख्या*<br>
*या शुभ्र कागदासाठी*<br>
– नागराज मंजुळे<br>
(कवितासंग्रह : उन्हाच्या कटाविरुद्ध)

**– डॉ. निर्मोही फडके**
nirmohiphadke@gmail.com



# मसाल्यांचा घोळ!

शरद काळे

गेल्या 'शब्द रुची'च्या अंकात आपण भारतीय मसाल्यांचा इतिहास आणि त्यांची सविस्तर माहिती घेतली होती. गेल्या काही आठवड्यांमध्ये मसाल्यांच्या निर्यातीत काही अडचणी आल्या आहेत आणि त्यासंबंधी उलटसुलट बातम्या येत आहेत. मसाल्यांच्या पदार्थांचे दीर्घकाळ जतन करण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येतात, हे आपण मागच्या लेखात  वाचले होतेच. निर्जंतुकीकरणासाठी एथिलीन ऑक्साइडचा वापर केला जातो. त्याचा वापर हॉस्पिटलमध्ये विशेष करून केला जातो. हा कर्करोगजन्य घटक असून त्याचे अंश सापडल्यामुळे भारतीय मसाल्यांच्या ब्रँड एम.डी.एच.च्या तीन पुन:पॅकेज केलेल्या उत्पादनांवर हाँगकाँगने बंदी घातली. त्यानंतर सिंगापूरनेही तशी बंदी घातली. त्यानंतर काही दिवसांनी या प्रसिद्ध ब्रँड मसाल्याच्या कंपनीने हे आरोप फेटाळून लावताना सांगितले, की ते एथिलीन ऑक्साईड वापरत नाहीत. भारतात आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांच्या उत्पादनांमध्ये आरोग्य आणि सुरक्षा मानकांचे काटेकोरपणे पालन केले जाते. तरीही हाँगकाँगच्या अन्ननियामकांनी एथिलीन ऑक्साइड असल्याने त्यांच्या विक्रीवर बंदी घातली आहे. कंपनी एथिलीन ऑक्साइड वापरतच नसेल तर मग हाँगकाँगच्या अधिकाऱ्यांना ते कसे सापडले? अमेरिकेच्या अन्न आणि औषध प्रशासनाने सांगितले, की ते भारतातील चार उत्पादनांची माहिती गोळा करत आहेत. त्यात एम.डी.एच.च्या तीन आणि एव्हरेस्टच्या एक अशा चार उत्पादनांचा समावेश आहे. एथिलीन ऑक्साइड हा घटक कर्करोग निर्माण करणारा पदार्थ असून त्याने स्तनांचा कर्करोग आणि लिम्फोमाचा धोका वाढतो. हाँगकाँगने या भारतीय मसाल्यांमध्ये या कीटनाशकांची उपस्थिती दर्शवल्यानंतर वादळ निर्माण होणे अपेक्षितच होते. भारताच्या अन्ननियामक, अन्नसुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने (एफ.एस.एस.ए.आय.) या प्रकरणाची चौकशी सुरू केली आहे. हाँगकाँगमधील अन्ननियामकांनी एथिलीन ऑक्साइड असल्याने त्यांच्या विक्रीवर बंदी घातल्यानंतर एम.डी.एच.कडून स्पष्टीकरण अपेक्षित होते. तसे स्पष्टीकरण त्यांनी दिलेही आहे.

अमेरिकेने ऑक्टोबर २०२३ ते मे २०२४ दरम्यान एम.डी.एच. कंपनीच्या ६५ कन्साइनमेंटपैकी १३ म्हणजे २० टक्के माल त्यात सालमोनेल्ला हे रोगजंतू आढळल्यामुळे नाकारला होता. शिवाय, युरोपीयन युनियनमधील अन्नसुरक्षा अधिकाऱ्यांना ५२७ भारतीय उत्पादनांमध्ये एथिलीन ऑक्साइड आढळले, ज्यात औषधी वनस्पती आणि मसाल्यांचा समावेश आहे. युरोपीयन अन्नसुरक्षा प्राधिकरणाने (RSFF) सप्टेंबर २०२० ते एप्रिल २०२४ दरम्यान विविध भारतीय खाद्यपदार्थांची चाचणी केली. त्यात हे निष्कर्ष काढण्यात आले होते. प्रत्येक देशाचा आयात गोष्टी तपासणी करण्याचा अधिकार असतो. काही देशांची याबाबतीत असलेली मानके अतिशय कडक असतात. संयुक्त राष्ट्रसंघाच्या जागतिक आरोग्य संघटनेद्वारे काही मार्गदर्शक तत्त्वे आखून दिलेली असतात. पण, त्यात बदल करण्याचे अधिकार काही देश वापरतात. विशेषतः प्रगत देशांमध्ये ही मानके अधिक कडक आहेत. त्यानुसार बऱ्याच वेळा निर्यात केलेल्या अन्नपदार्थांबाबत प्रश्न निर्माण होत असतात. हे काही नवीन नाही, आंतरराष्ट्रीय कायद्यानुसारच हे सारे घडत असते. एखाद्या अन्नपदार्थात आक्षेपार्ह असे काही सापडले तर ते कन्साइनमेंट परत पाठवण्यात येते. त्याचा अर्थ सर्वच माल खराब आहे असा नक्कीच होत नाही. त्या विशिष्ट बॅचमध्ये काहीतरी कारणामुळे तो दोष निर्माण झाला असू शकतो. विशेषतः मालाची हाताळणी करताना जिवाणूंच्या बाबतीत हे होऊ शकते. एम.डी.एच.ने सांगितले, की त्यांना हाँगकाँगच्या सेंटर फॉर फूड सेफ्टी (CFS) किंवा सिंगापूर फूड एजन्सीकडून (SFA) कोणतेही अहवाल मिळालेले नाहीत. ''या निष्कर्षांबद्दल हाँगकाँग किंवा सिंगापूरमधील अन्नसुरक्षा प्राधिकरणांनी आमच्याशी संपर्क साधला नाही. आम्ही आमच्या मसाल्यांच्या उत्पादनाच्या कोणत्याही

टप्प्यावर एथिलीन ऑक्साइड वापरत नाही. आमची उत्पादने भारत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर कडक आरोग्य आणि सुरक्षा मानकांचे पालन करतात.'' कंपनीने असेही म्हटले आहे, की ''भारतीय मसाला महामंडळ किंवा भारतीय अन्ननियामक, FSSAI यांना या परदेशी अधिकाऱ्यांकडून कोणतेही दस्तऐवज किंवा चाचणी अहवाल प्राप्त झालेले नाहीत. यावरून एम.डी.एच.वरील आरोप निराधार, बिनबुडाचे आणि कोणत्याही ठोस पुराव्यांद्वारे समर्थित नाहीत हेच सिद्ध होते. एम.डी.एच. त्याच्या खरेदीदारांना आणि ग्राहकांना आपल्या सर्व उत्पादनांच्या सुरक्षिततेबद्दल आणि गुणवत्तेबद्दल आश्वस्त करते. आम्ही आमच्या खरेदीदारांना आणि ग्राहकांना आश्वासन देतो की आम्ही आमच्या मसाल्यांच्या साठवण, प्रक्रिया किंवा पॅकिंगच्या कोणत्याही टप्प्यावर एथिलीन ऑक्साइड (ETO) वापरत नाही,'' असे त्यात म्हटले आहे. ''आम्ही देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आरोग्य सुरक्षामानकांचे अगदी काटेकोरपणे पालन करतो. एम.डी.एच. मसाल्यांच्या जाहिरातीतील 'असली मसाले सच सच/एम.डी.एच.! एम.डी.एच.!' ही टॅगलाइन आणि 'रिअल स्पायसेस ऑफ इंडिया' ग्राहकांना अस्सल, उच्च-गुणवत्तेचे मसाले उपलब्ध करून देण्याची आमची अस्सल बांधिलकी दर्शवतात,'' असे त्यांच्या निवेदनात नमूद केले आहे. एव्हरेस्टने यापूर्वी सांगितले होते की त्यांच्या उत्पादनांवर कोणत्याही देशात बंदी नाही आणि ग्राहकांना खात्री दिली, की त्यांची उत्पादने सुरक्षित आणि उच्च दर्जाची आहेत. तीन एम.डी.एच. उत्पादने - करी पावडर (मद्रास करीसाठी मसाल्यांचे मिश्रण), मिश्र मसाला पावडर, सांबार मसाला आणि एव्हरेस्ट फिश करी मसाला या उत्पादनांमध्ये कर्करोगजन्य घटक आढळून आल्याचे म्हटल्यावर एफ.एस.एस.ए.आय.ने सांगितले, की या संबंधित उत्पादनांची अन्नसुरक्षाअंतर्गत विहित मापदंडांच्या अनुषंगाने तपासणी केली गेली. आणि मानके (अन्नउत्पादने मानके आणि अन्नमिश्रित पदार्थ) नियमन २०११ आणि अन्नसुरक्षा आणि मानके (दूषित पदार्थ, विषारी पदार्थ आणि अवशेष) नियमन २०११ समाविष्ट पदार्थ, कीटकनाशकांचे अवशेष आणि इतर दूषित घटक इत्यादी एम.डी.एच. आणि एव्हरेस्ट कंपन्यांनी त्यांच्या उत्पादनांमध्ये एथिलीन ऑक्साइडचा वापर होत नसल्याचे ठामपणे सांगितले आहे. त्यांनी हेदेखील अधोरेखित केले, की भारतीय अन्न-नियामक किंवा आंतरराष्ट्रीय प्राधिकरणांनी त्यांच्या उत्पादनांचा या कर्करोगजन्य निष्कर्षांशी थेट संबंध जोडणारे ठोस पुरावे दिलेले नाहीत. या आरोपांची शहानिशा करण्यासाठी भारताच्या अन्नसुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने त्यामुळे उत्पन्न होणाऱ्या चिंतांचे निराकरण करण्यासाठी, तसेच निर्यात केलेल्या अन्नउत्पादनांच्या सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी चौकशी सुरू केली आहे. मात्र ही पावले उचलली गेली असली तरी या खाद्यपदार्थांसंबंधी ग्राहकांचा विश्वास डळमळीत झाला आहे. अनेक लोकांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर भारतातील पॅकेज केलेले मसाले आणि इतर खाद्यपदार्थांच्या सुरक्षिततेबद्दल चिंता व्यक्त केली आहे. हा मुद्दा जागतिक बाजारपेठेत, विशेषत: भारतासारख्या प्रमुख अन्न निर्यातदारासाठी अन्नसुरक्षा मानके राखण्यासाठी मोठेच आव्हान ठरणार आहे.

हाँगकाँग आणि सिंगापूरने एथिलीन ऑक्साइड हा कर्कजन्य पदार्थ असल्याचे कारण देऊन घटक शोधल्यानंतर एम.डी.एच. आणि एव्हरेस्ट या लोकप्रिय भारतीय मसाल्यांच्या ब्रँडच्या चार उत्पादनांवर बंदी घातली. त्याचे निर्यातीवर परिणाम काय व्हायचे ते होतीलच, पण बहुतेक भारतीय लोक हे मसाले वापरत असल्यामुळे ह्या बातमीने ते अस्वस्थ झाले आहेत. त्यांच्या सुरक्षिततेबद्दल ते चिंतित आहेत, असे ताज्या सर्वेक्षणात आढळून आले आहे. सर्वेक्षणात असेही दिसून आले आहे की अन्नसुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी लोकांचा भारतीय अन्न नियामकांवर फारसा विश्वास नाही. लोकलसर्कल या भारतातील अग्रगण्य समुदाय सोशल मीडिया प्लॅटफॉर्मने केलेल्या सर्वेक्षणानुसार, या दोन ब्रँडचे पॅकेज केलेले मसाले दीर्घकाळ वापरत असलेल्या सुमारे ७२ टक्के ग्राहकांनी सांगितले, की त्यात कर्करोगजन्य घटक आढळल्यानंतर त्यांना चिंता वाटणे स्वाभाविक आहे. अशी अनेक सर्वेक्षणे अधूनमधून होत असतात. विशेषत: प्रासंगिक महत्त्वाच्या विषयांवर केल्या जाणाऱ्या सर्वेक्षणांमध्ये बऱ्याच वेळा अर्धवट माहितीवर हा डोलारा उभा असतो, त्यामुळे ह्या सर्वेक्षणाचे निष्कर्ष अंतिम मानण्याचे काहीच कारण नसते. हा व असेच खोलवर विचार करण्याची क्षमता वैज्ञानिक दृष्ट्या प्रगल्भ समाजात रुजवणे हाच 'विज्ञानधारा'चा महत्त्वाचा उद्देश आहे. हे मंथन होत असताना गोंधळून न जाता मार्ग काढणे शहाणपणाचे ठरणार आहे. त्यामुळे केवळ बातम्यांवर आधारित मते न बनवता त्यातील शास्त्रीय मर्म समजावून घेण्याच्या दिशेने प्रयत्न व्हावयास हवेत. ओपिनियन पोल वैचारिक दृष्ट्या महत्त्वाचे असले तरी निर्णयप्रक्रियेत त्यांचा प्रभाव नसावा.

एथिलीन ऑक्साइडबद्दल सांगायचे, तर हा साधारण तापमानाला गोड गंध असलेला ज्वलनशील रंगहीन वायू आहे. प्रामुख्याने अँटिफ्रीझसह इतर रसायने तयार करण्यासाठी हा वायू वापरला जातो. काही प्रमाणात एथिलीन ऑक्साइडचा वापर कीटकनाशक आणि निर्जंतुकीकरणासाठी केला जातो. एथिलीन ऑक्साइडची डी.एन.ए.ला हानी पोहोचवण्याची क्षमता आहे. त्यातच कर्करोगजन्य असल्याचे गुपित दडलेले आहे. एथिलीन ऑक्साइडच्या मानवी संपर्कात येण्याचे प्राथमिक मार्ग म्हणजे श्वासावाटे आणि अन्नावाटे आहेत. एथिलीन ऑक्साइड अत्यंत स्फोटक आणि प्रतिक्रियाशील असल्यामुळे, त्याच्या स्फोटक

गुणधर्मासाठी वापरल्या जाणाऱ्या उपकरणांमध्ये साधारणपणे घट्ट बंद आणि अत्यंत स्वयंचलित प्रणाली असतात, त्यामळे मानवी संपर्क सहसा येत नाही. ही खबरदारी असूनही एथिलीन ऑक्साइड तयार करणाऱ्या किंवा वापरणाऱ्या औद्योगिक सुविधांजवळ राहणारे कामगार आणि लोक अनियंत्रित औद्योगिक उत्सर्जनामुळे त्याच्या संपर्कात येऊ शकतात.

या सर्व घोळातून अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.

आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या मसाल्यांच्या गुणवत्तेसंबंधी शंका निर्माण होऊन व्यापारावर त्याचा अनिष्ट परिणाम होऊ शकतो.

आंतरराष्ट्रीय मानके आणि राष्ट्रीय कायदे यात योग्य ती सांगड नसल्याने अजूनही अनेक बाबतीत नियामक यंत्रणांमध्ये एकवाक्यता नसल्याचे अनेकदा आढळून येते.

अन्नपदार्थांच्या गुणवत्तेविषयी जनमानसातदेखील कमालीची उदासीनता पाहावयास मिळते.

आपल्या देशातील अन्नाच्या गुणवतेबद्दल एकंदरीतच अनास्था जाणवते. रस्त्याच्या कडेने उभे असलेल्या फेरीवाल्यांपासून अगदी पंचतारांकित हॉटेलांपर्यंत खायचे पदार्थ निर्दोष मिळतीलच याची अजिबात खात्री नसते. त्यामुळे सार्वजनिक ठिकाणी खाणे अजूनही धोकादायक या सदरातच मोडते.

आपल्याकडील गुणवत्ता तपासणी यंत्रणा या पूर्णपणे सक्षम नाहीत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेकदा आपला मानभंग होतो, व्यापारावर त्याचा अनिष्ट परिणाम तर होतोच, पण त्याने आपल्याला मानहानी स्वीकारावी लागते.

आपल्या नागरिकांच्या आरोग्याला या एकूण अनास्थेचा फटका बसल्याशिवाय राहात नाही.

या मसाल्यांच्या घोळातून हे प्रश्न सुटण्यास मदत झाली तर ती इष्टापत्ती म्हणावी लागेल.

**संदर्भ**


https://www.tbsnews.net/world/eu-finds-cancer-causing-chemical-527-indian-items-835846

https://www.newindianexpress.com/nation/2024/Apr/28/mdh-denies-use-of-carcinogenic-ingredients-after-hong-kong-singapore-ban-indian-spices

https://www.newindianexpress.com/nation/2024/Apr/28/mdh-denies-use-of-carcinogenic-ingredients-after-hong-kong-singapore-ban-indian-spices




**– शरद काळे**

sharadkale@gmail.com




ग्रंथाली




**Almitra Patel**
Waste Warrior
**Sharad Kale**

मूल्य ४०० रुपये
सवलतीत २५० रुपये




**गंधर्वांचे देणे**
पं. कुमारजींशी संवाद
संपादन : अतुल देऊळगावकर

एका अभूतपूर्व
मुलाखतमैफलीचे पुस्तक

मूल्य ८०० रु. सवलतीत ५०० रु.
घरपोच हवे असल्यास ५५० रु.
संपर्क : ९२२३४६६८६०




**अनात्म**
लिना संखे


मूल्य २५० रुपये
सवलतीत १५० रुपये




**आमचा बाप आन् आम्ही**
डॉ. नरेंद्र जाधव

२००वी
आवृत्ती!

मूल्य ४०० रु.
सवलतीत २५० रु.



# एका अनुवादिकेची कौतुकपन्नाशी...

प्राची बापट

काही माणसं अतिशय व्रतस्थपणे आपल्या हातातलं काम करत असतात. एखाद्या ध्येयानं प्रेरित होऊन निष्ठेनंआपलं काम करत असताना ती त्यांच्याही नकळत सामाजिक बांधिलकीचा वसा जपत असतात. आणि असंच एक कंकण आपल्या करी बांधून सविता दामले गेली दोन तपांहून जास्त काळ मराठी अनुवादक म्हणून कार्यरत आहेत आणि मराठी साहित्यिक वर्तुळात समकाळातील एक उत्तम अनुवादक म्हणून आपली स्वतःची एक खास ओळख निर्माण करण्यात त्या यशस्वी झाल्या आहेत. सविताताई म्हणजे प्रवाही आणि सुबोध लेखन, सविताताई म्हणजे दिलेल्या वेळेत आपलं काम चोखपणे करणारी अनुवादिका, सविताताई म्हणजे मराठी-इंग्रजीचा शब्दकोश आणि भाषेवरची कमालीची हुकूमत आणि भाषेवर असणारं अलोट प्रेम अशी त्यांची दुसरी आणि अगदी उचित ओळख आहे. अलीकडेच भूतपूर्व पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू ह्यांच्या 'द डिस्कवरी ऑफ इंडिया' ह्या जगविख्यात ग्रंथाचा त्यांनी केलेला मराठी अनुवाद प्रकाशित झाला. हा अनुवाद हे सविताताईंनी अनुवादित केलेलं पन्नासावं पुस्तक असा दुग्धशर्करा योगही ह्या निमित्तानं जुळून आला. ह्याच प्रसंगाचं औचित्य साधून त्यांच्या जिवलग मैत्रिणी मेधा कुलकर्णी आणि माधवी कुलकर्णी ह्यांनी आपल्या ह्या नेटानं आणि आस्थेनं अनुवादाचं काम करणाऱ्या मैत्रिणीचं कौतुक करण्यासाठी एक हृद्य सत्कारसोहळा आयोजित केला, त्याचं नावच मुळी 'कौतुकपन्नाशी'. ह्या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध, व्यासंगी संपादक, पत्रकार आणि माजी खासदार कुमार केतकर उपस्थित राहिले.

अनुवादाचं काम तसं जबाबदारीचं, परंतु अनुवादकाचा अनेकदा उल्लेखच केला जात नाही किंवा पडद्यामागचा कलाकार असं गणलं जातं. परंतु साहित्य, पत्रकारिता ह्या क्षेत्रातील दिग्गज मंडळींनी ह्या कार्यक्रमाला लावलेली उपस्थिती बघता सविताताईंची अनुवाद ह्या क्षेत्रातील कर्तबगारी अगदी लख्खपणे जाणवत राहिली. ह्या नेटक्या आणि रंगलेल्या सोहळ्याचे आयोजन त्यांच्या आकाशवाणी आणि दूरदर्शनवर अनेक दशकं काम केलेल्या अनुभवी आणि निष्णात मैत्रिणींनी केल्यामुळे ह्या कार्यक्रमाचा दर्जा साहजिकच 'वरचा क्लास' होता. कार्यक्रमाच्या सुरुवातीला संयोजकांच्या तर्फे माधवी कुलकर्णी ह्यांनी निमंत्रितांचे आणि उपस्थित मैत्र परिवाराचे स्वागत केले. आणि उत्सवमूर्ती सविता दामले ह्यांना गुलाबाचे फूल देऊन ह्या 'कौतुकपन्नाशी'च्या कार्यक्रमाची यथोचित सुरुवात झाली. मेधा कुलकर्णी ह्यांनी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे शकुमार केतकर ह्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले तर सविता ताईंनी प्रमुख पाहुण्यांना एक छोटीशी अल्पस्वल्प प्रेमाची भेट दिली. त्यानंतर ह्या सत्कार समारंभाच्या सूत्रसंचालक म्हणून चित्रा वाघ ह्यांनी ह्या सोहळ्याची सूत्रं आपल्या हाती घेतली. उपस्थितांमधल्या संदीप वासलेकर, शारदा साठे, माधवी कुंटे, निळू दामले, जतीन देसाई, प्रकाश अकोलकर, डॉ.शेखर अंबर्डेकर अशा अनेक मान्यवरांची ओळख चित्राताईंनी करून दिली. आणि मग सुरू झाला मुख्य सोहळा जो उत्तरोत्तर रंगतच गेला.

भारतासारख्या बहुविध, बहुभाषिक देशाला ओळखणं आणि त्याच्या ह्या बहुविधतेचा आदर राखत लोकशाही मूल्यांना रुजवण्याचं महाकठीण काम स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी केलं. सविताताईंनी पंडितजींच्या नुकत्याच मराठीत अनुवादित केलेल्या 'द डिस्कव्हरी ऑफ इंडिया' ह्या ग्रंथातील ह्या बहुविधतेविषयीची पंडितजींची भूमिका यथार्थपणे दाखवून देणाऱ्या एका उताऱ्याचं वाचन सामाजिक आणि शैक्षणिक कार्यकर्ते आशय गुणे ह्यांनी केले. आपल्या सामाजिक उपक्रमांमुळे जागतिक स्तरावर प्रसिद्ध असलेल्या मिलिंडा गेट्स ह्यांना विविध सामाजिक उपक्रम राबवण्यासाठी निधी उभारताना आलेले विविधांगी अनुभव आणि ह्या उप्रक्रमा-मागची त्यांची मनोभूमिका विषद करणाऱ्या त्यांच्या अनुवादित आत्मचरित्रातील एका उताऱ्याचं वाचन प्रसिद्ध लेखिका शर्मिला फडके ह्यांनी केलं. सविताताईंनी अनुवादित केलेल्या पुस्तकांचे विषय किती बहुरंगी आणि बहुसांस्कृतिक आहेत ह्याची साक्षच वाचन केलेल्या ह्या निवडक उताऱ्यांमधून पटत गेली. त्यांनी सामाजिक, आर्थिक, राजकीय ह्या विषयांच्या सोबत ललित



**सविता दामले आणि मेधा कुलकर्णी**

साहित्याचेदेखील अनुवाद केले आहेत. आणि जणू ह्याचीच तोंडओळख व्हावी यासाठीच 'इस्तंबूल इस्तंबूल' ही राजकीय उलथापालथीची पार्श्वभूमी असलेल्या कादंबरीचं वाचन सुप्रसिद्ध ब्लॉगर सायली राजाध्यक्ष यांनी केलं. तसेच 'पिवळा मासा' ह्या अ-तमिळ वाचकांच्यातदेखील प्रसिद्ध अशा तमिळ कथालेखिका अंबई ह्यांच्या मराठी अनुवादाचं वाचन माजी दूरदर्शन निर्मात्या माधवी कुलकर्णी ह्यांनी केलं.

अनुवादकाच्या कामाला प्रकाशकांचा कायमच सक्रिय पाठिंबा गरजेचा असतो. सविताताईंच्या ह्या कौतुकपन्नाशीला मनोविकास प्रकाशनाचे आशिष पाटकर, पॉप्युलर प्रकाशनाच्या अस्मिता मोहिते, ग्रंथालीचे सुदेश हिंगलासपूरकर, हेडविग मीडिया हाऊसचे चिन्मय पंडित, अक्षर प्रकाशनाचे चंद्रकांत माणगावे, मधुश्री पब्लिकेशनचे शरद अष्टेकर, मंजुल पब्लिशिंग हाऊसचे चेतन कोळी आणि ऋतुरंग प्रकाशनाचे अरुण शेवते असे मराठीतले अनेक मान्यवर प्रकाशक आवर्जून सहभागी झाले होते. ह्या प्रसंगी सविताताईंनी आपल्या ह्या सर्वच मान्यवर प्रकाशकांचा छोटेखानी सत्कार केला आणि त्यांचे आभार मानले. प्रकाशकांच्या वतीने चेतन कोळी ह्यांनी ह्या प्रसंगी एक छोटंसं भाषण करताना अगदी आवर्जून सविताताईंच्या ओघवत्या आणि प्रवाही अनुवादकौशल्याची वाखाणणी केली. आणि त्यानंतर प्रेक्षक ज्याची अत्यंत उत्सुकतेने वाट बघत होते ती सविताताईंची मुलाखत सुरू झाली. मुलाखत असं म्हणायचं फक्त, खरं तर त्या केवळ आणि निव्वळ घरगुती गप्पा होत्या. एका मैत्रिणीनं दुसरीशी मारलेल्या सहज, साध्या, मनमोकळ्या आणि मनस्वी गप्पा. सविताताईंनीं त्यांच्या नेहमीच्या साध्या आणि दिलखुलास भाषेत त्यांचा अनुवादाचा एकूण प्रवास कधी आणि कसा सुरू झाला, त्यात कोणते महत्त्वाचे टप्पे आले ह्या विषयी तर सांगितलंच, शिवाय त्यांची अनुवाद करण्याची संपूर्ण प्रक्रिया, त्या अनुवाद करताना निवडत असलेली पुस्तकं आणि त्यामागची त्यांची भूमिका हयाविषयीपण मेधाताईंनी त्यांना आवर्जून बोलतं केलं. आणि बोलता बोलता सविताताईंनी सहाशे-सातशे पानांचा अनुवाद त्या कशा करतात, त्यासाठी त्या काय विशेष खबरदारी घेतात; तसंच त्या निमित्तानं त्यांना आलेले सुंदर आणि हृद्य अनुभव त्यांनी श्रोत्यांना अगदी जाता जाता सांगावेत इतक्या कमालीच्या सहजतेनं सांगितले. अभिनेत्री रिमा ह्यांनी अंतर्नाद मासिकातील अनुवादित कथा वाचून सविताताईंना आवर्जून केलेला फोन आणि नेमके त्याचवेळी सविताताईंचं बँकेत कॅशियर म्हणून नोटा मोजत बसणं असो किंवा ह्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे कुमार केतकर ह्यांनी सोनिया गांधींच्या आत्मचरित्राचा सविताताईंनी केलेला मराठीतला ओघवता अनुवाद वाचून त्यांना जणू सोनियाजींनींच मराठीत लिहिलं आहे असंच वाचताना वाटत राहिलं अशी दिलेली दाद असो, हे नर्मविनोदी किस्से आणि ह्या सर्व प्रतिक्रियांमुळे सविताताईंना आपण भरून पावल्याची होणारी जाणीव हे सगळंच तिथल्या उपस्थित प्रेक्षकांच्या मनाच्या तारांना अलगद छेडून गेलं. सजग वाचकांचं मन आणि मान्यवरांनी पाठीवर दिलेली कौतुकाची थाप बघून सविताताईंनी जिंकलं ही आणि अशीच काहीशी प्रतिक्रिया तिथल्या प्रत्येकच श्रोत्याच्या मनात त्याच्याही नकळतपणे उमटून गेली.

प्रमुख पाहुणे कुमार केतकर ह्यांनी आपल्या भाषणात सर्वप्रथम सविताताईंच्या अनुवादकौशल्याला दाद देऊन त्यांनी उपस्थित सर्वच श्रोत्यांना जणू काळाच्या राजकीय सफरीवरच नेऊन आणलं. आजच्या वर्तमानातून मागे मागे जात आपल्या देशात घडलेल्या अनेक ऐतिहासिक घटनांची, राजकीय पेचप्रसंगांची आठवण करून देत आजच्या राजकारणावर, सरकारवर आणि प्रत्यक्ष पंतप्रधानांच्या अनेक निर्णयांवर त्यांनी ज्या कमालीच्या सहजतेनं टिप्पणी केली, ती ऐकताना श्रोत्यांची जणू 'सही पकडे हो' अशीच भावना झाली असावी. सविताताई जोमानं अनुवाद करू लागल्या तो काळ २०१३ आणि तिथून पुढचा. ह्याच आणि थोड्या अलीकडच्या काळात आपल्या देशातपण अनेक राजकीय उलथापालथी घडत होत्या. नवीन समीकरणं जुळून येत होती. अण्णा हजारेंचं आंदोलन, त्यांना मीडियानं दैवत्व बहाल करणं, हळूहळू त्यांच्या आंदोलनाचा उडालेला फज्जा आणि त्या पार्श्वभूमीवर मोदींचा दिल्लीच्या राजकीय क्षितिजावर झालेला उदय आणि त्यानंतर लगेचच अवघ्या तीन वर्षांत त्यांनी पंतप्रधानपदाची घेतलेली शपथ आणि ह्या सगळ्यामागे मीडियासकट अनेक शक्तींचा छुपा हात, ह्यावर त्यांनी अनेक उदाहरणं देऊन तो आता थोडासा विस्मृतीत गेलेला 'कालचा काळ' फारच कुशलतेनं श्रोत्यांच्या डोळ्यांसमोर प्रत्यक्ष साकार केला. आणि ह्याच मन्वंतराच्या काळात सविताताईंनी अनुवाद करताना भारताच्या महान नेत्यांची किंबहुना युगपुरुषांच्या ग्रंथांची केलेली निवड हे त्यांच्या राजकीय साक्षरतेची, प्रगल्भतेची आपल्याला साक्ष पटवून देणारी आहे म्हणून त्यांचं खास कौतुकदेखील केलं. आणि ही 'शहाणीव' सविताताईंच्या नजरेला किती सहज

लाभलेली आहे आणि तीच जाणीव अभिनंदनीय आहे ह्याची साक्ष सविताताईंसह उपस्थित सर्वच श्रोत्यांच्या अगदी सहज ध्यानात त्यांनी आणून दिली. संपादक म्हणून त्यांना लाभलेली ही दृष्टी आणि भारतीय राजकारणाचा त्यांचा व्यासंग आणि तो केवळ काही मिनिटांच्या अवधीत मांडण्याची त्यांची हातोटी ह्याची दखल उपस्थित श्रोत्यांनी नक्कीच घेतली असावी.

सरतेशेवटी, कौतुकपन्नाशी ह्या आपुलकीनं आयोजित केलेल्या कार्यक्रमाच्या सूत्रसंचालक आणि सुसंवादिका चित्रा वाघ ह्यांना गुलाबपुष्प आणि छोटीशी स्नेहभेट देऊन आणि कार्यक्रमाला उपस्थित राहिलेल्या सर्व श्रोत्यांचे उत्सवमूर्ती सविताताई ह्यांनी आभार मानून ह्या जाणिवा समृद्ध करून जाणाऱ्या रंगतदार सोहळ्याची सफल सांगता झाली.

**– प्राची बापट**

भ्रमणध्वनी : ९८२०६००६४१

---

## प्रकाशवाटा धुंडाळणारे हेमंत पाटील




**हेमंत पाटील यांच्याशी संवाद साधताना सुधा तुंबे**

ग्रंथाली–प्रतिभांगण आयोजित ‘काहीतरी विशेष’ या कार्यक्रमाच्या दुसऱ्या भागात १९ जून २०२४ रोजी नॅब, इंडियाचे सचिव हेमंत पाटील यांची मुलाखत लेखिका सुधा तुंबे यांनी घेतली. वयाच्या अवघ्या २६ व्या वर्षी हेमंत पाटील यांना अचानक अंधत्व आले, त्यानंतर खचून न जाता ते आयुष्याला कसे सामोरे गेले याविषयी बोलताना ते म्हणाले, ‘‘अमेरिकेत औषध कंपनीत काम करत असताना अचानक रासायनिक स्फोट झाला नि मला अंधत्व आले. कंपनीनं मला लंडनला उपचार दिले, मीही माझ्याकडची साडेतेरा लाखांची पुंजी उपचारांसाठी खर्च केली. परंतु यश आले नाही. अखेर मी माझ्या भुसावळमधील गावी परतलो. तिथे आल्यावर एक कफल्लक आंधळा म्हणून जगणं माझ्या स्वाभिमानी मनानं स्वीकारलं नाही आणि एके दिवशी घर सोडून मुंबईत आलो. मुंबईत माझं कुणीच नव्हतं. अंधत्व आल्यामुळे माझ्या जवळची माणसंही माझ्यापासून दूर गेली. अशा काळात उदारनिर्वाहासाठी मी रस्त्यावर बसून खेळणी विकली. एकातून एक असे लहानसहान उद्योग करू लागलो. एके दिवशी मला नॅब या संस्थेची माहिती मिळाली आणि तिथून माझ्या आयुष्याला कलाटणी मिळाली. तिथे मी ब्रेल लिपी शिकलो आणि मग मानसशास्त्रात पदवी घेतली व समाजशास्त्रात पदव्युत्तर पदवी घेतली. तिथून पुढे मी आत्मनिर्भरतेच्या एकेक पायऱ्या चढत गेलो. इतर अंध व्यक्तींनाही आपण आत्मनिर्भरतेचा मार्ग दाखवायचा असा संकल्प केला आणि नॅबचा डेप्युटी डायरेक्टर म्हणून राष्ट्रीय पातळीवर मी २५ वर्षं काम केलं.’’

मुलाखतीतून हेमंत पाटील यांनी अंध व्यक्तींच्या जीवनातील विविध बाबींवर प्रकाश टाकला. अंधांना सहावं इंद्रिय असतं का, याविषयी बोलताना ते म्हणाले, की पाहता येत नसल्यामुळे त्यांच्या इतर संवेदना अधिक जागृत होऊन काम करतात, ज्यालाच आपण अंध व्यक्तीचं सहावं इंद्रिय म्हणतो. अंधांना स्वप्न कशी पडतात, याविषयी बोलताना ते म्हणाले, जी व्यक्ती जन्मतःच अंध आहे त्या व्यक्तीला ऑडिओ स्वप्नं पडतात. आवाजाच्या माध्यमातून त्यांची स्वप्नं प्रकट होत असतात.

अनेक अंध व्यक्तींना स्वावलंबी बनविण्यासाठी हेमंत पाटील सक्रिय असतात. त्याविषयी बोलताना ते म्हणाले, त्यांच्याकडे अंध व्यक्ती आल्यावर ते पहिल्यांदा त्या व्यक्तीचा स्वाभिमान जागृत करतात, मग त्या व्यक्तीचा स्वयंप्रेरणेनं प्रवास सुरू होतो. नॅबच्या माध्यमातून विविध प्रकारचे प्रशिक्षण, मार्गदर्शन याबाबतीत सहकार्य करून त्या व्यक्तीला मदत केली जाते, जेणेकरून ती स्वतःच्या पायांवर उभी राहील.

हेमंत पाटील यांनी व्यक्तिगत जीवनातील पोटच्या मुलाचा मृत्यू आदी दुःखद प्रसंग मुलाखतीच्या ओघात सांगितले व हे आघात सहन कसे केले याविषयी त्यांनी दिलेली प्रतिक्रिया सर्वांचेच मन हेलावणारी होती. ते म्हणाले, की मी परमेश्वराला सांगतो की तू मला कितीही दुःख दे, मी हरणार नाही, दुःखी होणार नाही, त्यामुळे आता परमेश्वरालाही मला दुखी करण्यासारखी गोष्ट सापडत नसेल.

सुधा तुंबे यांनी सहजशैलीत घेतलेल्या मुलाखतीतून हेमंत पाटील यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू उलगडत गेले. ही मुलाखत डोळस व्यक्तीच्या डोळ्यांत अंजन घालणारी ठरली, अशी प्रतिक्रिया उपस्थितांनी व्यक्त केली. हेमंत पाटील यांची ही मुलाखत आपल्याला लवकरच ग्रंथाली–प्रतिभांगण या यूट्यूब चॅनेलवर पाहता येईल. ●




# ग्रंथपरिचय




**डॉ. निर्मोही फडके**
९९२०१ ४६७११


**एडका**
**डॉ. मुरहरी केळे**




'विद्युत धनु' अर्थात 'विजेचं वलय' लाभलेला कुणी जेव्हा लेखणीबहाद्दर होऊन 'आत्मकथन' करतो, तेव्हा त्याच्या कथनातून एक सशक्त वीजप्रवाह वाचकांपर्यंत वाहत येतो. 'विजेचा शॉक किंवा धक्का' हा आपल्याला एरवी भयावह वाटतो. मात्र हा शॉक एखाद्या पुस्तकातून बसला, तर तो आपल्या देहमनातल्या धमन्यांमधला विचारप्रवाह चैतन्यमयी करून टाकतो. आपल्यातल्या 'मी'ला अंतर्मुख करतो.

विजेबद्दल नमनाला घडाभर तेल ओतण्याचं कारण हे की, आज ज्या आत्मकथनपर पुस्तकाचा परिचय आपण वाचत आहोत ते आत्मकथन, एका 'वीज' अधिकाऱ्याचं आहे.

डॉ. मुरहरी केळे लिखित 'एडका' हे आत्मचरित्र संस्कृती प्रकाशन, ठाणे ह्यांनी नुकतंच प्रकाशित केलं. हा ललित अंगानं जाणारा लेखनप्रकार असला, तरी त्यामध्ये वास्तवाच्या शास्त्रकाट्याची सक्त परीक्षा असते. हा एक सत्याचा प्रयोग असतो. एखाद्या व्यक्तीचं आत्मचरित्र प्रकाशित झाल्यावर त्या व्यक्तीच्या आयुष्यात ज्या घटना घडलेल्या असतात, त्या घटनांचे साक्षीदार आजूबाजूला वावरत असतात. आत्मचरित्रकारांनं सगळ्यांबद्दलच बरं लिहिलं तरी किंवा कठोर सत्य लिहिलं तरी ते धडधडीतपणे नाकारणारे असे ते जिवंत पुरावे असतात. खरे-खोटे तपशील पसरवणारेही असतात. अशा परिस्थितीत आपल्या आयुष्यात घडलेल्या चढ-उतारांचा, अनुभवांचा वस्तुनिष्ठपणे लेखाजोखा मांडणं म्हणजेच आपल्या पायावर धोंडा मारून घेण्यासारखं असतं. फार थोडे आत्मचरित्रकार असे असतात, जे प्रांजळपणे घडलेल्या घटनांना पारदर्शक रितीनं आपल्यासमोर मांडतात. 'एडका' हे एक असं प्रांजळ आत्मकथन आहे.

दुष्काळी खेडेगावात राहणाऱ्या, व्यावहारिक पातळीवर अशिक्षित, पण मनानं-वागणुकीनं सुशिक्षित, संस्कारित असलेल्या आई-वडिलांच्या पोटी जन्माला आलेला मुरहरी ऊर्फ मुऱ्या ते ढीगभर पदव्या प्राप्त केलेले, अनेक पदे भूषवलेले, मान-सन्मान प्राप्त झालेले, विद्युत क्षेत्रात कनिष्ठ अभियंता ते त्रिपुरा राज्य वीज मंडळाच्या अध्यक्षपदापर्यंत तथा व्यवस्थापकीय संचालकपदापर्यंत झेप घेतलेले डॉ. मुरहरी केळे, असा जवळजवळ सहा दशकांचा यशस्वी प्रवास 'एडका'मधून आपल्यासमोर साकारतो.

पुस्तकाचं शीर्षक 'एडका' म्हणजे मेंढा असं का? तर हे आत्मकथन वाचताना आपल्याला उलगडत जातं.

कोणाचंही आत्मकथन किंवा आत्मचरित्र हे त्या काळाचा वास्तवदर्शी आरसा असतं. आरसा कधी खोटं बोलत नाही. तद्वतच आत्मकथन सत्यच कथन करतात, किंवा त्यांनी सत्यच कथन करावं ही प्राथमिक आणि महत्त्वाची अट असते, आणि खरं तर आत्मकथनकारासाठी हीच अट वेदनादायी, क्लेशदायी ठरू शकते. कारण आयुष्य हे दुःखाच्या, संकटाच्या १०० धाग्यांनीच विणलं जातं, हे कटू सत्य. आत्मकथनात ह्या धाग्यांचं अस्सल असणं हे जितकं त्रासदायक तितकंच धोकादायकही ठरू शकतं.

आत्मचरित्राचा प्रोटॅगॉनिस्ट हा कल्पिताच्या राज्यातला नसल्यामुळे त्याला 'नायक' किंवा 'नायिका' होता येत नाही. परंतु त्याच्या सामान्य वाटणाऱ्या आयुष्यात असामान्य गोष्टी कधी घडतात, तर कधी तो/ती त्या वास्तवरूपांत घडवून आणतात. त्या अर्थानं ते नायक/नायिकाच असतात. 'एडका'मधला जीवनसंघर्ष हा डॉ. मुरहरी केळे ह्यांचा, जगणं लखलखीत करणारा संघर्ष आहे. बालपणापासून आयुष्याच्या मध्यान्हीपर्यंत त्यांच्या आयुष्यात आलेले चढ-उतार, उलथापालथी, आशा-निराशा, यश-अपयश इत्यादीचं खरंखुरं चित्र सगळ्या रंगसंगतींसह आत्मचरित्राच्या कॅनव्हासवर साकारलेलं दिसतं. जितक्या संयत रितीनं लेखकांनी आपल्या आयुष्यातल्या संघर्षाला तोंड दिलं आहे, तितक्याच संयत रितीनं त्यांनी आत्मचरित्रातही आपल्या श्रमजीवी वर्गाच्या व्यथा-वेदना मांडल्या आहेत. वैयक्तिक आयुष्यातल्या घटना, कार्यक्षेत्रातलं राजकारण इत्यादीबद्दल सडेतोड तरीही संयमित कथन केलं आहे. जिथे स्वतःची चूक तिथे प्रांजळ कबुली आणि जिथे नाही, तिथे स्पष्ट वक्तव्य करत हा एडका धडकही मारतो.

घरातल्या वारकरी संप्रदायाचा दाट प्रभाव लेखकांच्या विचारांवर आणि लेखनावर असल्याचा प्रत्यय त्यांच्या शब्दसंपदेतून, शब्दलालित्यातून आणि मांडणीतून येतो. चित्रदर्शी भाषाशैली, संवादांमध्ये बोलीचा जिवंतपणा, ग्रामजीवनाचे आणि नंतर देशभरातल्या, परदेशांतल्या फिरतीच्या आयुष्याचे अनुभव, वीज मंडळासारख्या एका वेगळ्या कार्यक्षेत्रातले तपशील, सामाजिक जीवनातल्या अनुभवांना बुद्धिवादी विचारसरणीची-चिंतनाची जोड इत्यादीमुळे हे आत्मकथन माहितीपर न राहता वाचनीय झालं आहे. गेल्या पाच दशकांत घडलेल्या सामाजिक-सांस्कृतिक अभिसरणाचा आत्मचरित्र ह्या रूपबंधातला एक दस्तऐवज म्हणूनही 'एडका' हे उत्तम निर्मितिमूल्य असणारं पुस्तक महत्त्वाचं ठरतं.

ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अक्षयकुमार काळे 'एडका'च्या ब्लर्बमध्ये लिहितात, 'उपेक्षितांना प्रतिकूल परिस्थितीशी लढण्याची प्रेरणा आणि ऊर्जा देणारे हे आत्मचरित्र अलीकडच्या आत्मचरित्र ह्या साहित्यप्रकारात मौलिक भर टाकणारे आहे.'

सुरुवातीला उल्लेखलेल्या 'विद्युत धनु'च्या ऊर्जेचा 'एडका' वाचताना नक्कीच प्रत्यक्ष अनुभव येतो.

**'एडका'- डॉ. मुरहरी केळे**
संस्कृती प्रकाशन, ठाणे
मूल्य : ५९९ रुपये

## ज्ञानाभाषा मराठीसाठी प्रमाणीकरण गरजेचे – लक्ष्मीकांत देशमुख




**पुस्तकप्रकाशनसमयी – सुमन वाघमारे, लेखक सलील वाघमारे, नीलिमा गुंडी, लक्ष्मीकांत देशमुख, प्रदीप वेलणकर, प्र.ना. परांजपे, सुदेश हिंगलासपूरकर आणि डॉ. लतिका भानुशाली**

'सरकारच्या नवीन भाषिक धोरणानुसार मराठी भाषा अनिवार्य करण्यात आली आहे. अभियांत्रिकी आणि वैद्यकीय यासारखे तांत्रिक शिक्षणदेखील मराठी भाषेतून घेण्याची सुविधा लवकरच प्राप्त होणार आहे. या पार्श्वभूमीवर शुद्ध मराठी भाषेचा आग्रह कायम ठेवला पाहिजे. बोलीभाषा आणि प्रमाणित भाषा असा नाहक वाद उगाच निर्माण केला जातो. बोलीभाषेचा शब्दसंग्रह अफाट असून, त्या भाषेतील काही शब्द प्रमाणित भाषेत आणून प्रमाणित भाषेचे निश्चितीकरण करून प्रमाणभाषा अधिक सुबोध केली पाहिजे.' असे मत माजी संमेलनाध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांनी व्यक्त केले.

'ग्रंथाली'तर्फे सलील वाघमारे लिखित 'मराठी भाषा : लेखन-मार्गदर्शन' या पुस्तकाचे प्रकाशन गुरुवारी, ६ जून रोजी देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. महाराष्ट्र साहित्य परिषदेमध्ये झालेल्या या कार्यक्रमाला लेखक-प्राध्यापक प्र.ना. परांजपे, अभिनेते प्रदीप वेलणकर, लेखिका नीलिमा गुंडी आणि 'ग्रंथाली'चे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर उपस्थित होते.

यावेळी बोलताना, ''शुद्ध मराठी भाषा सर्वदूर लिहिली आणि बोलली जावी यासाठी गेली पन्नास वर्षे अनेक पातळ्यांवर प्रयत्न करण्यात आले. पुस्तके लिहिली गेली. मात्र, त्याचा हवा तसा परिणाम अजून झालेला दिसत नाही. आजही आपण बोलीभाषा आणि प्रमाणभाषा याच्यामध्ये वावरत आहोत. विदर्भ, मराठवाडा आणि खानदेश येथे बोलल्या जाणाऱ्या मराठी भाषेवर स्थानिक रूढी-परंपरांचा प्रभाव असतो, म्हणून ती भाषा शुद्ध नाही किंवा प्रमाणित नाही, असे म्हणणे हे अयोग्य ठरेल.'' असे प्र.ना. परांजपे म्हणाले.

अभिनेते प्रदीप वेलणकर यांनी, ''आम्हा कलाकारांना कोणतीही भूमिका अजरामर करण्यासाठी संहिता अधिक सशक्त असणे महत्त्वाचे असते. परंतु, संहितेच्या सशक्तीकरणाबरोबरच संहिता शुद्ध असल्यास ती भूमिका अधिक प्रभावीपणे प्रेक्षकांपर्यंत पोहोचवणे आम्हा कलाकारांसाठी सोपे होते. संवादाच्या माध्यमातून प्रेक्षकांसमोर मांडली जाणारी भाषा ही व्याकरण आणि उच्चारशास्त्रानुसार शुद्धच हवी.' असे मत प्रदर्शित केले.

'भाषा आणि भाषेतील शब्द निर्माण होण्यामागील प्रथा आणि इतिहास उलगडून सांगितला पाहिजे. शुद्ध आणि अशुद्ध भाषा हे केवळ तांत्रिक पद्धतीने न सांगता ते उदाहरणासह सांगितल्यास अचूक आणि प्रभावी पद्धतीने पोहोचेल. कोणत्याही भाषेचे व्याकरण हे त्या भाषेच्या अंतरंगात शिरण्याची गुरुकिल्ली असते, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. शुद्ध मराठी भाषेच्या नियमांकडे सकारात्मकतेने पाहिले गेले पाहिजे', असे नीलिमा गुंडी यांनी नमूद केले.

हिंगलासपूरकर यांनी प्रास्ताविक केले. लेखक सलील वाघमारे यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. लतिका भानुशाली यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

●

# डॉ. राजश्री दयानंद कटके लिखित ‘स्त्रियांचे आरोग्य’ पुस्तक प्रकाशन




**प्रकानशसमयी डॉ. कटके यांचे सासरे, राही भिडे, नरेंद्र वाबळे, डॉ. तात्याराव लहाने, लेखिका डॉ. राजश्री कटके, डॉ. नीलम गोऱ्हे, भारती लव्हेकर, डॉ. कटके यांच्या मातोश्री, पद्मा धामणे राव, सुदेश हिंगलासपूरकर आणि पंकज दळवी**


ग्रंथालीने प्रसिद्ध केलेल्या डॉ. राजश्री दयानंद कटके लिखित ‘स्त्रियांचे आरोग्य – विविध आजार आणि उपाय, तसेच गरोदरपणातील समस्या’ या पुस्तकाचे प्रकाशन १२ जून रोजी, मुंबई मराठी पत्रकार संघाच्या सभागृहात, महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते झाले. यावेळी विधानपरिषदेच्या आमदार भरती लव्हेकर, डॉ. तात्याराव लहाने, पद्मा धामणे राव, पत्रकार राही भिडे, पत्रकार संघाचे अध्यक्ष नरेंद्र वाबळे, सुदेश हिंगलासपूरकर, डॉ. कटके यांच्या मातोश्री आणि सासरे मंचावर उपस्थित होते. पुस्तकाचे प्रकाशन झाल्याचे जाहीर करून डॉ. गोऱ्हे यांनी हे फार महत्त्वाचे आणि सोप्या भाषेत लिहिलेले पुस्तक आहे, अशी पुस्तकाबद्दल प्रशंसा केली. त्या म्हणाल्या, ‘‘स्त्रियांच्या सामाजिक आणि आरोग्याच्या प्रश्नांचे जवळचे नाते आहे. आरोग्याच्या कारणामुळे स्त्रियांवर हिंसाचार होतो. स्त्रियांना फक्त शारीरिक संघर्ष नसतो. त्यांना मानसिक, वैचारिक संघर्षसुद्धा करावा लागतो.’’ त्या पुढे म्हणाल्या, ‘‘स्त्रियांच्या आरोग्याविषयी अनेक पुस्तके आहेत, परंतु हे पुस्तक नेमकी माहिती देते. याचे वैशिष्ट्य म्हणजे ते स्त्रियांच्या पर्समध्ये राहील या आकाराचे आहे. त्यामुळे ते हवे तेव्हा वाचता येईल. आज समाजमाध्यमातून अनेक प्रकारे उपचार सांगणारे व्हिडिओ टाकले जातात, त्यासाठी तपासणी करण्याबाबत सुचवले जाते. मात्र त्यात किती तथ्य असते याचा विचार करायला हवा. डॉ. कटके यांचे पुस्तक आपल्या मनातील प्रश्नांची सुबोध पद्धतीने उत्तरे देते. वयाच्या विविध टप्प्यांवर होणारे आजार, त्यासाठी घ्यायची काळजी याबद्दल पुस्तकात माहिती आहेच, शिवाय आहारविहार, व्यायामाचे महत्त्व यातून शारीरिक आरोग्यासह मानसिक तंदुरुस्ती कशी राखावी याचेही मार्गदर्शन करते.’’

आपले मनोगत व्यक्त करताना लेखिका डॉ. राजश्री कटके म्हणाल्या, की ‘‘माझे रुग्ण नेहमी म्हणत तुम्ही फार छान समजावून सांगता, तुम्ही हे लिहीत का नाही? यामुळे मला लिहावेसे वाटले. ते डॉ. तात्याराव लहाने, ज्येष्ठ पत्रकार राही भिडे यांना दाखवले तेव्हा त्यांनीही हे पुस्तक प्रसिद्ध करायला हवे असे आग्रहाने सांगितल्यामुळे आज हा प्रकाशनसोहळा घडत आहे. भारती लव्हेकर यांचेही मोलाचे मार्गदर्शन मिळाले. आज पुस्तकाचे प्रकाशन या मान्यवरांच्या उपस्थितीत डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते होत आहे याचा आनंद वाटतो.’’

आरंभी ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पंकज दळवी यांनी केले. ●


## स्त्रियांचे आरोग्य

**प्रा. डॉ. राजश्री दयानंद कटके**




**मूल्य २०० रुपये**
**सवलतीत १२० रुपये**

## डॉ. उज्ज्वला दळवी यांच्याशी 'आरोग्याची कॅप्सुल'मध्ये सहजसुंदर संवाद




डॉ. उज्ज्वला दळवी यांच्याशी संवाद साधताना डॉ. सतीश नाईक


ग्रंथाली-प्रतिभांगण आयोजित 'आरोग्याची कॅप्सुल' या कार्यक्रमाच्या पंधराव्या भागात विविध आजारांवर तर्कशुद्ध पद्धतीने संवाद साधणाऱ्या विदुषी डॉ. उज्ज्वला दळवी यांची मुलाखत डॉ. सतीश नाईक यांनी शुक्रवार, ७ जून २०२४ रोजी वांद्रे येथील 'प्रतिभांगण' या वास्तूत घेतली. मुलाखतीतून डॉ. उज्ज्वला यांचा जीवनपट व लेखनपट श्रोत्यांना उलगडत गेला. लेखनाचे बीज आपल्यात बालपणीच कसे पेरले गेले याविषयी बोलताना त्या म्हणाल्या, घरात पुष्कळ पुस्तके होती. मला दम्याचा त्रास होता, त्यामळे त्या काळात पुस्तकांशी मैत्री झाली. आमच्या घरी असलेल्या पुस्तकांमध्ये कावेरी कर्वे यांची तीन पुस्तके होती. ज्यात शब्दांचे खेळ होते, त्यात मी रमून जायचे. या शब्दखेळांमुळे मला शब्दांमधील गंमत कळू लागली. पंडित महादेवशास्त्री जोशी यांच्या कथा मला आवडायच्या. त्या पुन्हा पुन्हा वाचल्यावर मी एक प्रयोग केला. त्या कथा सुटसुटीत करून त्यांचे पुनर्लेखन केले. माझी आई केळफुलाची भाजी करताना नेहमी म्हणायची की त्याचा चार काढून टाक म्हणजे भाजी सुटसुटीत होईल. मी लेखन करताना हेच पथ्य आजतागायत सांभाळले. लिहिताना चार काढून टाकते आणि लेख सुटसुटीत, सोपे करण्याचा प्रयत्न करते. 'सोन्याच्या धुराचे ठसके', 'जेनेटिक्स कशाशी खातात?' व ग्रंथालीने नुकतेच प्रकाशित केलेले 'आरोग्याचे डोही' या तिन्ही पुस्तकांच्या लेखनात मी हेच भान राखले आहे

डॉ. उज्ज्वला या उत्तम प्राध्यापक व डी.वाय. पाटील महाविद्यालयात वैद्यकशास्त्र विभागाच्या प्रमुखदेखील होत्या. तिथल्या अनुभवाबद्दल बोलताना त्या म्हणाल्या, की मुलांना शिकवताना त्यांना कंटाळा येणार नाही तसेच त्यांना विषय बोजड वाटणार नाही या पद्धतीने शिकवले. तसेच शिकवत असताना विद्यार्थ्यांकडूनही बरेच शिकता आले, समृद्ध होता आले.

व्हाट्सअॅपच्या माध्यमातून अनेकविध माहिती आपल्यासमोर येत असते पण आपल्या विवेकबुद्धीचा वापर करून त्या माहितीची शहानिशा करूनच आरोग्यविषयक उपाय अमलात आणावेत, असा सल्लाही डॉ. उज्ज्वला दळवी यांनी दिला. श्रोतृवर्गात विज्ञानलेखक डॉ. बाळ फोंडके उपस्थित होते. डॉ. फोंडके म्हणाले की डॉ. उज्ज्वला यांचे 'आरोग्याचे डोही' पुस्तक मी वाचले आहे आणि प्रस्तावनादेखील लिहिली आहे. डॉ. उज्ज्वला यांचे लेखन अस्सल असून इथल्या मातीतील आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अश्विनी भोईर यांनी केले. ●


**आरोग्याचे डोही**

डॉ. उज्ज्वला दळवी




**मूल्य ४५० रुपये**
**सवलतीत २८० रुपये**

# ऑफबिट प्रवास भ्रमंतीकाराचा




**आत्माराम परब यांच्याशी संवाद साधताना अश्विनी भोईर**

ग्रंथाली-प्रतिभांगण आणि ईशा टूर्स आयोजित 'आनंदयात्रा पर्यटनाची' या कार्यक्रमाच्या तिसऱ्या भागात १५ जून २०२४ रोजी ईशा टूर्सचे व्यवस्थापकीय संचालक आत्माराम परब यांची मुलाखत अश्विनी भोईर यांनी घेतली. 'ऑफबिट प्रवास भ्रमंतीकाराचा' या विषयावर परब यांनी त्यांच्या आयुष्याचा आणि पर्यटनस्थळांचा ऑफबिट प्रवास मुलाखतीतून उलगडला. ते म्हणाले, 'परळसारख्या गिरणगावातील चाळीत मी वाढलो. तिथल्या वातावरणात राहून आपोआपच मी नीडर बनलो. भीती नावाची गोष्ट मला ठाऊकच नव्हती. त्यामुळे घरातून कोणतीही पार्श्वभूमी नसतानाही मी पर्यटनाच्या उद्योगक्षेत्रात पाऊल टाकलं. या क्षेत्रात आल्यावर ठरवलंच होतं, आपण वेगळं काहीतरी करायचं. बाकीचे लोक ज्या ठिकाणी सहली नेतात, अशा ठिकाणी आपण सहली न्यायच्या नाहीत. काही वेगळी ठिकाणे धुंडाळायची आणि तिथे लोकांना न्यायचं. त्यामुळे ईशा टूर्ससोबत गर्दी नसते तर दर्दी पर्यटक असतात. त्यांना खायला काय मिळालं, राहायला किती आलिशान होतं, यापेक्षा आपण किती सुंदर, वेगळी व अद्भुत ठिकाणं पाहिली याचा आनंद अधिक असतो.'

आत्माराम परब यांना नुकताच बोर्नियाा येथील सरकारने पुरस्कार देऊन गौरवले. त्याविषयी बोलताना ते म्हणाले, 'बोर्नियाा हे निसर्गरम्य बेट कुणालाच माहित नव्हतं. माझ्या शोधक दृष्टीतून मला हे निसर्गरम्य ठिकाण गवसलं. तिथे मी पर्यटकांची सहल घेऊन गेलो होतो. त्याचवेळी बोर्नियाातील एक सरकारी मंडळ बोर्नियाा येथील पर्यटनाची माहिती देण्यासाठी पहिल्यांदाच भारतात आलं होत त्यावेळेस त्यांना कळलं की भारतातून ईशा टूर्स ही कंपनी पर्यटकांना घेऊन तिथे गेली आहे. या गोष्टीचं त्यांना अप्रूप वाटलं आणि त्यांनी माझा अलीकडेच सन्मान केला. मी सतत नावीन्याचा शोध घेत असतो. लडाखला बहुतांश लोक ट्रेकसाठी जायचे, पण तिथेही मी पायोनीयर म्हणून बस्तान बसवलं आणि पर्यटकांना घेऊन जाऊ लागलो. याची पावती म्हणजे तिथल्या शासनानं 'True friend of Ladhakh' हा पुरस्कार देऊन माझा गौरव केला व खुद्द दलाई लामा यांचे सन्मानरूपी आशीर्वाद लाभले. या वर्षी अमेरिकेतील बीएएमच्या अधिवेशनासाठी ईशा टूर्स ट्रॅव्हलिंग पार्टनर म्हणून जात आहे, ही आमच्यासाठी एक आनंदाची बाब आहे.' आत्माराम परब यांनी मुलाखतीतून पर्यटनाच्या क्षेत्रात आलेले विविध अनुभव, पाहिलेली अद्भुत ठिकाणे, भेटलेली आगळीवेगळी माणसे, विविध देशांतील, विविध फेस्टिव्हल, अनेक किस्से मुलाखतीतून सांगितले. आत्माराम परब यांची ही मुलाखत लवकरच प्रेक्षकांना ग्रंथाली-प्रतिभांगण या यूट्यूब चॅनलवर पाहता येईल.

●





# ग्रंथपान



**चांगदेव काळे**
**९८६९२०७४०३**

**गंधर्वांचे देणे**
**पं. कुमारजींशी संवाद**
**संपादन :**
**अतुल देऊळगावकर**




**संगीताची ठेव**

'मोठ्या गवयांवर तुम्ही वाटेल ते लिहिलं तरी चालू शकतं. त्यांचं काही वाकडं होणार नाही. पण नवोदित कलाकार आहेत त्यांच्यावर वाटेल ते लिहितात. लाज नाही वाटत? त्या रोपाला सपोर्ट करायचं सोडून, पाणी घालायचं सोडून. ते का वाढत नाही? तर पाणी घालावं. त्याला वाढवावं. तर ते सोडून, एखाद्या मोठ्या गवयावर राग काढावा ना, तसा काढतात. आमच्याविषयी वाटेल ते लिहा आणि मग या समोर, बघतो तुम्हाला काय येते ते.'

'गंधर्वांचे देणे' हे अतुल देऊळगावकर यांनी संपादित केलेले पुस्तक. पंडित कुमारगंधर्व यांना प्रात्यक्षिकांसह संगीतविषयक विचार सादर करण्याची विनंती ग्रंथालीने केली होती. १३ ते १८ मे १९८५ या काळात सुमारे १३ तास केलेल्या संगीतमैफलीचा आणि संगीताविषयीच्या विचारांचा हा ठेवा त्यावेळी ध्वनिमुद्रित करून ठेवण्यात आला होता. या मैफलीचे आयोजन करताना पंडित कुमार गंधर्व यांना विविध अंगांनी संगीताविषयी व्यक्त होता यावे यासाठी मुलाखतीचे स्वरूप देण्यात आले. या मुलाखतींचे स्वतंत्र असे सहा टप्पे निश्चित करण्यात आले. स्वर-लय-ताल, राग संगीत, विविध गायन प्रकार आणि मला उमजलेले बालगंधर्व, संगीतातील घराणी, लोकसंगीत व ऋतुसंगीत, मी ऐकलेले पाहिलेले गाणे व माझे गाणे. या मुलाखती घेण्यासाठी मंगेश पाडगावकर, शरदचंद्र चिरमुले, श्रीराम पुजारी, वसंत बापट यांना पाचारण करण्यात आले होते. कवयित्री वसंती वासंती मुजुमदार व पंडित सत्यशील देशपांडे यांचे प्रश्नावली तयार करण्यासाठी मोलाचे सहाय्य झालेले आहे हा मुलाखतीचा कार्यक्रम कर्नाटक हॉल, मुंबई येथे झाला. त्याची प्रवेशिका आणि आमंत्रणची छायांकित प्रत या पुस्तकाच्या शेवटी दिलेली आहे.

प्रत्यक्षात त्या मैफलीनंतर हे पुस्तक प्रकाशित होण्याचा योग आला तो तब्बल ४० वर्षांनंतर.

हे पुस्तक वाचत असताना दिसते पंडित कुमारगंधर्व यांनी संगीताचा किती खोलवर विचार केलेला आहे! स्वर, लय, ताल, राग, रियाज, ख्याल, धृपद, धुमार, बंदिशी, ठुमरी, तराणा, ताना, आलाप यांच्या विषयी केलेले विश्लेषण पाहून आपण थक्क होतो. केवळ संगीताची साधना इतकेच ध्येय न ठेवता त्याच्या विविध अंगांना कसे व्यक्त करता येईल यासाठी त्यांनी केलेला अभ्यास आपल्याला थक्क करून सोडतो.

देऊळगावकर यांनी हे पुस्तक साकारताना शेवटी कालानुसार घडणाऱ्या घटनांचा उल्लेख केलेला आहे. परंतु खरी ओळख त्यांची 'गंधर्वांचे देणे' या पुस्तकातून होते. मुलाखती देताना कुमारगंधर्व केवळ संगीताविषयी बोलतात असे नाही तर आपल्या काळातील आणि त्यांच्या अगोदरच्या काळातील जे मोठमोठे गायक होऊन गेले त्यांच्याविषयीदेखील अभ्यासपूर्ण अशी मते व्यक्त करतात. या मैफलीत मुलाखत देताना त्यांच्या स्वभावाचीसुद्धा ओळख आपल्याला होते. सहज विनोद करून जातात. बोलताना विषय स्पष्ट कसा होईल याची काळजी घेतात. बोलणे अगदी सहजसंवादी आणि त्याचसोबत त्या रागातील बंदिशी सादर करतात. अब्दुल करीम खाँ यांच्याविषयी बोलताना ते म्हणतात, 'अब्दुल करीम खाँसाहेबांना तानेने मोहित केलेले नाही. ते स्वरामध्येच राहिले. स्वर हेच त्यांचे दैवत होते. किराणा घराणे आजपर्यंत चालू आहे. हे सर्व अब्दुल करीम खाँसाहेबांमुळे चालू आहे.' 'माझ्याकडे स्त्रीगीतांचा जवळजवळ पूर्ण माळवा लिहिलेला आहे. प्रत्येक गीतावर नोट लिहिली आहे, की कसे स्वर काढले पाहिजेत, त्यांचा अर्थ, म्हणण्याच्या धुना व राग हे सर्व लिहिलेय.' 'आपण संगीताला संगीत म्हणून ऐकत नाही. आधी तो मनुष्य आवडायला लागतो. तो मनुष्य आवडला की त्याचे गायन कसेही असले तरी आपल्याला ते आवडायला लागते.' एक प्रकारे ही मुलाखत आणि बंदिशी सादर करण्याची मैफल होती.

देऊळगावकर यांनी अतिशय परिश्रमपूर्वक या पुस्तकाचे संपादन केलेले आहे. प्रत्येक मुलाखतीसाठी स्वतंत्र विभाग केलेला आहे. तिथे कुमार गंधर्व यांच्या फोटोंची मांडणी केलेली आहे. ज्या बंदिशी कुमारगंधर्व यांनी सादर केल्या, त्या इथे दिलेल्या आहेतच, त्याच सोबत त्यांचे क्यूआर स्कॅन कोड प्रत्येक ठिकाणी दिलेले आहेत. ते क्यूआर स्कॅन करून आपल्याला त्यांच्या गायनाचा आनंद सहजपणे घेता येऊ शकेल.

पुस्तकाला पंडित सुरेश तळवलकर यांची प्रस्तावना आहे. अतुल देऊळगावकर यांनी या पुस्तकाविषयीची भूमिका आणि मनोगत व्यक्त केलेले आहे. त्यातून पुस्तक आपल्यासमोर कसे साकार झाले हे स्पष्ट होते, तसेच कुमारगंधर्वांच्या विषयीचे आकलनही स्पष्ट होते. शेवटी 'नैया मोरी निके निके चालन लागी' हे इंदिरा संतांचे मनोगत जोडलेले आहे

या पुस्तकाच्या निर्मितीमागे अनेकांचे सहकार्य आहे. त्यात प्रतीक पुरी यांचा आवर्जून उल्लेख करायला हवा. त्यांनी ध्वनिमुद्रण ऐकून कागदावर उतरवण्याचे कठीण काम उत्तम केलेले आहे. शेखर देशमुख यांनी संहिता वाचून काही बाबी सुचवल्या आहेत. तर अरुण जोशी यांनी संपादन करण्यास सहकार्य केलेलं आहे.

संगीतप्रेमी, संगीतअभ्यासक आणि गायनक्षेत्रात पदार्पण केलेले गायक यांच्यासाठी उत्तम संदर्भ म्हणून या पुस्तकाचा उल्लेख करायला हवा. त्याची मांडणी, निर्मिती अतिशय दर्जेदार असून ती कुमारगंधर्व यांच्या वैचारिकतेला आणि गायनाला साजेशी आहे.


या पुस्तकासाठी कुमारगंधर्व यांची सुंदर अशी मुद्रा मुखपृष्ठावर घेतलेली आहे आणि त्यातून हे मुखपृष्ठ सतीश भावसार यांनी साकारलेले आहे.

**मूल्य ८०० रुपये सवलतीत ५०० रुपये**

# ग्रंथपान

## आणि मी रस्ता ओलांडला

**श्रीकांत बोजेवार**



**भुलाए न बने**

'पावसाच्या या ध्वनिमुद्रिकेसोबत लगडून पहिलं दृश्य येतं ते दिग्रसच्या सीमेवर पावसाळ्यात दुथडी भरून वाहणाऱ्या, मातकट पाण्याने भरलेल्या धावंडा नदीचं. त्या नदीवर बांधलेल्या पुलाच्या कठड्याला धरून खाली प्रवाहाकडे पाहिलं की हळूहळू आपणच वाहत जातो आहोत असा भास होई. हा भास फार काळ सहन करता येत नसे. गरगरल्यासारखं होई. मग नदीच्या प्रवाहावरून नजर बाजूला करून थोडा वेळ इकडेतिकडे पाहायचे आणि काही वेळाने पुन्हा खाली नदीकडे पाहत प्रवाहासोबत वाहत जायचे.'

'आणि मी रस्ता ओलांडला!' हे श्रीकांत बोजेवार यांचे ललित लेखांचे पुस्तक नुकतेच ग्रंथालीने प्रकाशित केले आहे. श्रीकांत बोजेवार हे पत्रकार, संपादक, समीक्षक म्हणून आपणास परिचित आहेत. त्यांचा आणखी एक परिचय म्हणजे 'तंबीदुराई' आणि 'दोन फुल एक हाफ!' अशा या बहुआयामी श्रीकांत बोजेवार यांच्या या लेखसंग्रहात असलेले लेख ललितलेखांचा उत्तम नमुना आपल्यासमोर नजराणा म्हणून सादर झाला आहे, असे लक्षात येते. 'दिग्रज' आणि 'लिहून थोडे लहान व्हावे' हे दोन लेख आपला गाव, आपले घर आणि आपले बालपण यांच्याविषयीचे आहेत. बालपणीचा काळ रम्य असतो तो विसरता येत नाही हे या लेखांमधून पुन्हा एकदा स्पष्ट होते. पण बालपणीच्या आठवणी सांगताना त्यात हरवून न जाता निरागसपणे आलेल्या अनुभवांना नितळपणे कसे सामोरे जाता येते यांचे उत्तम उदाहरणे म्हणजे हे दोन लेख. यात दोन गोष्टींचा असलेला समावेश अधिक महत्त्वाचा ठरतो. त्यापैकी एक आहे दिग्रसच्या एसटी स्टँडवर असलेल्या गजानन बुक स्टॉलवर भागवलेली वाचनाची हौस. एक प्रकारे त्यांच्या पुढील आयुष्याच्या पायाभरणीचा हा कालखंड होता असे म्हणता येईल. आणि दुसरी बाब म्हणजे आईला असलेली वाचनाची आवड. ही आवड जोपासण्यासाठी वडील मदत करत हे विशेष! यातली लहानशी गंमत अशी की आजीला वाचायला येत नव्हते परंतु गोष्टी ऐकायला आवडत. म्हणून आजी बोजेवारांच्या आईला काम सांगण्याच्या ऐवजी वाचायला वेळ देत. का तर तिच्याकडून आपल्याला गोष्ट ऐकायला मिळेल म्हणून. आज आपल्याला भेटणारे श्रीकांत बोजेवार अशा या सुसंस्कृत, संस्कारी वातावरणातून भरणपोषण करून आलेले आहेत.

लेखाचा दुसरा टप्पा सुरू होतो तो 'आणि मी रस्ता ओलांडला' या लेखापासून. हेच शीर्षक पुस्तकाला दिलेले आहे. दिग्रज सोडून मुंबईत आल्यानंतर स्वतःला स्थिरस्थावर करण्यासाठी जो संघर्ष त्यांना करावा लागलेला आहे त्याचे दृश्यचित्रण या लेखांमध्ये आहे. यात आपल्याला सहन कराव्या लागलेल्या हालअपेष्टा, करावा लागलेला संघर्ष, यापेक्षा आपण निवडलेल्या आवडीच्या क्षेत्राकडे कसे निर्धाराने वळलो आणि त्यासाठी पाठीवर हात ठेवणारी जी जी मंडळी पाठीशी उभी राहिली त्यांच्याविषयीची कृतज्ञता व आदराचा भाव त्यांनी अधिक व्यक्त केलेला आहे. मुंबई राजधानी, सकाळ, लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स असा झालेला त्यांचा प्रवास यात आलेला आहे. भाऊ तोरसेकर, प्रभाकर नेवगी, राधाकृष्ण नार्वेकर, डॉ. अरुण टिकेकर, कुमार केतकर यांच्या सोबतीने झालेला हा प्रवास आहे.

मुंबईत स्थिर झाल्यानंतर मोठ्या व्यक्तींच्या सहवासाचा लाभ त्यांना मिळाला तशाच अनेक व्यक्ती आहेत ज्यांच्या वागण्यातून त्यांचे मोठेपण अधोरेखित झालेले आहे. या सगळ्यांच्या विषयी त्यांनी मनापासून लिहिले आहे.

चित्रपट समीक्षणानंतर चित्रपटलेखन करावे अशी अपेक्षा येणे स्वाभाविक होते. त्यानुसार या क्षेत्रामध्ये त्यांचा झालेला प्रवेश व आलेले अनुभव यांचे चित्रण म्हणजे 'माझी चित्तरकथा'. रुपेरी पडद्यावर चमचम णारे, सर्व डोळे दिपवून टाकणारे जग वास्तवात वेगळे असते याचे दर्शन या लेखातून होते.

या चारही लेखांमधून घडवलेला प्रवास हा बोजेवारांच्या आयुष्याचा अनुभवाच्या अंगाने घेतलेला एक संक्षिप्त असा आढावा म्हणता येईल. चित्रपटाच्या भाषेत बोलायचे झाले तर 'ट्रेलर' असे म्हणावे लागेल.

शेवटचा लेख आहे तो 'तो भेटत राहणार' या शीर्षकाचा. इरफान खानविषयी लिहिताना ते एका कलावंताचा प्रवास नुसता उलगडून दाखवत नाहीत तर त्याच्या एकूण क्षमतेविषयी आपल्याला सांगून जातात. खरे तर हा लेख वाचत असताना इरफानने मुंबईत स्वतःला सिद्ध करण्यासाठी जो खडतर संघर्ष केलेला आहे तो बोजेवारांच्या संघर्षाशी समांतर आहे, असेही लक्षात येते.

श्रीकांत बोजेवार यांची एकूण असलेली शैली ही मिश्किलीशी समांतर, खुसखुशीत, विनोदी आणि तितकीच नेमकेपणाने नेमकेपणावर बोट ठेवणारी आहे. त्यांच्या नजरेत असलेला दृष्टिकोन आणि सूक्ष्म निरीक्षण शक्ती, जोडीला मनाचा नितळपणा. यामुळे त्यांचे लेखन वाचत असताना आपण काहीतरी वेगळे वाचत आहोत आणि बोजेवारांनी ते वेगळेपण जपलेले आहे हे स्पष्टपणे जाणवत राहते. 'आपण कुठेही गेलो तरी तिथला पाऊस स्वतःची वेगळी वैशिष्ट्यं घेऊन येतोच आणि जुना पाऊस तरीही मनात कोसळत राहतो.' 'मला गणितात १०० पैकी सात गुण पडले. सगळ्यांना प्रश्न पडला की एवढे कमी गुण कसे पडले? आणि मला प्रश्न पडला की आपल्याला सात गुणांचं कसं काय बरोबर सोडवता आलं?' 'पत्रकाराला केवळ डोकं असून चालत नाही त्याला हृदयही असलं पाहिजे, हा धडा मी त्या प्रसंगान शिकलो.' 'ज्या प्रकारच्या चित्रपटांना मी समीक्षक म्हणून कायम धारेवर धरत आलो होतो त्याच प्रकारच्या चित्रपटाचे संवाद लिहिण्यापासून श्री गणेशा झाला, हा एक प्रकारे काव्यात्म न्याय म्हटला पाहिजे.' यासारखी सुंदर वाक्ये त्यांच्या या शैलीचा परिचय करून देतात.

या पुस्तकातील सर्वच लेख हे यापूर्वी अरुण शेवते संपादित 'ऋतुरंग' दिवाळी अंकात वेळोवेळी प्रकाशित झालेले आहेत. पुस्तकात हे लेख सलगपणे वाचत असताना पूर्वीच्या वाचनाचे स्मरण होत नाही. तर एक सलग आकृतिबंध आपल्या नजरेसमोर साकारत जातो.

सतीश भावसार आणि विजय बोधनकर यांनी रेखाटलेल्या रेखाचित्रांचा समावेश केलेला असल्याने लेखांना अधिकच उठावदारपणा आलेला आहे. पुस्तकाचे आशयसंपन्न मुखपृष्ठ सतीश भावसार यांनी सजवलेले आहे.


**मूल्य १५० रुपये सवलतीत १०० रुपये**




# ग्रंथपान

## अमेरिका : सूर आणि धूर

**डॉ. अनंत पां. लाभसेटवार**



**प्रकाशाची दुसरी बाजू**

'दुसरं असं, की भारतीय लोक एकमेकांत भलेही भांडत असतील; पण गोऱ्या लोकांशी व इतरांशी वागताना कमालीची विनम्रता दाखवतात. हा गुण गोऱ्यांमध्ये प्रखरतेनं आढळत नाही. याशिवाय आपल्या संस्कृतीत ज्येष्ठांचा आदर करण्याची परंपरा आहे. त्यांचं ज्ञान व अनुभव नवीन पिढीला मार्गदर्शक ठरतात. ही पद्धत अमेरिकन लोकांत आढळत नाही. ते ज्येष्ठांचा मान करण्याऐवजी त्यांना कालबाह्य समजून अडगळीत टाकतात.'

जगाचे नेतृत्व करणारी मोठी शक्ती म्हणजे अमेरिका! अमेरिकेच्या वैभवाची, लोकशाहीची, तेथील उत्पादकदेची, शिक्षणव्यवस्थेची, आणि न्यायप्रियतेची मुक्ताफळे सर्वत्र ऐकायला येतात. तेथील राष्ट्राध्यक्ष हा जणू जगाचा उद्धारकर्ता, रक्षणकर्ता, सर्वेसर्वा आहे, असेच समजण्यात येते. अमेरिकेकडून मिळणारी आर्थिक, शस्त्र आणि इतर स्वरूपात मिळणारी मदत ही अनेक देशांसाठी जगण्याचे साधन ठरलेले आहे. शिक्षणासाठी अनेक पदवीधर तरुण अमेरिकेची वाट धरतात आणि तिकडेच स्थायिक होतात. त्यामुळे संगणकीय क्षेत्रात सिलिकॉन व्हॅली ही जगाचे आश्चर्य ठरलेली आहे. अणुबॉम्ब व डॉलरची शक्ती ही अमेरिकेची ओळख आहे. हे सर्व मान्य करायलाच हवे. परंतु प्रत्यक्षात या महाशक्तीची दुसरी बाजू किती कडवट व अंधारलेली आहे याची कल्पना आपल्यासारख्या सर्वसामान्य नागरिकांना असण्याचे कारण नाही. अमेरिकेत दीर्घकाळ वास्तव्याला असलेले डॉक्टर अनंत लाभसेटवार यांनी या दुसऱ्या बाजूचे चित्रण 'अमेरिका : सूर आणि धूर' या पुस्तकात केलेले आहे.

'अमेरिका : सूर आणि धूर' या पुस्तकात अमेरिकेविषयी लिहिलेले आहे. या पुस्तकाची राजकारण, अमेरिका व भारत, समाजकारण; आणि युक्रेन, ब्रिटन व इस्राएल, अशा चार भागांत विभागणी केलेली आहे. ४७ लेखांचा यात समावेश आहे. अमेरिकेचे आतापर्यंत झालेले राष्ट्राध्यक्ष यांच्या तुलनेत सध्या राष्ट्राध्यक्ष पदावर विराजमान झालेले बायडन यांची कारकीर्द किती सक्षम आहे, स्वतः बायडन बौद्धिकदृष्ट्या किती सक्षम आहेत, अमेरिकेची लोकशाही टिकवणे कसे अवघड झालेले आहे, तिसऱ्या महायुद्धाच्या दिशेने चाललेली युद्धे यात अमेरिकेचा सहभाग कसा आणि किती आहे, चीनला आव्हान देण्यात हे राष्ट्राध्यक्ष कमी पडत आहेत काय, याची माहिती राजकारण या भागातून वाचायला मिळते.

दुसऱ्या भागात, अमेरिका व भारत यांच्याविषयीचे लेख आहेत. यातून भारताची प्रतिमा, भारताचे परराष्ट्र धोरण, सुरू असलेल्या युद्धांमध्ये भारताची तटस्थता, आणि भारतातील संगणकीय ज्ञान किती उच्च दर्जाचे आहे, सत्या नाडेला – मायक्रोसॉफ्ट, अरविंद कृष्णा – आयबीएम, सुंदर पिचाय – अल्फाबेट, यांच्या नियुक्त्या व त्यांनी या कंपन्यांसाठी दिलेले योगदान किती मोलाचे आहे, आदींची माहिती या भागात वाचायला मिळते. त्याचप्रमाणे न्यू यॉर्क, लॉसएंजलिस, शिकागो आदी शहरांमध्ये कृष्णवर्णीय वंशाच्या लोकांचा चाललेला धुमाकूळ आणि त्याबाबतचे अमेरिकेचे मवाळ धोरण किती चिंताजनक आहे, हे या लेखांमधून वाचायला मिळते.

समाजकारण हा तिसरा भाग असून यात अमेरिकेतील वाढती गुन्हेगारी व हिंसा, न्यू यॉर्क शहराची अधोगती, गर्भपाताबाबतचे धोरण, लैंगिकीकरण, डावे व उजवे यांच्यामधील तिढा, चॅटजीपीटी वर की शाप, यांचे अगदी तळाशी जाऊन केलेले वर्णन आहे. तर चौथ्या भागात युक्रेन, ब्रिटन व इस्राएल यांच्यात सुरू असलेल्या युद्धांचे परिणाम, त्यामागे असलेले राजकारण, हेतू आणि प्रत्यक्षात अमेरिकेचा त्यात असलेला अंतर्गत सहभाग, हे सर्वच आपल्यासाठी अनाकलनीय असू शकते; परंतु त्यातले वास्तव किती भयानक आहे हे वाचून आपण थक्क होतो. तसेच, ब्रिटनचा एकूण घेतलेला राजकीय आणि आर्थिक आढावा पाहता आपण आश्चर्यचकित होतो. त्यात ऋषी सुनक या हिंदू भारतीय वंशाच्या सुपुत्राला ब्रिटनचा पंतप्रधान, तोही बिनविरोध होण्याची संधी मिळाली, हा एक मोठा चमत्कार आणि आश्चर्य आहे. यात ऋषीची शैक्षणिक पात्रता, आर्थिक स्थिती आणि बौद्धिक क्षमता कारणीभूत ठरलेली आहे, हे विशेष! ब्रिटनमधील राणी एलिझाबेथ आणि तिची राजवट हा लेख त्या घराण्याविषयीचा इतिहास, त्यांची एकूण परंपरा, मिळणारे राज्ञीपद, ही माहिती आपल्यासाठी मनोरंजक ठरावी अशी आहे.

कुठल्याही देशाच्या अंतर्गत आर्थिक राजकीय सामाजिक विषयांवर लिहायचे तर त्याविषयीचा सखोल अभ्यास संदर्भासह असणे आवश्यक ठरते. तरच त्या लेखनाला मूल्य प्राप्त होऊ शकते. डॉक्टर अनंत लाभसेटवार हे जवळजवळ ३५ ते ४० वर्षे अमेरिका येथे वास्तव्याला आहेत. इतिहास, राजकारण, समाजकारण या विषयांकडे ते अतिशय डोळसपणे पाहत आले आहेत, त्याविषयी लिहीत आलेले आहेत. त्यामुळे अमेरिकेविषयी त्यांनी आतापर्यंत चार पुस्तकांची निर्मिती केलेली आहे आणि आताचे 'अमेरिका : सूर आणि धूर' हे त्या मालिकेतील पाचवे पुस्तक आहे. त्यांच्या लेखनात विषयाला धरून नेमकेपणा असल्याने थेट गर्भाला हात घातल्यासारखा माहितीचा खजिना आपल्यासमोर सादर केला जातो. म्हणजेच या लेखनात कुठेही पाल्हाळ नसते. असते थेट वेगवान प्रवाहीपण. आपल्याला जे सांगायचे आहे त्याची घट्ट वीण त्यांच्या लेखनात सापडते. इतकी वर्षे अमेरिकेत असूनही कुठेही इंग्रजी शब्दांचे डोलारे त्यांच्या लेखनात सापडत नाहीत. अतिशय चपखल शब्दांची योजना करतात. या लेखनाला तितकीच चिंतनाची जोड देखील आहे. डॉक्टर अनंत लाभसेटवार यांची कादंबरी, लघुकथा, लेख, चरित्र, व प्रवासअनुभव अशी एकूण ३१ पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. वृत्तपत्रे आणि नियतकालिके यातून सातत्याने लेखन सुरू आहे. अमेरिकेचा राजकीय आणि सामाजिक अभ्यास करणाऱ्यांसाठी हे पुस्तक संदर्भ म्हणून निश्चितच उपयोगी ठरणारे आहे. या पुस्तकातील आतील रेखाचित्रे प्रमोद जोशी यांनी रेखाटलेली आहेत तर मुखपृष्ठ सतीश भावसार यांनी साकारलेले आहे.


**मूल्य ५०० रुपये  सवलतीत ३०० रुपये**



# ग्रंथपान

**चिंतन भाग ४**

**शरद काळे**




**जगण्याकडे पाहताना**

'माणूस जगतो ते आनंद मिळवण्यासाठी जगतो, हे खरे असले तरी प्रत्येक क्षण आनंदाचाच असेल असे नसते. सुखदुःखे जोडीनेच वावरत असतात. दुःखाशिवाय सुखाची महती कळत नसते हेही खरे आहे. काहींच्या वाट्याला दुःखे अधिक येतात, तर काहींच्या वाट्याला अधिक सुखे! असे का? या प्रश्नाला उत्तर नसते. जगात वेदना असतातच. जगात सुखाचे क्षणही विखुरलेले असतात. हे क्षण वेचायचे असतात. पण प्रयत्न करूनही वेचता आले नाहीत, तर खंत करीत बसू नये.'

शरद काळे यांची 'चिंतन' मालिका प्रकाशित होत आहे. या मालिकेतील भाग चौथा आता आपल्या हातात आहे. या बृहदलेखांच्या संग्रहात एकूण ५१ लेखांचा समावेश आहे. हे सर्व लेख विविध विषयांवर लिहिलेले असून ते त्यांच्या चिंतनातून उतरलेले आहेत. यात विज्ञान हा विषय प्रामुख्याने आहे. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र अशा विविध शाखांचा यात समावेश आहे. हे सर्वच विषय साधारणतः आपल्या नजरेसमोर असतात, परंतु त्यातली क्लिष्टता पाहून आपण त्यापासून दूर जाण्याचा प्रयत्न करतो. वास्तविक अनेक विषय हे माहितीच्या अनुषंगाने अधिक महत्त्वपूर्ण असतात आणि ते आपल्या विचारशक्तीला, कल्पनाशक्तीला चालना देणारे असतात. असे विषय जर सोपे करून सांगितले तर त्यांची उपयुक्तता अधिक वाढते, त्याचा समाजाला चांगला उपयोग होऊ शकतो. एखादा विषय आवडला तर त्यावर अधिक वाचन करण्याची प्रवृत्ती निर्माण होऊ शकते. या दृष्टीने व हेतूने डॉक्टर शरद काळे यांनी हे लेखन केलेले आहे.

अल्झायमर रोग आणि पार्किन्सन रोग या दोन्ही लेखांमध्ये जे स्पष्टीकरण केलेले आहे ते व्यक्तीच्या स्मरणशक्तीच्या अनुषंगाने निर्माण झालेले आजार आहेत. साधारणता वयाच्या ६५नंतर या आजारांचा उद्भव होतो. यात स्मरणशक्तीसह एकूण शारीरिक बदलांचा जो परिणाम होतो, त्याविषयी सोप्या भाषेत लिहिलेले आहे, ही माहिती देताना ते आयुर्वेदाचा संदर्भ देतात. जगभरात सुमारे चार कोटी वृद्ध स्मृतिभ्रंशाने त्रस्त आहेत. अल्झायमर हा मेंदूचा विकार आहे. या रोगाचे नाव डॉक्टर अलॉइस अल्झायमर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिलेले आहे. तसेच पार्किन्सन हे नाव जेम्स पार्किन्सन या शल्यचिकित्सकाचे नाव या आजाराला देण्यात आलेले आहे. हा आजारदेखील मेंदूशी संबंधित आहे. हे दोन्हीही लेख सर्व वयोगटांतील वाचकांनी आवर्जून वाचायला हवेत असे आहेत.

इथे हे स्पष्ट केले पाहिजे की केवळ विज्ञान एके विज्ञान असे नाही तर कला, साहित्य, पर्यावरण, व्यक्तिचित्रण आदी विषयांचादेखील यात समावेश आहे.

ग. दि. माडगूळकर, मंगेश पाडगावकर आणि केशवसुत हे तिघेही मराठी भाषकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे कवी आहेत. यांच्या कवितांमध्येदेखील विज्ञान आहे, त्यांचा शोध लेखक तीन लेखांमधून घेताना दिसतात. सजीव आणि निर्जीव या दोन गोष्टींची तुलना करताना गदिमांनी फुलांना मरण आणि दगडांना चिरंजीवित्व या दोन गोष्टींचा प्रातिनिधिक स्वरूपात उल्लेख केलेला आहे. तसेच, प्रचंड विश्व निर्माण करणाऱ्या विठ्ठलाला त्यांनी वेडा कुंभार म्हटलेले आहे. त्यासाठी काही गीतांचा इथे संदर्भ दिलेला आहे. 'उद्धवा, अजब तुझे सरकार', 'विठ्ठला, तू वेडा कुंभार', 'एक धागा सुखाचा शंभर धागे दुःखाचे', 'जग हे बंदिशाला'. मंगेश पाडगावकरांची कविता 'कुठे शोधिशी रामेश्वर अन् कुठे शोधिशी काशी' हीसुद्धा गदिमांच्या प्रतिभेशी समांतर असलेली कविता. तिच्याविषयी लिहिताना लेखक म्हणतात, 'देवप्रवृत्तीचा जो जागर सातत्याने आपल्याभोवती होत आहे, तीच सकारात्मक ऊर्जा असते. त्या ऊर्जेची ओळख करून घेणे यातच माणसाचे माणूसपण जडलेले आहे. या सकारात्मक ऊर्जेची ओळख करून देणे, हीच या कवितेची मध्यवर्ती कल्पना आहे. केशवसुतांची स्फूर्ती ही कविता 'काठोकांठ भरू द्या प्याला फेस भराभर उसळू द्या!' या कवितेची मध्यवर्ती कल्पना म्हणजे देव-दानवा नरे निर्मिले हे मत लोका कवळू द्या हीच आहे. 'आम्ही कोण' ही अशीच एक आणखी सकारात्मक कविता आहे. हे जग खेळण्यासाठी विश्वनिर्मात्याने आमच्या हाती खेळणे म्हणून दिलेले आहे, या मध्यवर्ती कल्पनेवर गुंफलेली कविता होय.

विशेष म्हणजे काही व्यक्तिरेखांचा पुस्तकात खास उल्लेख करण्यात आलेला आहे . त्यापैकी केव्हिन कार्टर, फोटोग्राफर ज्याने मृत्यूपूर्वी लिहिले होते, 'जीवन जगण्यातील आनंदावर जीवनातील कारुण्याच्या व वेदनांच्या काळ्या छायेने विरजण घातले आहे. माझ्या आयुष्यातील आनंदच हरवला आहे.' त्याची गोष्ट इथे दिलेली आहे. दुसरे आहेत अणुबॉम्बचे जनक डॉक्टर रॉबर्ट ओपेन हायमर. ज्यांनी १९३०च्या दशकात आपण ज्याला कृष्णविवर म्हणतो त्याचे अस्तित्व सुचित करणारा शोधनिबंध लिहिणारे ते पहिले संशोधक होते. १६ जुलै १९४५ रोजी अण्वस्त्राचा पहिला स्फोट पाहिल्यावर 'मी काळ (मृत्यू) आहे. आता जगाचा नाश करणारा झालो आहे.' डॉक्टर ओपन हायमरच्या तोंडी भगवद्गीतेतील ही ओळ आली होती. मायक्रोचीपचा जनक जॅक सेंट किल्बी या प्रज्ञावंताची ही गोष्ट इथे आपल्याला वाचायला मिळते. त्यासोबतच क्रिकेटमध्ये षट्‌कारांचा बादशहा म्हणून प्रसिद्ध असलेले, पहिल्या अर्जुनवीर पुरस्काराचे मानकरी क्रिकेटवीर सलीम दुराणी यांचेही मोठेपण येथे टिपलेले आहे. नोबेल पारितोषिक यासाठी पात्र असूनही त्याची हुलकावणी मिळालेले अनेक संशोधक, पहिल्या पाणबुडीची निर्मिती, भारतीय चांद्रयान-३ मोहिमेचे महत्त्व, आपल्याला सगळ्यांना आवडणारी इडली, असे अनेक लेख या पुस्तकात आहेत.

कुठलाही विषय समजावून सांगायचा असेल तर तो सोप्या भाषेत सांगावा लागतो, हे तत्त्व लेखकाने पाळलेले आहे. आतापर्यंत त्यांची अनेक पुस्तके प्रकाशित झालेली आहे.

या पुस्तकाचे मुखपृष्ठ सतीश भावसार यांनी साकारलेले आहे.

**मूल्य ५०० रुपये सवलतीत ३०० रुपये**

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.

Postal Registration No. MCW/310/2022-2024
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.

सारस्वत बँक | सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
(शेड्युल्ड बँक)

कार लोन

8.60% p.a



₹1.5 कोटींपर्यंत कर्ज सुविधा | परतफेडीचा कालावधी 7 वर्षे | प्रीपेमेंट/ फोरक्लोजर शुल्क नाही | त्वरित मंजुरी

अधिक माहितीसाठी 90290 50049 या नंबरवर मिस्ड कॉल द्या
किंवा नजीकच्या शाखेशी संपर्क करा.

अटी लागू. जून 2024

www.saraswatbank.com

मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.